CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित


सोलापूर | गुरुवार, ३ जुलै २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २३५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



हिंदुत्व म्हणजे केवळ एक धर्म नाही, ती एक जीवनपद्धती आहे. जगाला शांतता देणारी आणि सर्वांना आपले मानणारी ही एक महान संस्कृती आहे.

- मोरोपंत पिंगळे
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## पंढरपूरच्या वारीत अर्बन नक्षलवादी शिरले

- एकनाथ शिंदे सेनेच्या आमदारांचा सभागृहात दावा
- माहिती ऐकीव नसून सबळ पुरावे असल्याचेही नमूद

**मुंबई, दि.२ जुलै-**

जगभरात प्रसिद्ध असलेल्या पंढरपूरच्या वारीत 'अर्बन नक्षलवादी' (शहरी नक्षलवादी) घुसल्याचा खळबळजनक दावा शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनिषा कायंदे यांनी बुधवारी सभागृहात केला आहे. तसेच ही ऐकीव माहिती नसून सबळ पुरावे समोर आले असल्याचेही त्यांनी म्हटले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात उपस्थित होते.

पंढरपूरची आषाढी वारी ही महाराष्ट्राची श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक ओळख असलेली परंपरा आहे. वर्षानुवर्षे लाखो वारकरी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरच्या विठोबाच्या दर्शनासाठी पायी चालत निघतात. यावर्षीही वारीसाठी लाखो वारकरी पंढरीला रवाना झाले आहेत. त्यातच शिंदे गटाच्या आमदार मनिषा कायंदे यांनी केलेल्या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. पंढरपूरच्या वारीचा काही लोक गैरफायदा घेत आहेत. देवाला धर्माला ही लोकं मानत नाही, हा त्यांचा अधिकार आहे. हिंदू धर्म आणि वारीबद्दल अपप्रचार करत आहेत, लोकांचा बुद्धीभेद करत आहेत. पंढरपूरची वारी अशी आहे जिथे कोणी कोणाला निमंत्रण देत नाही. वेगवेगळ्या बोगस नावाखाली काही संघटना जसे पर्यावरण दिंडी, संविधान दिंडीसारख्या गोष्टी समोर आल्या आहेत, पथनाट्य करतात, असे शो करतात. एक दिवस तरी वारी अनुभवा, हा माणूस कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे.



सासवड येथे ही लोकं पोहोचतात आणि त्यांच्या वारीचा रुट देखील आहे. क्युआर कोड त्यांनी दिलाय जो ब्लॅकलिस्टेड आहे, असं दिसतंय. पंढरपूरच्या वारीचा ही लोकं गैरफायदा घेत आहेत, अशी माहिती मनीषा कायंदे यांनी सभागृहात दिली.

यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. काही वारकरी संघटना भेटले. त्यावर मुख्यमंत्र्यांनी यावर बंदोबस्त करू, असे आश्वासन दिले आहे. काही लोक पकडले गेले आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. हिंदू धर्माला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. वारीला बदनाम करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप मनिषा कायंदे यांनी केला आहे. वारीचा गैरफायदा घेऊ नये हाच उद्देश आहे. संविधानाच्या नावाखाली फेक नरेटिव्ह पसरवणारे हे लोक नाहीत ना? असाही सवाल कायंदेंनी विचारला.

### कायंदेंच्या वक्तव्याला महत्व देवू नका : ठाकरे

वारीसंदर्भात आमदार मनीषा कायंदे यांनी केलेल्या वक्तव्यावर शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशा लोकांकडे काही लक्ष देऊ नका, हे कधीही पक्ष बदलतात, सोडून द्या, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी मनीषा कायंदे यांच्या वक्तव्याला अधिक महत्त्व देण्याची गरज नसल्याचे म्हटले.

## शेतकऱ्यांच्या कर्ज माफीवर विधिमंडळात गोंधळ

### विरोधकांचा संतप्त सवाल; तर अजित पवारांनी विरोधकांना सुनावले

**मुंबई, दि.२ जुलै-**

राज्यविधिमंडळाच्यापावसाळीअधिवेशनात शेतकरी कर्ज माफीचा मुद्दा चांगलाच गाजला. या प्रश्नावर विरोधक चांगलेच आक्रमक झाले असून काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी या विषयावर स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र, अध्यक्षांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. इतकेच नाही तर विरोधक शेतकऱ्यांच्या आडून राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला आहे.




सरकार शक्तिपीठ महामार्गाच्या प्रकल्पासाठी २० हजार कोटी मंजूर करते. पण शेतकरी कर्जमाफी साठी सरकारकडे पैसे नाहीत का? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. त्याला सत्ताधारी पक्षानेही जोरदार प्रत्युत्तर दिले. शेतकऱ्यांच्या आडून विरोधक राजकारण करत असल्याचा आरोप अजित पवार यांनी केला. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी देखील काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले होते. माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या वक्तव्यावरुन कृषिमंत्री आणि लोणीकर यांनी माफी मागण्याची मागणी त्यांनी केली होती. त्यासाठी त्यांनी थेट राजदंडला स्पर्श केल्याने अध्यक्षांनी त्यांना एका दिवसासाठी निलंबित केले होते. त्यानंतर आता दुसऱ्या दिवशी वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव मांडत शेतकऱ्यांच्या विषयावर चर्चा करण्याची मागणी केली होती. हा प्रस्ताव अध्यक्षांनी स्विकारला नाही.

राज्यात शेतकरी आत्महत्या वाढत आहे. दररोज शेतकरी आत्महत्या होत आहे. राज्यात यावर्षी जानेवारी ते मार्च या कालावधीत ७६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यातील २०० प्रकरणे अपात्र ठरली असून १९४ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या होतात त्यांना मदती ही सरकार देत नसल्याचा आरोप काँग्रेस पक्षाचे विधिमंडळातील नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.

### विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आड राजकारण करु नये

शेतकरी हा लाखोंचा पोशिंदा आहे आणि राज्यातलं सरकार शेतकऱ्यांचे सरकार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी समजून घेऊन त्या सोडवणं, शेतकऱ्यांना मदत करणं सरकारची जबाबदारी असून आमचं सरकार ती पार पाडेलंच. शेतकऱ्यांच्या सर्व प्रश्नांवर केव्हाही चर्चा करण्यास सरकार तयार आहे. मात्र, विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या आडून राजकारण करु नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करीत विरोधी पक्ष सदस्यांना सभागृहात गोंधळ न घालण्याचे आवाहन केले.

## अंमलीपदार्थ तस्करीसंदर्भात 'मकोका' कारवाईसाठी कायद्यात सुधारणा

### मुख्यमंत्र्यांची विधानपरिषद घोषणा

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ जुलै-**

'एनडीपीएस'अंतर्गत अटक झालेल्या आरोपींना जामीन मिळाल्यानंतर त्यांनी पुन्हा गुन्हे केल्याचे सिद्ध झाल्यास आता संघटित गुन्हेगारीअंतर्गत त्यांच्यावर 'मकोका' अंतर्गत कारवाई करण्यासाठी कायद्यात सुधारणा या अधिवेशनातच केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधान परिषद सदस्य डॉ.परिणय फुके, एकनाथ खडसे यांनी ड्रग तस्करी संदर्भात प्रश्न विचारला होता, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, राज्यात प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र एनडीपीएस युनिट स्थापन करण्यात आले असून त्यात अधिकारी व अंमलदारांची नियुक्तीही केली आहे. जिल्हा स्तरावर समन्वय समित्याही स्थापन करण्यात आल्या आहे. यात गेल्या दोन-अडीच वर्षांत मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे, केंद्र सरकारच्या मदतीने आता राज्यस्तरीय आणि आंतरराज्यीय समन्वय अधिक प्रभावी झाला आहे. सर्व राज्यांमध्ये 'इंटेलिजन्स' शेअरिंग सुरू असून त्यामुळे तस्करांवर एकत्रितपणे कारवाई शक्य झाली असल्याचेही त्यांनी सांगितले.



व्यसनमुक्तीसाठीची केंद्रे महत्वाची असून सध्या त्यांची संख्या आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी योग्य धोरण तयार करून दर्जेदार व्यसनमुक्ती केंद्रांची उभारणी केली जाणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. गांजाच्या शेतीवर बंदी असून ती मध्यप्रदेशातही कायदेशीर नाही, हे स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणाले की, गांजा, गुटखा किंवा तत्सम पदार्थांची तस्करी होत असल्यास त्या विरोधात कठोर कारवाई केली आहे.

## महत्त्वाचे...

### कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणार नाही

**मुंबई :** विद्यार्थी संख्या कमी झाली, तरी कुठलीही शाळा बंद केली जाणार नाही. शिवाय विद्यार्थ्यांची संख्या घटल्यामुळे शिक्षक अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे योग्य समायोजन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत दिली. विधान परिषद सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना एकनाथ शिंदे आणि राज्यमंत्री भोयर बोलत होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्यात सध्या एकूण एक लाख आठ हजार शाळा आहेत. त्यापैकी सुमारे १८ हजार शाळांमध्ये पटसंख्या २० पेक्षा कमी आहे. तरीसुद्धा, त्या शाळा सुरूच राहतील.

### माजी आमदार अपूर्व हिरे, कुणाल पाटील भाजपात

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी आमदार व प्रदेश उपाध्यक्ष डॉ.अपूर्व हिरे आणि धुळ्यातील माजी आमदार तथा काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांनी समर्थकांसह बुधवारी भाजपात पक्षप्रवेश केला. मुंबई येथील भाजपा कार्यालयात पार पडलेल्या पक्षप्रवेशावेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री गिरीश महाजन यांची उपस्थिती होती. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव तसेच शहरी व ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासासाठी भाजपात प्रवेश करत असल्याचे अपूर्व हिरे यांनी सांगितले. पक्ष प्रवेशावेळी नाशिक जिल्हयातून हजारो कार्यकर्ते मुंबई येथे उपस्थित होते. याशिवाय तीन पिढ्यांपासून काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ म्हणून ओळख असलेल्या घराण्यातील धुळ्यातील माजी आमदार कुणाल पाटील यांनी आपल्या समर्थकांसह भाजपात प्रवेश केला, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पाटील यांचे स्वागत केले.

### झाड तोडल्यास ५० हजार दंडाचा निर्णय मागे

**मुंबई :** राज्यात वृक्षतोडीबाबत घेतलेल्या कडक निर्णयावरून महायुती सरकारमधील विद्यमान वनमंत्री आणि माजी वनमंत्र्यांमध्ये सभागृहात चांगलाच वाद रंगला. झाड तोडल्यास थेट ५० हजार रुपये दंड ठोठावण्याचा निर्णय मागे घेण्यात आला असून, यामुळे माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार आणि विद्यमान वनमंत्री गणेश नाईक यांच्यात सभागृहात जुंपल्याचे पाहायला मिळाले. एकीकडे जागतिक स्तरावर पर्यावरण वाचवण्याची चिंता व्यक्त होत असताना, आपल्याच सरकारने हा निर्णय मागे घेतल्यामुळे मुनगंटीवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत घरचा आहेर दिला आहे. तर नवीन बदलासह कायदा आणू, असे स्पष्टीकरण वनमंत्री उईके यांनी दिले.

### पीएनबीमध्ये किमान रक्कम ठेवण्याची गरज नाही

**नवी दिल्ली :** पंजाब नॅशनल बँकेच्या बँक खात्यात किमान सरासरी रक्कम न ठेवल्यास कोणताही दंड आकारला जाणार नाही. बँकेने १ जुलैपासून मिनिमम बॅलन्स ठेवण्याची अट रद्द केली आहे. हा नवीन बदल सर्व प्रकारच्या बँक खात्यांवर लागू करण्यात आला आहे. पीएनबीने देखील ग्राहकांकडून मिनिमम बॅलन्स न ठेवल्याबद्दल दंड आकारला होता.

## संत एकनाथ महाराज पालखीचे अरण येथे स्वागत

### ४२ हून अधिक दिंड्या; ३० हजार वारकरी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२ जुलै-**

संत एकनाथ महाराज यांचा आषाढी वारी पालखी सोहळा आज संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात विसावला. हा पालखी सोहळा पैठणपासून सुमारे ३०० किमीचे अंतर पायी पार करत,५ रिंगण सोहळे सादर करुन लऊळ येथील विठ्ठल भक्त संत कुर्मदासांच्या समाधीचे दर्शन घेऊन सावता महाराजांच्या भेटी श्रीक्षेत्र अरण (ता.माढा) येथे सायंकाळी सावता महाराजांच्या भेटीस अरणमध्ये दाखल झाला. पैठणहून आलेल्या दिंड्या व पालख्यांनी सावतोबांचा भक्तीचा मळा फुलुन गेला.

सर्वत्र विठूनामाचा गजर होत होता.भानुदास एकनाथ असे म्हणत वारक-यांनी गावातील रस्त्यावर फेर धरला.गावात आल्यावर पालखीचे स्वागत अरणमधील पदाधिकारी नेतेमंडळी व ग्रामस्थांनी केले. गावातून पालखीची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली,रस्त्यावर रांगोळी पायघड्या अंथरण्यात आल्या होत्या. सुमारे शेकडो वर्षापासून याच मार्गाने नाथ पालखी सोहळा आषाढीवारीसाठी वैकुंठभुमी पंढरपूरास जातो.



यावर्षीचे पालखी सोहळ्याचे ४२६ वे वर्ष असून दरवर्षीप्रमाणे पालखी सोहळा प्रमुख हभप रघुनाथ महाराज पालखीवाले व हभप योगेश पालखीवाले यांच्या मार्गदर्शनाखाली पैठणहून पंढरपूरास निघालेल्या ४२ हून अधिक पाई दिंड्या सोहळ्यात सहभागी झाल्या असून, ३०,००० वारकरी भक्त पायी विठ्ठल भेटीला पंढरपूरपुरास चालत निघाले आहेत. अरणमध्ये नाथ पालखीची व वारकऱ्यांना गावातील सर्व गावकरी मंडळी संध्याकाळी व सकाळी या दिंड्याना सेवा पुरवितात. नाथांच्या पादुकासोबत आषाढी वारीचा आनंद वारकरी मोठ्या भक्ती भावाने घेत आहेत. पालखीसोबत सहा पुढे व छत्तीस दिंड्या शिस्तीने चालत,भजन करीत, अभंग गायन करीत आहेत.मराठवाडा,विदर्भ, पैठण, या विभागातील सर्व दिंड्या या सोहळ्यात सहभागी झालेल्या आहेत. यामुळेच आता हा ज्ञानोबा तुकाराम यांच्या प्रमाणे तिसरा महत्त्वाचा आषाढी वारी सोहळा साजरा होतो आहे. दुपारी हा पालखी सोहळा पंढरपूर साठी प्रस्थान ठेवेल.

## सोनिया-राहुल गांधींनी रचला होता दोन हजार कोटींची संपत्ती हडपण्याचा कट

### ईडीचा विशेष न्यायालयात दावा

**नवी दिल्ली, २ जुलै**

सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी दोन हजार कोटी रुपयांची संपत्ती हडपण्याचा कट रचला होता, असा दावा ईडीच्या वतीने विशेष न्यायालयात युक्तिवाद करताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल व्ही. राजू यांनी केला. विशेष न्यायालयात बुधवारी नॅशनल हेराल्डशी संबंधित मनी लॉण्ड्रिंग प्रकरणावर बुधवारी सुनावणी झाली.

असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडची दोन हजार कोटी रुपये मूल्य असलेली संपत्ती काँग्रेस पक्षाला हडपायची होती. हा कट सोनिया आणि राहुल गांधी यांनी रचला होता, असा दावा व्ही. राजू यांनी केला. या प्रकरणात काँग्रेस संसदीय पक्ष प्रमुख सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मुख्य आरोपी आहेत. या प्रकरणाची सुनावणी सीबीआयचे विशेष न्यायाधीश विशाल गोगने करीत आहेत. या प्रकरणात सोनिया गांधी या आरोपी क्रमांक एक तर राहुल गांधी आरोपी क्रमांक दोन आहेत. या प्रकरणात काँग्रेस महासमितीलाही आरोपी बनवले तर कलम ७० अंतर्गत सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचे नाव पुन्हा येऊ शकते. न्यायालयात या प्रकरणाची उद्याही सुनावणी होणार आहे.



### यंग इंडियात ७६ टक्के हिस्सा

काँग्रेससाठी घेतलेल्या ९० कोटी रुपयांच्या कर्जासाठी दोन हजार कोटी रुपयांची संपत्ती हडपता यावी म्हणून यंग इंडियाची स्थापना करण्यात आली. यात सोनिया आणि राहुल गांधी यांचा ७६ टक्के हिस्सा होता. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या निर्देशानुसार एजेएल जाहिरातींसाठी पैसे देण्यात आले होते आणि या बनावट कंपनीच्या माध्यमातून गुन्हेगारी स्वरूपाचे उत्पन्न मिळाले, असा युक्तिवाद ईडीने केला.

## २२ राज्यांतील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण

### भाजपा राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडीचा मार्ग प्रशस्त

**नवी दिल्ली, २ जुलै-**

भाजपाने आतापर्यंत २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

गेल्या दोन दिवसात सहा राज्यांत भाजपाने आपल्या प्रदेश अध्यक्षांची निवड केली. यामुळे भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडीचा मार्ग प्रशस्त झाला आहे. भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड करण्यासाठी ५० टक्के म्हणजे किमान १९ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण आवश्यक असते. पण आता २२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली असल्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडीचा मार्ग प्रशस्त झाला, असे मानले जाते. येत्या दोनतीन दिवसात लडाख, दीवदमण, अंदमान निकोबार आणि पश्चिम बंगालमधील निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यामुळे निवडणूक झालेल्या राज्यांची, केंद्रशासित प्रदेशांची संख्या २६ होईल. महाराष्ट्रात रवींद्र चव्हाण यांची प्रदेश अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

## वारीदरम्यान मृत्यू झाल्यास आता ४ लाखांची मदत

### महसूल विभागातर्फे परिपत्रक जारी

**मुंबई, २ जुलै-**

वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी यंदा महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. वारीदरम्यान कोणत्याही अपघातात एखाद्या वारकऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सरकारकडून चार लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे.

यासंदर्भातील नवे परिपत्रक महसूल विभागाने जारी केले आहे.

यंदाच्या वारीसाठी ही योजना १६ जून ते १० जुलै २०२५ या कालावधीत लागू राहणार आहे. या काळात एखाद्या वारकऱ्याचा अपघात, विषबाधा किंवा इतर नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना ही मदत दिली जाईल. मात्र, आत्महत्या, विषबाधा (स्वखुशीने), किंवा खून यासारख्या घटनांमध्ये ही मदत मिळणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय, अपघातामुळे वारकऱ्यांचे अपंगत्व झाल्यासही सरकारने आर्थिक मदतीची तरतूद केली आहे.

### तरतुदीमध्ये काय आहे?

- ४० ते ६० टक्के अपंगत्व आल्यास ७४,०००, ६० टक्क्यांवरून अधिक अपंगत्व आल्यास २.५० लाख
- एका आठवड्यापेक्षा अधिक कालावधीसाठी रुग्णालयात दाखल झाल्यास १६००० रुपये
- एक आठवड्यापेक्षा कमी कालावधीसाठी दाखल असल्यास ५४०० रुपयांची मदत

## नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ जुलै**

गुन्ह्यांच्या तपासात गतिमानता आणण्यासाठी नवीन फौजदारी कायदे उपयुक्त आहेत. या कायद्यांअंतर्गत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर अपेक्षित असून न्याय प्रक्रियेतील विलंब कमी करण्यासाठी नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करत केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक अधिसूचना व आदेश जारी करून कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. तसेच राज्यात नवीन फौजदारी संहिता कायद्याच्या अंमलबजावणीसाठी विभागनिहाय कामाचे रँकिंग करण्याच्या सूचनाही दिल्या.

विधानभवन येथे नवीन फौजदारी संहिता कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत आढावा घेताना ते बोलत होते. बैठकीला गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, गृह राज्यमंत्री (ग्रामीण) डॉ. पंकज भोयर, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नवीन फौजदारी संहिता कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. न्यायवैद्यक विभागाने गुन्हे सिध्दतेसाठी पुराव्यांच्या करण्यात येणाऱ्या चाचण्या वेळेत कराव्यात. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध करून देण्यात येत आहेत.



रिक्त पदे भरली असून आणखी मनुष्यबळाची आवश्यकता असल्यास मागणी करावी. सुविधा व नागरिक केंद्रित सेवा यामध्ये महाराष्ट्र देशात आघाडीवर आघाडीवर असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पोलिस दलाच्या सक्षमीकरणासाठी राज्यातील पोलीस अधिकारी यांच्यासाठी प्रशिक्षणांचे नियमित अंतराने आयोजन करण्यात यावे. मास्टर ट्रेनर्स तयार करून न्यायालयीन अधिकारी, कारागृह कर्मचारी, फॉरेन्सिक वकिलांसाठीही प्रशिक्षण देण्यात यावे. ऑनलाईन 'एफआयआर' प्रणालीवर नागरिक सहजपणे तक्रार नोंदवू शकतील याबाबत काम करावे. ई साक्ष ॲप, सीसीटीएनएस प्रणाली याचा उपयोग वाढविण्यात यावा. गुन्हे सिद्धता वाढण्यासाठी ई न्यायालय प्रणाली सक्षम करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. महिलांसंदर्भातील गुन्ह्यांचा तपास जलद गतीने पूर्ण करण्यासाठी कार्यवाही करावी. विशेषतः छेडछाड व अत्याचाराच्या प्रकरणांचा तपास जलदगतीने पूर्ण करावा. आरोपपत्र लवकर दाखल करण्यासाठी कार्यवाही होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीला मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. इकबाल सिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) राधिका रस्तोगी, प्रधान सचिव (कायदा व सुव्यवस्था) अनुप कुमार सिंह, विधी व न्याय विभागाच्या प्रधान सचिव सुवर्णा केवले, महासंचालक (न्यायवैद्यक) संजय कुमार वर्मा, अपर पोलीस महासंचालक (कारागृह) सुहास वारके आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...

### ब्रह्म प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांना आवाहन

**सोलापूर, दि. २ जुलै -**

जुळे सोलापूर येथील ब्रह्म प्रतिष्ठानच्यावतीने प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही ब्राह्मण समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी करण्याचे आावाहन संस्थेच्या अध्यक्षा सुजाता देशपांडे यांनी केले आहे. हा कार्यक्रम दि, २६ जुलै शनिवारी सायंकाळी ५.३० वाजता द्वारकाधीश मंदिर, विजापूर रोड,सोलापूर येथे होणार आहे. यामध्ये प्राथमिक, माध्यमिक, दहावी, अकरावी, बारावी, पदवीधर, उच्च पदवीधर व अन्य क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या ब्राह्मण विद्यार्थी, विद्यार्थिनींचा गुणगौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. समस्त ब्राह्मण समाज बंधू भगिनी यांनी आपल्या पाल्यासह उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क : सुहास देशपांडे मो. ७७०९०८०७२१, सुजाता देशपांडे मो.८२०८२१४३०९, स्वाती कुलकर्णी मो.पे.९९७६३२०७२९४, श्री देगावकर मो ९८२३३३८५८२ व विजय कुलकर्णी ९८५०९०२९७१.

### विहीरीत पाय घसरून पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. २ जुलै -**

पाय घसरून विहीरीत पडल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील वाळूज (द्रे) या गाव परिसरात ३० जून रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला. सुहास अर्जुन रणदिवे (वय ३०) असे विहीरीत पडून जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवार ३० जून रोजी हा त्याच्या शेतातील विहीरीतून पाणी काढून वर येत होता. त्यावेळी त्याचा पाय घसरल्याने तो विहीरीत पडल्याने त्याच्या छातीला मार लागला. तो बुधवार दोन जुलै रोजी दुपारी २.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### दारु पिण्यास पैसे न दिल्याने पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २ जुलै -**

दारु पिण्यास पत्नीने पैसे न दिल्याच्या कारणावरून पतीने आत्म्हत्येचा प्रयत्न केला. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील औराद या गावात बुधवारी सकाळी १०.३० च्या सुमारास घडला. श्रीशैल भिमशा सरुर (वय ३६) असे पतीचे नाव आहे. बुधवारी सकाळी श्रीशैल याने राहते घरी असताना, पत्नीकडे दारु पिण्यास पैसे मागितले. ते तिने न दिल्याचा मनस्ताप त्यास झाला. यातून उंदीर मारण्याचे औषध श्रीशैल याने प्राशन केले. यात त्यास त्रास होऊ लागल्याने पत्नी सुनीता यांनी त्याला सकाळी ११.५५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### शाळेत पाठविण्याच्या कारणावरून मुलाने प्राशन केले तणनाशक औषध

**सोलापूर, दि. २ जुलै -**

शाळेत पाठविण्याच्या कारणावरून रागावलेल्या १२ वर्षाच्या मुलाने तणनाशक औषध प्राशन केले. हा प्रकार तुळजापूर तालुक्यातील नरसिंग वाडी तांडा येथे बुधवारी सकाळी ९ वाजता घडला. विक्रम सतिश चव्हाण (वय १२) असे मुलाचे नाव आहे. बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास विक्रम हा शाळेत पाठविण्याच्या कारणावरून चिडला होता. त्याने त्याच रागाच्या भरात घरात ठेवलेले तणनाशक औषध प्राशन केले. त्यास सकाळी ११.५५ वाजता वडील सतिश यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आरळीतील तरुणाने प्राशन केले विषारी औषध

**सोलापूर, दि. २ जुलै -**

मंगळवेढा तालुकयातील आरळी गावातील तरुणाने अज्ञात कारणातून विषारी औषध प्राशन केले. हा प्रकार मंगळवारी रात्री १० च्या सुमारास उघडकीस आला. दराप्पा कांतू भांजे (वय २८, रा. आरळी ता. मंगळवेढा) असे तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री १० च्या सुमारास घरी असताना, दराप्पा याने अज्ञात कारणातून पिकावर फवारणी करण्याचे औषध प्राशन केले. त्यानंतर त्याला खासगी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात रात्री ११.४० वाजता मित्र अंकलगी याने दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### गरम पाणी पडल्याने भाजून महिला जखमी

**सोलापूर, दि. २ जुलै -**

अंघोळीसाठी सिलेंडर गॅसवरील गरम पाणी उतरताना पडल्याने हात भाजून महिला जखमी झाली. हा प्रकार बुधवारी सकाळी ६.४५ वाजता अक्कलकोट रोडवरील गांधी नगरात घडला. महादेवी रविकांत कोळी (वय ४०) असे भाजून जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. बुधवारी सकाळच्या सुमारास महादेवी या महिलेने घरातील सिलेंडर गॅसवर पाणी गरम केले. ते अंघोळीसाठी उतरत असताना अचानक ते गरम पाणी हातावर पडून तेथे भाजले. यानंतर त्यांना भाऊ अविनाश याने सकाळी ८.१० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### आसरा चौकात दोन दुचाकींची धडक

**सोलापूर, दि. २ जुलै -**

शहरातील आसरा चौकात दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन दोघेजण गंभीर जखमी झाले. याबाबत समीर आजमोद्दीन नदाफ (वय २६, रा. मद्रे, ता. दक्षिण सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन



एमएच १३ ईजी ६१२५ क्रमांकाच्या दुचाकीस्वारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ जून रोजी सायंकाळी समीर नदाफ हा त्याच्या एमएच १३ ईजी ७४०३ क्रमांकाच्या दुचाकीवरून होटगी रोडने गावाकडे जात होता. त्यावेळी आसरा चौकात एमएच १३ ईजी ६१२५ क्रमांकावरील दुचाकीस्वाराने रॉंग साईडने दुचाकी चालवून नदाफ याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यामध्ये नदाफ व समोरील दुचाकीवरील स्वार हे दोघे जखमी झाले. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

# आषाढीच्या पार्श्वभूमीवर उत्पादन शुल्कची कारवाई

■ १४ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहर व जिल्हा परिसरात केलेल्या अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रावर/अवैध देशी-विदेशी मद्य विक्री वाहतुकीवर व अवैध धाब्यावर केलेल्या धडक कारवाईत १५ गुन्हे दाखल करून १४ लाख ४५ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.



१ जुलै रोजी सोलापूर जिल्ह्यात राबविलेल्या विशेष मोहिमेत सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निमिती केद्रावर/अवैध देशी-विदेशी मद्य विक्री व वाहतुकीवर धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये १५ गुन्हे दाखल करण्यात येऊन लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यामध्ये ९,५५० लिटर रसायन नष्ट करण्यात येऊन २३५ लिटर हातभट्टी दारु जप्त करण्यात आली. १९४.२२ बल्क लिटर देशी मद्य, ३०.२४ बल्क लिटर विदेशी मद्य, ७८ बल्क लिटर बिअर जप्त करण्यात आली. या कारवाईत एका चार चाकी वाहनासह १४ लाख ४५ हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर कारवाई अधिक्षक भाग्यश्री जाधव, उपअधिक्षक एस आर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक आर. एम. चवरे, जे. एन पाटील, से व्ही घाटगे, राकेश पवार, पंकज कुंभार, सचिन भवड तसेच दुय्यम निरीक्षक एस डी कांबळे, नागरे, सुखदेव सिद, पोवार, सचिन शिंदे, श्रीमती अंजली सरवदे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, मोहन जाधव, संजय चव्हाण, विजय पवार, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, प्रशांत इगोले अनिल पांढरे, विनायक काळे, पवन उगले, योगीराज तोग्गी,रेवणसिध्द कांबळे, स्वप्निल आरमाळ, योगेश गाडेकर, महिला जवान शिवानी मुढे, दिपाली सलगर, दिपक वाघमारे व सानप यांनी केली.

### जून महिन्यात २२९ गुन्ह्यांमध्ये २१४ जणांना अटक १ कोटीचा मुद्देमाल जप्त...

१ जून ते ३० जून २०२५ या कलावधीत रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर यांची सोलापूर शहर व जिल्ह्यात केलेल्या अवैध हातभट्टी निमिती केद्रावर अवैध देशी-विदेशी मद्य विक्री व वाहतुकीवर केलेल्या कारवाईत २२९ गुन्हे नोंद करण्यात आले असुन २१४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत ६५,५५० लिटर रसायन, ५७९३ लिटर हातभट्टी दारु, ४९९ बल्क लिटर देशी मद्य, १२८ बल्क लिटर विदेशी मद्य, १०२.३२ बल्क लिटर बिअर, २४६७ लिटर ताडी, १२६० बल्क लिटर गोवा बनावटीचे विदेशी मद्य तसेच २७ वाहनासह १ कोटी ३ लाख ३७ हजार २३८ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सोलापूर शहर परिसरात अवैध मद्य विक्री करणा-या व मद्य पिण्यास परवानगी देणा-या एकूण २७ ढाब्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

## पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

घर बांधण्यासाठी तसेच चारचाकी गाडी घेण्यासाठी माहेरून पैसे आणावेत म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत स्वाती धनंजय भोसले (वय २४, रा. जोशी गल्ली रविवार पेठ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती धनंजय, सासू मिनाक्षी, सासरे बळवंत, जाऊ काजल, नणंद मनिषा, नंदवा विनोद (सर्व रा. अस्वले कॉलनी, एमआयडीसी महाबळ मेंटल, मिरज, जि. सांगली) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ फेब्रुवारी २०१९ ते १ जुलै २०२५ या कालावधीत स्वाती हा पती धनंजय याच्यासोबत सासरी नांदण्यास होत्या. या कालावधीत पती व त्याच्या घरातील लोकांनी स्वाती हिस किरकोळ कारणावरून संसार उपयोगी साहित्यावरून शारीरीक व मानसिक त्रास देऊन छळ केला. तसेच पती धनंजय हा दारू पिऊन स्वातीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करीत. त्याचप्रमाणे सासरच्या मंडळींनी घर बांधकामासाठी एक लाख रुपये तसेच चार चाकी गाडी घेण्यासाठी ५ लाख रूपये माहेरून घेऊन ये अशी मागणी करून स्वातीचा जाचहाट केला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यता आला आहे. हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत.

## शिक्षणाधिकाऱ्याला काम करू न देणाऱ्या शिक्षकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. २ जुलै -**

जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागात येऊन शिक्षणाधिकाऱ्याला शासकीय कामकाज करू न देणाऱ्या शिक्षकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विठ्ठल दिगंबर ढेपे (वय ४९, रा. खंडोबा मंदीरसमोर, बाळे, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मल्लिकार्जुन पाटील (रा. जेऊर, ता. अक्कलकोट) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जून रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागात येऊन मल्लिकार्जुन पाटील यांनी शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना शिक्षण विभागातील कुठलेही शासकीय कामकाज करू दिले नाही व शासकीय कामकाजात अडथळा आणला. म्हणून पाटील यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक कुलकर्णी पुढील तपास करीत आहेत.

## सराईत गुन्हेगार
## नाईट्या नलावडे कारागृहात स्थानबध्द

■ चालू वर्षातील पोलिस आयुक्तांची १२ वी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

शहरातील फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार नाईट्या नलावडे यास पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी एम पीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. त्यानुसार नाईंट्यास घेऊन पोलिसांचे एक पथक येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे. चालू वर्षात पोलिस आयुक्तांकडून एमपीडीएअंतर्गत करण्यात आलेली ही १२ वी कारवाई आहे.



ओंकार उर्फ नाईंट्या संतोष नलावडे (वय २५, रा. सुंदराबाई डागा शाळेजवळ, बांध वस्ती, दमाणी नगर, सोलापूर) असे एम पीडीएअंतर्गत स्थानबध्द करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे.

नाईंट्यावर मागील काही वर्षापासून जीवघेणा हल्ला करणे, लोकसेवकाला जबर दुखापत पोहोचवणे, विनयभंग करणे, जबरी चोरी, खंडणी मागणे, दगडफेक करणे, घातक शस्त्रांनी धमकाविणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. नाईंट्याविरुध्द गंभीर स्वरूपाचे ७ तर १ अदखलपात्र गुन्हा दाखल आहे. त्याच्या गुन्हेगारी कारवायांवर अंकुश बसविण्यासाठी सन २०२१ व २०२२ मध्ये त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तरीही नाईंट्याच्या गुन्हेगारी वर्तनात कोणताच बदल झालेला नाही आणि त्याने गुन्हेगारी कारवाया सुरुच ठेवल्या



होत्या. त्यामुळे त्याच्यावर एमपीडीएअंतर्गत कारवाई करून कारागृहात स्थानबध्द करण्याबाबतचा प्रस्ताव फौजदार चावडी पोलिसांकडून पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस आयुक्तांनी मंजुरी देत नाईंट्यास कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले. ही कारवाई पोलिस उपायुक्त विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, अरविंद माने, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, हवालदार विनायक संगम वार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

## शहरातील परिमंडळात होणार ४ नवीन रेशन दुकाने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२ जुलै-**

शासनाच्या धोरणाप्रमाणे सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ करोसीन परवाने तसेच ठेवून, आजमितीस रद्द असलेली व यापुढे रद्द होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची नवीन तसेच विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची नवीन रास्त भाव दुकाने मंजूर करण्यात येत आहेत. यामध्ये सोलापूर शहरातील परिमंडळात ४ नवीन रेशन दुकाने होणार असल्याची माहिती सोलापूर शहर व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पाडुळे यांनी दिली.



शासन धोरणानुसार अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी सोलापूर शहरामधील सर्व परिमंडळ अधिकारी यांना लेखी पत्र देऊन जाहिरनामा प्रसिध्द करणे बाबतची विहीत नमुन्यातील माहिती मागविण्यात आली होती. सदर प्राप्त माहितीच्या आधारे अन्नधान्य वितरण अधिकारी सोलापूर यांनी जिल्हाधिकारी यांची नवीन जाहिरनामा प्रसिध्दीकरणास परवानगी घेऊन दि. ३० जुन २०२५ रोजी खालील ठिकाणी नवीन दुकान मंजूरीसाठी जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर जाहिरनामा पाहणेसाठी सर्व परिमंडल अधिकारी सोलापूर शहर व अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.तरी सर्व इच्छूक महानगरपालिका, नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था, महिला स्वयंसहाय्यता बचत गट व म हिलांच्या सहकारी संस्था यांनी विहीत नमुन्यात संबंधित परिमंडल अधिकारी सोलापूर शहर यांचे कार्यालय येथे दिनांक : ०१ जुलै २०२५ पासून ३१ जुलै २०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वतः सादर करावेत. सदरील अर्ज परिमंडल अधिकारी कार्यालय सोलापूर शहर येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. त्याचे शुल्क घेऊन अर्ज संबधितास उपलब्ध होतील. यामध्ये परिमंडळ अ विभाग सोलापूर शहर -दुकाने शुक्रवार पेठ व बुधवारपेठ- एकूण संख्या २, परिमंडळ ब विभाग सोलापूर शहर दुकाने -गुरूवार पेठ व पूर्व मंगळवार पेठ एकुण संख्या-२ अशी एकूण ४ दुकाने नव्याने निर्माण करण्यात येणार आहेत.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पंढरीत

**सोलापूर, दि. २ जुलै-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या आषाढी वारीचा सोहळा अवघ्या ३ दिवसांवर येवून ठेपला असून, या वारीत येणाऱ्या भाविकांच्या सोयींची आढावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरूवारी (दि. ३) येत आहेत. सकाळी १० वाजता मुंबईतून विमानाने निघून सोलापुरात सकाळी १०:४५ वाजता पोहोचतील. सोलापूरहून हेलिकॉप्टरने निघून पंढरीत ११:१५ वाजता पोहोचतील. ११:४५ वाजता ते आषाढी निमित्त वारकऱ्यांकरिता केलेल्या सोयी-सुविधांचा आढावा घेणार असून, पंढरीतील महत्वाच्या स्थळांची पाहणीही करणार आहेत. यानंतर दुपारी २ वाजता ते सोलापूर विमानतळाकडे येणार असून, सोलापूरहून दुपारी २:१५ वाजता मुंबईकडे प्रयाण करतील.

### कायदेशीररित्या अनुकंपतत्वावर शिक्षक भरती केल्या प्रकरणी
## शिक्षणाधिकाऱ्यास अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

अनुकंप तत्वावर श्रीशैल शिवशंकर स्वामी यांची बेकायदेशीर रित्या शिक्षक म्हणून नियुक्ती केल्याप्रकरणी तत्कालीन शिक्षणाधिकारी भास्कर शिवाजीराव बाबर (वय ६०, रा. विश्रामबाग, सांगली) यास जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. जे. कटारिया यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.



अक्कलकोट तालुका येथे श्रीमती धोंडूबाई शिक्षण प्रसारक मंडळ, चुंगी ही संस्था असून सदर संस्थेची कुरनूर येथे नागनाथ विद्या विकास प्रशाला आहे. संस्थेचे अध्यक्ष केशवराव माने हे मयत झाले. त्यानंतर सन २०२२ पासून स्वामीराव पाटील हे संस्थेचे अध्यक्ष असून सदर संस्थेचे संपूर्ण दप्तर हे केशवराव माने यांचा मुलगा महादेव माने यांच्या ताब्यात आहे, तो शाळेचा मुख्याध्यापक असून संस्थेचा कारभार तोच पाहतो.

शिक्षक श्रीशैल स्वामी याचे वडील शिवशंकर स्वामी यांनी ३ सप्टेंबर २०१४ रोजी स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. शासनाच्या अनुकंप तत्व या धोरणाचा लाभ घेण्यासाठी संबंधित कर्मचारी सेवेत असणे गरजेचे असते. शिक्षक श्रीशेल स्वामी यांच्या वडिलांनी स्वेच्छा निवृत्ती घेऊन देखील अनुकंप तत्वाखाली शिक्षक श्रीशैल स्वामी यांची बोगस ठराव करून बेकायदेशीररित्या नेमणूक केली व तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी कोणती चौकशी न करता त्यास मंजुरी दिली अशा आशयाची फिर्याद संस्थेचे अध्यक्ष स्वामीराव पाटील यांनी अक्कलकोट पोलीस ठाण्यात दिली होती.

या अटक होऊ नये म्हणून त्यांनी अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणीवेळी आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद मान्य करून न्यायाधीशांनी ५० हजार रुपयाच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला.

यात सरकारतर्फे ॲड प्रकाश जन्नू यांनी तर आरोपीतर्फे ॲड मिलिंद थोबडे, ॲड सतीश शेटे यांनी काम पाहिले.

## पालिकेच्या बांधकाम परवानगी घोटाळ्यातील दोन्ही अभियांत्यांचे दोष मुक्तीसाठी न्यायालयात अर्ज

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

येथील सोलापूर महानगर पालिका मधील बेकायदेशीर बांधकाम परवानगी बाबत दाखल झालेल्या खटल्यात सहाय्यक अभियंता झाकीर हुसेन नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता श्रीकांत खानापुरे या दोघांनी दोषमुक्तीचा अर्ज मुख्य न्याय दांडाधिकारी यांच्या न्यायलायात दाखल केला आहे.



जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत सोलापूर महानगरपलिका बांधकाम परवाना विभाग येथे सहायक अभियंता झाकिरहुसेन नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता श्रीकांत खानापुरे इतर दोघे कर्मचारी यांनी संगनमताने महापालिकेची व मिळकतदाराची जाणीवपूर्वक त्यांचे फायद्यासाठी फसवणूक केलेली आहे व जे बांधकामाचे नकाशे मंजूर करण्याचे अधिकार त्यांना नाहीत हे माहीत असूनही त्यांनी ते मंजूर केल्याचे कागदपत्रे तयार करून मिळकतदाराची व महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे व खोटे व बनावट बांधकाम परवाने त्यांना दिले आहेत. तसेच सदर बांधकाम परवाने मंजूर केल्या बाबतचे आवक रजिस्टर व नमूद अनधिकृत बांधकाम परवाना क्र. ०१ ते ९६ संदर्भात मंजूर करण्यात आलेल्या संदर्भाने सर्व दस्त हे जाणीवपूर्वक नाश अथवा त्याची विल्हेवाट अथवा ते कोठेतरी स्थलांतरित केले व महापालिकेकडे केवळ कमी विकास शुल्क जमा करण्यास लावून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे म्हणून महापालिका उपअभियंता मठपती यांनी वरील मजकुराचा गुन्हा दाखल केला.

त्यानंतर पोलिसांनी तपास करून मुख्य न्यायदांडाधिकारी कोर्टात आरोप पत्र दाखल केले. त्या आरोप पत्राची दखल घेऊन आरोपींना न्यायालयात हजर राहणे बाबत सम्मान्स काढले होते. त्याप्रमाणे सहाय्यक अभियंता झाकीर हुसेन नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता श्रीकांत खानापुरे मेहरबान कोर्टासमोर हजर झाले. व त्यांनी सदर खटल्यातून आपल्याला दोष मुक्त करावे असा विनंती अर्ज न्यायालयासमोर सादर केला त्यामध्ये त्यांनी असे मुद्दे मांडले की प्रकरणात फसवणूक,बनावट कागदपत्रे किंवा आर्थिक नुकसान याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा नाही. त्यामुळे खटल्यातून मुक्तता करावी.

अशा प्रकारचा विनंती अर्ज न्यायालयासमोर सादर केला. मा. न्यायालयाने त्या अर्जावर सरकारी वकील व तपास अधिकारी यांनी ३० जुलै २०२५ पावेतो म्हणणे दाखल करावे असा आदेश पारित केला.या प्रकरणाची पुढील सुनावणी ही दिनांक ३० जुलै २०२५ रोजी नेमलेली आहे. याप्रकरणात अभियंता आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. देवदत्त बोरगावकर, ॲड. रणजीत चौधरी, ॲड. प्रणव उपाध्ये यांनी काम पाहिले.

## शेतकऱ्यांच्या सौर पंपाच्या समस्यांवर मोबाईलवरून तक्रारीची सुविधा

■ राज्यात बसविले ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले असून, सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाईल ॲपवरूनही नोंदविण्याची सुविधा महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

महावितरणने लाभार्थी शेतकऱ्यांना सौर कृषी पंप बिघडल्यास तक्रार करण्यासाठी यापूर्वी वेबसाईटवरून तक्रार करणे, संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रार करणे किंवा महावितरणच्या टोल फ्री क्रमांकावर फोन करून तक्रार करणे असे तीन पर्याय उपलब्ध करून दिले होते. आता मोबाईल फोनवरील



महावितरणच्या ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावितरणचे मोबाईल ॲप लोकप्रिय ठरले असून, वीज ग्राहक त्याचा वापर आपले वीज बिल जाणून घेणे, बिल भरणे यासह मीटर रिडिंग नोंदणी, वीज चोरी कळविणे, नादुरुस्त ट्रान्सफॉर्मरची माहिती कळविणे अशा विविध कामांसाठी करत आहेत. त्याच प्रमाणे आता शेतकऱ्यांना या मोबाईल ॲपमध्ये 'सौर पंप तक्रार' यावर क्लिक करून सौर कृषी पंपाविषयी तक्रार दाखल करता येईल. तक्रार नोंदविताना शेतकऱ्याने सौर कृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहिणे गरजेचे आहे.

## महत्वाचे...



### ज्योतिष वास्तु विश्व संशोधन केंद्राचे पुरस्कार वितरित

**पुणे, दि. २ जुलै-**

पुणे येथील ज्योतिष वास्तू विश्व संशोधन केंद्राच्या द्वारे गाणपत्य तत्वज्ञान आणि संस्कृत साहित्याच्या प्रचार प्रसारासाठी विद्यावाचस्पती प्रा. स्वानंद गजानन पुंड यांना शारदा पुरस्काराने, योगीराज वेद विज्ञान आश्रम कासारवाडी येथील चैतन्य नारायण काळे गुरुजी यांना वेद संवर्धन प्रेरणा पुरस्काराने, वेदमूर्ती दत्तात्रेय मनोहर साधले यांना वेद मार्ग दीपस्तंभ पुरस्काराने तथा अभिनव ज्योतिष मंडळ सोलापूर येथील दाते पंचांगकर्ते मोहन धुंडिराज, शास्त्री दाते यांना रत्नमाला पुरस्काराने गौरवान्वित करण्यात आले. सुप्रसिद्ध ज्योतिर्विदा शुभांगी पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात संस्थेचे सर्वेसर्वा वेदमूर्ती उमेश रमेश कुलकर्णी यांच्या हस्ते, मालती तांबोळकर, अंजली पोतदार यांच्या उपस्थितीत सर्व मान्यवरांना या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या द्वारे घेण्यात आलेल्या वास्तू विशारद, वास्तू भूषण, अंकविशारद, लोलक विशारद, संसार सुखाचा कसा करावा? इत्यादी अभ्यासक्रमांच्या परीक्षांमध्ये यशस्वी १७५ विद्यार्थ्यांना देखील प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. श्रुती पिसे, प्रिया सागर, डॉ. दिनेश सिंगाराम यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्राची परांजपे यांनी केले.



### भरधाव वेगाने कंटेनर चालवणाऱ्यास पकडल्याने अपघातासारखा टळला अनर्थ

**सोलापूर, दि. २ जुलै -**

कोंडी येथून भरधाव जाणाऱ्या केए ६३ - ८६१२ क्रमांकाच्या कंटेनरचा पोलिसांनी पाठलाग करून चालकाविरुद्ध न्यायालयात खटला पाठवून देण्यात आला. त्यास वेळीच पकडल्याने अपघातासारखा अनर्थ टळला असल्याचे पोलिसांनी सांगितले. सहायक पोलीस आयुक्त राजन माने यांचा वाहन चालक पोलिस शिपाई पाटील यांना तो कंटेनर जुना पुणे नाका येथून विरूध्द दिशेने हैद्राबाद रोडकडे जाताना दिसला. त्यामुळे, त्यांनी सदर कंटेनरचा पाठलाग करून याबाबतची माहिती नियंत्रण कक्ष येथे कळविली. त्यानंतर नमूद कंटेनर शेळगी ब्रीजजवळ पकडला. त्या वाहन चालकाकडे चौकशी करून त्यास जोडभावी पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार यांच्या ताब्यात देण्यात आले. त्या चालकाविरूध्द मोटार वाहन अधिनियम कलम १८४ प्रमाणे खटला भरून न्यायालयात पाठवून दिला, त्यावर न्यायालयाने त्या वाहन चालकास ४, ००० रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. त्याचप्रमाणे, नमूद कंटेनरवर पेंडीग असलेला एकूण १३,७०० रूपये दंडाचा भरणा करून घेतला. ही कामगिरी पोलिस शिपाई सचिन जावळे, अमित पाटील, शहर वाहतूक शाखेकडील पोलिस उपनिरीक्षक इंगळे, तसेच जोडभावी पेठ पोलीस ठाणेकडील हवालदार चेतन रूपनर, लक्ष्मण घोडके यांनी केली.



### निलम नगरातील गुंठेवारी नियमित मोजणी नोंदणी शिबिरास प्रतिसाद

**सोलापूर, दि. २ जुलै-**

हद्दवाढ भागातील दक्षिण पूर्व मंडळमधील निलम परिसरातील नागरिकांसाठी आमदार सुभाष देशमुख यांनी आयोजित केलेल्या गुंठेवारी नियमित मोजणी नोंदणी शिबिरासाठी शेकडो कुटुंबांनी प्रतिसाद दिला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक मनिष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. १९९२ साली शहराची हद्दवाढ झाल्यानंतर एकूण १३ गावे सोलापूर शहरात समाविष्ट झाली. त्यावेळी कच्च्या आराखड्यावर गुंठेवारी खरेदी - विक्री झाली होती. शासन नियमाप्रमाणे गुंठेवारी जागेची खरेदी विक्री आणि बांधकामासाठी बांधकाम परवाना मिळत नसल्याने हजारो नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. आता शासनाकडून गुंठेवारी नियमित करण्याबाबत आदेश पारित झाल्याने हजारो नागरिकांना गुंठेवारी नियमित करता येणार आहे. या शासन निर्णयाचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांच्यातर्फे निलम नगरात हे शिबिर पार पडले. निलम नगर, आकाशवाणी केंद्र, स्वागत नगर परिसरातील नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी डेप्युटी डायरेक्टर टाऊन प्लॅनिंग मनीष बिशनोईकर, शशी थोरात, अर्जुन जाधव, आनंद गदगे, सोमनाथ केंगनाळकर, बसू केंगनाळकर, योगेश कुरी उपस्थित होते.

# सपाटेंच्या फोटोला जोडेमार आंदोलन

## सपाटे सांस्कृतिक भवनचे नाव बदलून बाबासाहेब गावडे केले

## मनोहर सपाटेंविरोधात मराठा समाज आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १ जुलै -**

माजी महापौर मनोहर सपाटे यांच्याविरोधात मराठा समाज चांगलाच आक्रमक झाला असून बुधवारी सकाळी मराठा समाजाच्यावतीने सपाटें यांच्या लकी चौकातील शिवपार्वती लॉजसमोर जोडेमार आंदोलन करून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर मराठा मंदीर येथील सांस्कृतिक भवनला दिलेले मनोहर सपाटे सांस्कृतिक भवनचे नावातील मनोहस सपाटे ही अक्षरे काढून पुन्हा त्या भवनचे नाव समाजभूषण बाबासाहेब गावडे सांस्कृतिक भवन करण्यात आले. त्यानंतर पोलिस आयुक्त एम राजकुमार यांची भेट घेऊन सपाटेंवर एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन देण्यात आले.





एका महिलेवर लैंगिक अत्याचार प्रकरणी समाज माध्यमांमधून एक खळबळजनक व्हिडिओ व्हायरल झाला होता. याबाबत सपाटे याच्यावर गुन्हा दाखल झाला असून पुढील न्यायालयीन प्रक्रिया सुरू आहे. शहरातील मराठा सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी महाराज प्रशालेवर गेल्या ३० हून अधिक वर्ष अध्यक्ष असलेल्या सपाटेमुळे मराठा समाजाची संस्था असलेल्या प्रशालेची बदनामी होत असल्यामुळे सपाटें यांना अध्यक्ष पदावरून ताबडतोब हकालपट्टी करावी यासाठी मराठा समाज एकवटला असून मंगळवारी सायंकाळी बुधवारच्या आंदोलनाबाबत बैठक घेण्यात आली होती.

या बैठकीत ठरलेल्या निर्णयानुसार बुधवारी सकाळी सपाटें यांच्या लकी चौकातील हॉटेल शिवपार्वती येथे मराठा समाजाच्यावतीने सपाटेंच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. त्यानंतर समाजातील लोकांनी मराठा मंदीर येथील मनोहर सपाटे सांस्कृतिक भवनच्या नावातील मनोहर सपाटे ही अक्षरे तोडून काढून या भवनचे पुन्हा समाजभूषण बाबासाहेब गावडे सांस्कृतिक भवन असे नामकरण केले. त्यानंतर समाजबांधवांनी पोलिस आयुक्तालयात पोलिस आयुक्त एम राजकुमार यांची भेट घेऊन सपाटेंवर एमपीडीएअंतर्गत कारवाई करण्याची निवेदनाद्वारे मागणी केली. यावेळी सपाटेंवर बलात्काराचा गुन्हा दाखल करून त्याच्यावर २६ गुन्हे दाखल असल्याचे सांगून त्याला कारागृहात स्थानबध्द करण्याची मागणी केली.

यावेळी सपाटेंच्या कृत्यामुळे मराठा समाजाची संस्था बदनाम होता कामा नये, यासाठी सपाटेंना मराठा समाजाच्या संस्थेतून पाय उतार करून त्यांच्या तावडीतून संस्था सोडविल्याशिवाय गप्प बसणार नसल्याचे अनेकांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

यावेळी मराठा समाजातील दिलीप कोल्हे, सुनिल रसाळे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, प्रताप चव्हाण, अमोल शिंदे, सुनिल शेळके, विनोद भोसले, माऊली पवार, बाळासाहेब पुणेकर, प्रकाश ननवरे, ॲड. हरिदास जाधव, तुकाराम मस्के, किरण पवार, शेखर फंड, योगेश पवार, दादा सुरवसे, विजय पोखरकर, हरिदास चौगुले, लहू गायकवाड, अनंत जाधव, बजरंग आवताडे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तीन दिवसाआड पाणीपुरवठ्यासंदर्भात महापालिका प्रशासनात समन्वयाचा अभाव

- आयुक्त म्हणतात, तोपर्यंत तीन दिवसाआड पाणी अशक्य
- कोणतीही अधिकृत माहिती आम्हाला दिलेली नाही : कारंजे
- आरोग्य अभियंता चौबे यांचा ''एकला चलो रे'' कारभार?

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

शहराचा पाणीपुरवठा सुरळीत आणि नियमित करण्यासंदर्भात महापालिका प्रशासनात समन्वयाचा अभाव दिसत असून एकीकडे महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे हे तीन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला असल्याचे सांगतायत तर दुसरीकडे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे अंतर्गत जलवाहिनी आणि पुरेशा पाण्याच्या टाक्याचे काम झाल्याशिवाय तीन दिवसाआड पाणीपुरवठा अशक्य असल्याचे स्पष्ट करतात. कोणतीही अधिकृत माहिती आम्हाला दिलेली नसल्याचे नियंत्रण अधिकारी संदीप कारंजे यांनी म्हटले आहे. यामुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या सोलापूर शहरात चार आणि पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. काही ठिकाणी लोकांना आठवड्यात एकदाच पाणी मिळते. कधी विजपूरवठा खंडित होतो तर कधी जलवाहिनीला गळती लागते. त्यामुळेदेखील पाणीपुरवठा विस्कळीत होतो. पुरेसे पाणी नाही, पाण्याला दाब नाही आणि वेळेवर पाणी नाही अशा तक्रारी सातत्याने सुरु आहेत. सोलापूर ते उजनी समांतर जलवाहिनीचे काम पुर्ण झाले. या जलवाहिनीची चाचणीदेखील यशस्वी झाली. १७० एमएलडी पाणी दररोज मिळणार असे महापालिकेकडून सांगण्यात आले. जवळपास आठशे कोटी रुपये खर्च करुन समांतर जलवाहिनीचे काम पुर्ण करण्यात आले. इतकी मोठी रक्कम खर्च झाल्यानंतर शहराला त्याचा किती फायदा झाला असा प्रश्न महापालिकेला कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांच्या मनात आहे. महापालिका अधिकारी मात्र याचे थेट उत्तर देणे टाळत असल्याचे दिसते.दोन दिवसापूर्वी महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी समांतर जलवाहिनीमुळे शहराच्या पाणीपुरवठ्यात एक दिवसाचा फरक पडेल असे सांगितले होते. जिथे चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो तिथे तीन दिवसाआड पाणी मिळेल असे सांगून याबाबत एक जुलैपासून काही भागात प्रयोग यशस्वी झाल्याची माहितीही दिली. उर्वरित भागात पाच ऐवजी चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जाईल हेदेखील चौबे यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठ्याचा एक दिवस कमी करताना वेळेत अर्धा तासाची कपात करण्यात येईल, असेही सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी म्हटले होते.



बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती देताना महापालिका आयुक्त आणि इतर वरिष्ठ अधिकारी यांनी या विषयावर कानावर हात ठेवले. शहरातील अंतर्गत वितरण व्यवस्था जोपर्यंत पुर्ण होणार नाही तोपर्यंत पाण्याचे दिवस कमी होणार नाहीत, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. व्यंकटेश चौबे यांनी दिलेली माहिती चुकीची आहे का असे विचारले तेव्हा ते त्यांनाच विचारा असेही आयुक्तांनी उत्तर दिले. तर दुसरीकडे पाणीपुरवठा विभागाचे नियंत्रण अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे म्हणाले, शहरातील काही भागात प्रायोगिक तत्त्वावर तीन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे अशी प्राथमिक माहिती आहे. परंतु या विभाग प्रमुखांनी याबाबतीत कोणतीही अधिकृत माहिती आम्हाला दिलेली नाही. चौबे कोणत्या आधारावर तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन लोकांना देत आहेत याचीही कल्पना आम्हाला नाही, असेही कारंजे म्हणाले. यावरून आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे हे नियंत्रण अधिकाऱ्यांशी समन्वय साधत नाहीत. त्यांचा कारभार ''एकला चलो रे'' सारखा होत असल्याचे दिसून येते. पाण्यासारख्या अत्यंत गंभीर आणि संवेदनशील विषयावर महापालिका प्रशासनाकडून पोरखेळ सुरु आहे. व्यंकटेश चौबे यांना आयुक्तांनी काही दिवसापूर्वी सार्वजनिक आरोग्य अभियंता पदाचा पुर्णवेळ स्वतंत्र कार्यभार दिला आहे. चौबे यांनी त्यापूर्वी स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज दिला होता. त्यांची सेवा आणि क्षमता विचारात घेऊन आयुक्तांनी त्यांचा अर्ज नामंजूर केला. उप अभियंता तपन डंके यांना बाजुला करुन स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी असलेले चौबे यांना पाणीपुरवठ्याची जबाबदारी दिली. आता चौबे यांच्या नियोजनावर आयुक्तांचा विश्वास नाही का ? प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यातील हा विसंवाद तसेच समन्वयाचा अभाव यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्याचा खेळखंडोबा होत आहे. यामुळे वरिष्ठ अधिकारी आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता यांच्यात ताळमेळ नसल्याचे तसेच संभ्रम दिसून येत आहे. यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.



### भाजपा प्रदेशाध्यक्षपदाचा कार्यभार रवींद्र चव्हाण यांनी स्वीकारला

**मुंबई, दि. २ जुलै-**

भारतीय जनता पार्टीचे नूतन प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बुधवारी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे सुपूर्द केली. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, राजेश पांडे, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आदी उपस्थित होते.

### चारचाकी वाहनांची ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे चारचाकी वाहनांचा मालकी हक्क कोणीही सांगितला नाही, असे अर्टिगा, मालट्रक, सुमो व जे.सी.बी अशी चारचाकी वाहने सुमारे ५ ते ८ वर्षापासून पडून आहेत. त्या वाहनांची ओळख पटवून ती घेऊन जाण्याचे पोलिसांचे आवाहन आहे.

ही चारचाकी वाहने पोलीस ठाणेच्या आवारात अस्ताव्यस्त पडुन असून त्या वाहनांच्या मालकी हक्काची ओळख पटत नसल्यामुळे वाहनांची निर्गती करणेस विलंब होत आहे. या वाहनांच्या रजिस्ट्रेशन नंबर वरून प्राप्त माहितीचे आधारे मालकांना त्यांचे पत्यावर माहिती दिली आहे. तरीही या कार्यालयात संपर्क केलेला नाही. तरी नमूद वाहनांच्या मालकी हक्काबाबत ज्या कोणाकडे कायदेशीर पुरावा असेल त्यांनी १४ जुलै २०२५ रोजी पर्यत सोलापूर तालुका पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा. चारचाकी वाहनांचे मालकी हक्क सांगणारे कोणी त्याचे कडील पुरावे घेऊन आले नाहीत तर नमूद वाहनांचे कोणीही मालक नाहीत असे गृहीत धरून पोलीस ठाणेस पडुन असलेल्या वाहनांच्या निर्गतीबाबत पुढील कायदेशीर मार्गाचा अवलंब करून निर्गती करण्यात येणार आहे.

# प्लिंथ इंटिमेशन ही नवीन कठोर कार्यपद्धती आता बंधनकारक

## अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी महापालिका आयुक्तांचा निर्णय

- नव्या नियमाची अंमलबजावणी तातडीने सुरू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

सोलापूर महानगरपालिका शहराच्या सुनियोजित विकासासाठी आणि अनधिकृत बांधकामांना कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी आता प्लिंथ इंटिमेशन ही नवी कार्यपद्धती अनिवार्य करण्यात आली आहे.महापालिका आयुक्त डॉ. सचिन यांनी हा एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नव्या नियमावलीची अंमलबजावणी तातडीने सुरू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १ डिसेंबर २०२१ च्या आदेशानुसार, बांधकाम परवानगी प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि जबाबदार बनवण्यासाठी आता प्लिंथ इंटिमेशन अनिवार्य करण्यात आले आहे. या नव्या नियमावलीची अंमलबजावणी दिनांक ३० जून २०२५ पासून तातडीने करण्यात आली आहे. सोलापूर महानगरपालिकेतर्फे युडीसीपीआर नियमावलीनुसार सर्व बांधकाम परवानग्या, सुधारित परवानग्या आणि वापर परवाने नोंदणीकृत परवानाधारक अभियंता किंवा आर्किटेक्ट यांच्यामार्फत संगणकीय प्रणालीद्वारे (बीपीएमएस पोर्टलवर) सादर केले जातात. या प्रस्तावांसोबत, संबंधित अभियंता/आर्किटेक्ट त्यांच्या स्वाक्षरीने देतात, ज्यात मंजूर नकाशानुसार बांधकाम करण्याची त्यांची पूर्ण जबाबदारी असते.



अलिकडच्या काळात असे दिसून आले आहे की, मंजूर नकाशामध्ये नमूद केलेल्या सामासिक अंतराचे सर्रास उल्लंघन करून वाढीव बांधकामे केली जात आहेत. यामुळे केवळ अनियमित आणि अनधिकृत बांधकामांना प्रोत्साहन मिळत नाही, तर अशा तक्रारींमध्येही मोठी वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम शहराच्या सौंदर्यावर आणि नियोजनावर होत आहे. या समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने एक कडक कार्यपद्धती निश्चित केली आहे.

आता नगर रचना विभागाकडून मंजूर होणाऱ्या प्रत्येक बांधकाम परवानगी प्रकरणात, संबंधित नोंदणीकृत परवानाधारक अभियंता/आर्किटेक्ट यांना नियमावलीतील नियम क्र. २.८.४ नुसार-नमुन्यामध्ये प्लिंथ इंटिमेशन देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### नोंदणीकृत व्यावसायिकांनी नियमांचे पालन करावे : आयुक्त डॉ. ओम्बासे

सोलापूर महानगरपालिका या नवीन नियमावलीच्या अंमलबजावणीसाठी पूर्णपणे कटिबद्ध आहे. यामुळे शहराच्या सुनियोजित विकासाला चालना मिळेल आणि अनधिकृत बांधकामांवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येईल. सर्व नागरिक, विकासक आणि नोंदणीकृत व्यावसायिक यांनी या नियमांचे पालन करून महानगरपालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

### नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई निश्चित

या नवीन कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करणे सर्व नोंदणीकृत परवानाधारक अभियंता आणि आर्किटेक्टसाठी अनिवार्य आहे. जे परवानाधारक अभियंता/आर्किटेक्ट या नियमांचे उल्लंघन करतील किंवा योग्य कार्यवाही करणार नाहीत, त्यांना कनिष्ठ अभियंता यांच्यामार्फत तात्काळ नोटीस बजावून खुलासा मागवला जाईल. यानंतर, हा अहवाल उपसंचालक, नगर रचना यांच्याकडे कठोर दंडात्मक कारवाईसाठी आणि आवश्यकतेनुसार परवाना कायमस्वरूपी निलंबित करण्याकरिता प्रस्तावित केला जाईल.

### प्लिंथ इन्टिमेशन म्हणजे काय ?

''प्लिंथ इन्टिमेशन'' म्हणजे इमारतीचे बांधकाम प्लिंथ लेव्हलपर्यंत पोहोचल्याची सूचना किंवा संदेश. प्लिंथ म्हणजे इमारतीचा पाया किंवा पाया, जमिनीपासून पहिल्या मजल्यापर्यंतचा भाग आहे. ही सूचना सामान्यतः संबंधित अधिकाऱ्यांना बांधकामाचा प्रारंभिक टप्पा प्लिंथ लेव्हलपर्यंत पूर्ण झाला, हे कळवावे लागणार आहे.

प्लिंथ इंटिमेशन सादर करताना संबंधित अभियंता/आर्किटेक्ट यांनी बांधकामाच्या प्लिंथ स्तरावरील जिओ-टॅग फोटो बीपीएमएस पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

या फोटोंसह त्यांना प्लिंथ इंटिमेशनमधील काम मंजूर नकाशानुसार, विशेषतः सामासिक अंतराच्या नियमांनुसार झाले असल्याचे प्रमाणित करावे लागेल. या प्लिंथ इंटिमेशनची कार्यवाही १०० टक्के होणे बंधनकारक राहील.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# सांसदीय परंपरांचे व्हावे पालन

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंगळवार, १ जुलै २०२५ रोजी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष, विधानसभेचे माजी अध्यक्ष आमदार नाना पटोले विधानसभेच्याच विद्यमान अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले. स्वतः अध्यक्षपद 'भूषविलेल्या' नाना पटोले यांनी राजदंड उचलण्यासाठी तो हातात घेण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आ. पटोले यांना वारंवार समजावण्याचा प्रयत्न केला. पण पटोले काही ऐकत नव्हते. अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन ते वाद घालतच राहिले. आपण विधानसभा अध्यक्ष राहिले आहात, आपण असे वर्तन करणे योग्य नाही, हे आपल्यासारख्याला शोभत नाही आपल्याकडून अशा भाषेची अपेक्षा नाही असे ॲड. नार्वेकर यांनी वारंवार सांगूनही काही उपयोग झाला नाही.

राजदंडाला हात लावल्यास काय कारवाई करायची याचा नियम तुम्हीच अध्यक्ष असताना बनविला होता याचीही आठवण आ. पटोले यांना यावेळी करून देण्यात आली. पण काही उपयोग झाला नाही. पटोले यांची दांडगाई सुरूच रहिली. अखेर माजी अध्यक्ष पटोले यांनीच ठरवून दिलेल्या नियमानुसार आमदार पटोलेंवरच कारवाई करणे विद्यमान विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांना भाग पडले. त्यांनी नाना पटोले यांना दिवसभरासाठी निलंबित करून टाकले. निलंबन झाल्यानंतरही पटोलेंचा हेका सुरूच होता. सभागृहाबाहेर जाण्यासाठी त्यांना वारंवार समज देण्यात आली. तरी ते ऐकेचनात. अखेर आ. पटोले यांचे समर्थक, विरोधी पक्षाच्या नेत्यांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला. आ. पटोलेंचे एक दिवसाच्या निलंबनावर निभावले नाही, तर विधानसभा अध्यक्षांना अधिक कडक शिस्तभंग कारवाई करावी लागली असती.

मुळात आमदार नाना पटोले यांनी शून्य तासात आक्रमक होत मंत्री माणिकराव कोकाटे आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ सदस्य बबन लोणीकर यांनी सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा आरोप करून त्यांनी माफी मागावी अशी मागणी केली. अशी मागणी करणे विरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांचे काहीच चूक नव्हते, पण चुकली ती पद्धत. सांसदीय कामकाजाच्या पद्धतीनुसार त्यांनी पुढे जायला हरकत नव्हती. पण त्यांना घाई झाली आणि त्यातूनच असे काही घडले. कदाचित 'हिरो' होण्याच्या भावनेतूनही असे घडले असावे. म्हणूनच तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, 'एखाद्या विषयावर भावना व्यक्त करणे वेगळे, पण अध्यक्षांवर धावून जाणे अशोभनीयच' असे म्हटले आहे.

उबाठा गटाचे आमदार अनिल परब यांनी विधान परिषदेत राज्याचे महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर रेतीचोरीचा गंभीर आरोप केला. आ. परब यांनी सभागृहात पुरावे असल्याचा दावा करत, या राज्यमंत्र्यांवर कारवाईची मागणी केली. या आरोपांमुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला. सत्ताधारी पक्षाने या आरोपांना बिनबुडाचे ठरवत खंडन केले, तर विरोधी पक्षाने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी लावून धरली. १ जुलै २०२५ रोजी प्रकाशित एका बातमीनुसार, आमदार नाना पटोले यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारवर तीव्र टीका केली होती. त्यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना सत्ताधारी पक्षाने त्यांच्यावर सभागृहातील शिस्तभंगाचा आरोप लावला. यामुळे सभागृहाचे कामकाज काही काळ विस्कळीत झाले, अशी सारवासारव विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या घटनाक्रमाच्या संदर्भात केली आहे.

नाना पटोलेंच्या निलंबनाचा मुद्दा हा २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील वादाच्या पृष्ठभूमीवर पाहता येतो. मार्च २०२५ मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, विशेषतः धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्यावर. या अधिवेशनातही विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली होती, ज्यामुळे सभागृहाचे कामकाज अनेकदा खंडित झाले होते. याचप्रमाणे, उबाठाचे आमदार अनिल परब यांनीही, विशेषतः महसूल खात्याशी संबंधित मुद्यांवर यापूर्वीही अनेकदा सभागृहात आक्रमक भूमिका घेतलेली आहे. या अधिवेशनात राज्य सरकारने लाडकी बहीण योजना, शिवभोजन थाळी आणि इतर कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला.

लाडकी बहीण योजनेसाठी निधी वितरण आणि त्याच्या अंमलबजावणीवर चर्चा झाली. विरोधी पक्षाने या योजनेच्या निधीवाटपात गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला, तर सत्ताधारी पक्षाने योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचा दावा केला. तसेच सत्ताधारी पक्षाने 'स्टॅण्डअप कॉमेडियन' कुणाल कामरा याच्यावर कारवाईची मागणी सभागृहात लावून धरली. कामरा याने एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गाण्याच्या माध्यमातून टीका केली होती, ज्याला सत्ताधारी पक्षाने अवमान मानला. यावरून सभागृहात तीव्र चर्चा झाली आणि सत्ताधारी पक्षाने कठोर कारवाईची ग्वाही दिली. अशा काही गरमागरमीच्या विषयांवर सत्ताधारी अडचणीत आले म्हणून आमदार नाना पटोलेंवर भडास काढण्याचा हा प्रकार होता, असा दावा काहींनी केला. पण आ. पटोले सभापतींवर धावून गेले, त्यांच्याशी वाद घातला, राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला हे कोणीही अमान्य करत नाही, आणि हा घटनाक्रमच निलंबन कारवाईसाठी कारण ठरला आहे, हेसुद्धा निश्चितपणे खरे आहे. या संदर्भातील सारे पुरावे, छायाचित्रे, दृक्-श्राव्य छायाचित्रण, हे सारेकाही आमदार नाना पटोले यांच्या असांसदीय वर्तनावर बोट ठेवणारेच आहेत, हेही अगदीच स्पष्ट आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभा सभागृहातीलच एक जुना प्रसंग या निमित्ताने आठवला. बरोबर एकसष्ट वर्षांपूर्वी १९६४ च्या ऑगस्ट महिन्यात त्यावेळच्या विरोधी पक्षातील आक्रमक आमदार, विदर्भातील लढवय्ये लोकनेते जांबुवंतराव धोटे त्यावेळी 'फुल्ल फॉर्मा'त होते. त्या, १२ ऑगस्ट या दिवशी सभागृहात कामकाज सुरू असताना तरुण रक्ताचे धोटे बोलण्याच्या तयारीत असताना त्यांना बोलू दिले जात नसल्यामुळे ते संतापले होते. त्यातच त्यांचा माईक बंद पडला किंवा बंद पाडला म्हणून ते अधिकच संतापले. त्यांनी आपल्या समोरचा काचेचा जडजूड 'पेपरवेट' ध्वनिक्षेपण यंत्रणा सांभाळणाऱ्या तंत्रज्ञाच्या दिशेने भिरकावला होता. त्यावेळी विधानसभा अध्यक्ष असलेले बाळासाहेब भारदे यांनी सभागृहात निर्माण झालेल्या तणावाला कौशल्याने आणि धैर्याने हाताळले. धैर्याने यासाठी की जांबुवंतराव धोटे काहीही करू शकतात अशी त्यांची ख्याती होती. धोटे यांनी केलेल्या कृतीनंतर स्वाभाविकच त्यांच्याविरुद्ध मुंबईच्या पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन अटकही झाली होती. हा विषय एवढ्यावर संपला नव्हता. विधानसभेने ठराव करून धोटे यांची आमदारकीच काढून घेतली होती. या घटनेनंतर विधानसभेत पुन्हा असे भारीभक्कम पेपरवेट ठेवायचे नाहीत, असा निर्णयही घेण्यात आला होता.

परंतु, काय ठेवायचे नाही, हे ठरविले तरी 'भान' ठेवायचेच, हे सदस्यांनी ठरवायचे असते. नाना पटोले यांना राजकारण आणि सांसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असूनही त्यांच्यात सभागृहाच्या सदस्यासाठी आवश्यक असलेल्या परिपक्वतेचा अभाव असल्याचे या घटनेत दिसले. विरोधकांनी सरकारच्या विरोधात बोललेच पाहिजे. आक्रमक झालेच पाहिजे. परंतु, सांसदीय लोकशाहीमध्ये सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाएवढीच विरोधकांचीही असते, याचा पटोलेंना विसर पडला. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली. मात्र, एकूणच सांसदीय परंपरेबद्दल सर्व सदस्य जागरूक होत नाहीत, साजेसे वर्तन करीत नाहीत, तोवर या कारवायांतून काहीही निष्पन्न होण्याची शक्यता नाही. विषय आणि परिस्थिती काहीही असली तरी सांसदीय परंपरांचे पालन ही सभागृहाची रीतच झाली पाहिजे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# फेक व्हिडीओची जटिल समस्या

सोशल मीडियाचा वापर जगभर वाढू लागल्यावर त्यामध्ये काही समाजविघातक बाबी शिरणे अपरिहार्यच होते. सायबर गुन्हेगार इथेही सक्रिय झालेच. स्वतःचे खोटे प्रोफाईल ठेवून नोकरी, विवाह, प्रवास, व्यापार किंवा मैत्रीच्याही निमित्ताने लोकांना जाळ्यात ओढणे आणि पैशांना किंवा वैयक्तिक पातळीवरील इतर गोष्टींमध्ये ठगवणे हादेखील एक मोठा व्यवसाय बनला असे म्हणावे लागेल. याचीच पुढील आवृत्ती म्हणजे फेक न्यूज. याला होक्स असेही नाव आहे. अशा बातम्या कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. राजकारण आणि अर्थकारणापासून 'आज पृथ्वीवर सूर्याकडून कॉस्मिक रेजचा मारा होणार आहे तरी सावध राहावे'पर्यंत यामध्ये काहीही असू शकते. अशा बातम्यांना मसाला व्हॅल्यू असल्याने सोशल मीडियावर त्या झपाट्याने पसरतात. याचीच पुढची पायरी म्हणजे फेक व्हिडीओ. समाजमाध्यमांमार्फत 'व्हायरल' झालेल्या फोटो किंवा व्हिडीओवरून गैरसमज होऊन भांडणे, हिंसाचार, कोर्ट केसेस आणि अगदी दंगली उद्‌भवणे आता नवीन राहिलेले नाही. आपण पाहिलेला फोटो किंवा व्हिडीओ अस्सल आहे की मॉर्फिंग केलेला म्हणजे संगणकीय साधने वापरून सोयीस्कररीत्या कट-पेस्ट केलेला आहे, याची खात्री न करताच पाठिंबा किंवा विरोध करण्याच्या हालचाली सुरू केल्या जातात. पण सध्या काय सांगितले आहे यापेक्षा ते कोणी सांगितले, यालाच महत्त्व आलेय. हा बहुधा मानवी स्वभावच असावा, कारण 'फेक' की 'रिअल' याची खात्री करण्याची सुविधा फुकट देणारी अनेक ॲप हाताशी असतानाही आपण तसे न करता घातक आणि चुकीचे कृत्य करून मोकळे होतो. वर्णनावरून चित्र काढण्याचे जे कौशल्य आपल्यातील काहींमध्ये असते; त्याचाच हा अधिक उच्च पातळीवरचा तांत्रिक आविष्कार आहे.

सोशल मीडिया, विविध ॲप्स, ओटीटी, फार काय, टीव्हीवर दाखवली जाणारी दृश्ये किंवा प्रसंग त्यांच्या मूळ रूपात असतीलच याची कोणतीही खात्री प्रेक्षकांना मिळू शकणार नाही आणि हे घडायला पुढची पाच ते दहा वर्षे पुरेशी आहेत. पण येत्या काही दशकांमध्ये हा प्रकार वाढत जाण्याचीच शक्यता आहे, कारण असे व्हिडीओ बनवण्यातला आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सहभाग वेगाने वाढत असल्याने दाखवली जाणारी बाब खरी की खोटी हे ओळखणे जवळजवळ अशक्य बनणार आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष ट्रम्प यांना अटक होताना, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ अश्रुधुरातून मार्ग काढताना दिसणारे प्रसंग पाहिल्याचे किंवा याबाबत वाचल्याचे आठवत नाही ना? नाहीच आठवणार, कारण असे काही घडलेलेच नाही. हे प्रसंग संगणकावर बनवलेले आहेत. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित 'मिडजर्नी' नावाच्या सॉफ्टवेअरने. पुरवलेल्या मजकुरावरून हे सॉफ्टवेअर प्रतिमा तयार करू शकते आणि त्या प्रतिमा किती हुबेहूब आहेत असेच वाटत राहते.



कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान पुढील वीस वर्षांमध्ये जगाचे चित्रच बदलून टाकणार आहे. वैद्यकीय, शिक्षण, दूरसंचार आदी अनेक क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला आहे. फेक व्हिडीओ किंवा डीपफेक व्हिडीओ हे कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले व्हिडीओ असतात, ज्यात व्यक्तींचे चेहरे, आवाज किंवा हालचाली खोटेपणाने बदलल्या जातात. मनोरंजन, जाहिरात, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे, परंतु त्याचा गैरवापरदेखील होऊ शकतो. जनरेटिव्ह एआय टूल्स वापरकर्त्याच्या प्रॉम्प्ट (यूजर इनपुट) नुसार माहितीचे पृथक्करण करून नवनिर्मिती करतात. त्यातून निर्माण होणारी बाब मानवनिर्मित नाही हे स्पष्ट करण्याचे बंधन नसल्याने त्याच्या सत्यतेवर सर्वांचा विश्वास बसू शकतो. एआय बनावट परंतु वास्तविक दिसणाऱ्या प्रतिमा आणि व्हिडीओंची निर्मिती करून चुकीची माहिती सर्वत्र प्रसारित करू शकतात. यामागे प्रतिगामी, गुन्हेगारी, दहशतवादी अथवा व्यावसायिक स्पर्धक असू शकतात पण, ते पाठीमागे राहून शांतपणे अदृश्य राहू शकतात. त्यामुळे जनमताचा प्रभाव सहज शक्य आहे.

डीपफेक व्हिडीओ तयार करण्यासाठी वापरली जाणारी प्रमुख एआय टूल्स अलिकडे चर्चेत आहेत. यापैकी 'डीपफेसलॅब' हे एक ओपन-सोर्स टूल आहे. ते वापरकर्त्यांना व्हिडीओमधील चेहऱ्यांचे स्वॅप करण्याची सुविधा देते. हे टूल उच्च अचूकतेसाठी ओळखले जाते आणि व्यावसायिकांमध्ये लोकप्रिय आहे. यात रिअल-टाईम प्रिव्ह्यू आणि बॅच प्रोसेसिंगसारखी वैशिष्ट्ये आहेत. रिफेस हे असेच एक मोबाईल ॲप्लिकेशन आहे. ते वापरकर्त्यांना त्यांच्या चेहऱ्यांचे व्हिडीओ आणि जीआयएफमध्ये स्वॅप करण्याची सुविधा देते. यात रिअल-टाईम चेहरा स्वॅपिंगची क्षमता आहे आणि सोशल मीडियावर सहज शेअर करता येते. डीप ब्रेन हे एक एआय व्हिडीओ जनरेटर आहे जे टेक्स्ट-टू-व्हिडीओ, टेक्स्ट-टू-ऑडिओ आणि एआय अवतार तयार करण्याची सुविधा देते. यात ८०पेक्षा जास्त भाषांमध्ये व्हॉईसओव्हर तयार करण्याची क्षमता आहे. यामुळे व्हिडीओ निर्मिती वेगवान आणि कार्यक्षम होते. याखेरीज मेकफिल्म हे एक व्यावसायिक डीपफेक व्हिडीओ मेकर आहे. ते एथिकल कंटेंट निर्मितीसाठी डिझाईन केले आहे. यात चेहरा स्वॅपिंग, व्हॉईस जनरेशन, व्हिडीओ डाऊनलोड आणि व्हिडीओ आऊटपुट सारखी वैशिष्ट्ये आहेत. ही ॲप्स वापरताना सुरक्षित आणि नैतिक वापरासाठी सूचना घेणे आवश्यक आहे. एखाद्याच्या चेहऱ्याचा किंवा आवाजाचा वापर करण्यापूर्वी त्यांची स्पष्ट परवानगी घेणे अपेक्षित असते. व्हिडीओंमध्ये वॉटरमार्क्स वापरून ते एआयनिर्मित असल्याचे स्पष्ट करणे अपेक्षित होते. या प्रकाराला, खरे तर गैरप्रकाराला वेळीच आळा न घातल्यास अराजक घडू शकते. परिणामी, सत्य लपवणे, ते वेगळ्या रूपात दाखवणे किंवा स्वत:ला सोयीचा असेल तेवढाच भाग सांगणेही अगदी सहजशक्य होईल. यामध्ये प्रगत राष्ट्रांमध्ये उहापोह होऊन जागृती झाली आहे. १ ऑगस्ट २०२४ रोजी, युरोपियन कृत्रिम बुद्धिमत्ता कायदा अंमलात आला. नवीन नियमांचा एक भाग म्हणून कायदा प्रतिबंधित अस्वीकार्य पद्धतींची यादी तयार करतो, ज्यामुळे धोका वाढतो. या प्रतिबंधाचा उद्देश लोकांच्या सुरक्षेसाठी अस्वीकारार्ह पातळीचा धोका असलेल्या क्षेत्रावर किंवा अनाहूत भेदभाव करणाऱ्या प्रणालींवर आहे. आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकास आणि वापरासाठी स्पष्ट धोरण तयार करणे आवश्यक आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय याची कायदेशीर व्याख्या करण्याची वेळ आली आहे. यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी खरेपणा तपासण्यासाठी काही वेबसाईट्स तयार करणे जरुरीचे आहे. तसेच सायबर कायदे बदलून त्यात फेक न्यूज, व्हिडीओचा प्रसार करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना जबर शिक्षा व्हायला हवी. हे सर्व प्रकार फक्त राजकीय अथवा देशांमधील स्पर्धेपुरतेच नाहीत. उद्योगविश्व यापासून अलिप्त राहू शकत नाही. उद्योग आपले उत्पादन लोकप्रिय आणि अधिक लाभदायी करण्यासाठी स्पर्धक उद्योगांबद्दल गैरसमज, फेक माहिती सोशल मीडियावर पसरवू शकतो. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत, व्यवस्थापन उच्च शिक्षणात अंतर्भूत केलेच पाहिजे. नीतिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान ही बाब शालेय, महाविद्यालयीन शिक्षणात अंतर्भूत करायची हीच वेळ आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# गडचिरोलीच्या विकासाची नवदिशा

महाराष्ट्राच्या नकाशावर गडचिरोली जिल्ह्याला नेहमीच दुर्गम, नक्षल प्रभावित आणि मागास अशी ओळख चिकटली होती. घनदाट जंगल, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, सांस्कृतिक आणि जैवविविधतेने समृद्ध असतानाही या जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात शासन यंत्रणा आजवर कमी पडली, हे स्पष्ट आहे. सामाजिक पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत क्षेत्रांत गडचिरोलीने मोठी तफावत अनुभवली. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः गडचिरोलीचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर या जिल्ह्याकडे एक नवे प्राधान्य दिले गेले आहे. नुकत्याच नागपूर येथे झालेल्या महास्ट्राईड परिषदेच्या मंचावर जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी गडचिरोलीसाठी तयार केलेला विकास आराखडा सादर केला. नव्या दृष्टिकोनातून गडचिरोली आकांक्षांपासून कृतीकडे या संकल्पनेतून सादर झालेला हा आराखडा जिल्ह्याला आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक स्तरावर झपाट्याने उभे करण्याचा स्पष्ट रोडमॅप दाखवतो.

सध्या गडचिरोलीचे एकूण जिल्हा उत्पन्न सुमारे १०,९२१ कोटी असून २०२८ पर्यंत ते तब्बल २७,३०३ कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट या आराखड्यात ठेवले आहे. याचप्रमाणे प्रतिव्यक्ती उत्पन्न सध्याच्या १,४०,८६० वरून २०२८ पर्यंत दुप्पट म्हणजे २,८०,३२० करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. इतकेच नव्हे, राज्याच्या एकूण सकल उत्पन्नात गडचिरोलीचा सध्याचा ०.४५ टक्के वाटा ०.७ टक्क्यांपर्यंत नेण्याचे लक्ष्यही महत्त्वाचे ठरते. जिल्हाधिकारी पंडा यांच्या मते, या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी जिल्ह्यातील संसाधनांचा समन्वयित वापर करणे आवश्यक आहे. खनिज संपत्ती, विशेषतः लोहसंपत्ती, वनउपज, सेंद्रिय शेती, मत्स्य व्यवसाय, पर्यटन या क्षेत्रांना एकत्रित चालना देऊन उत्पन्न वाढीला गती देता येईल. कोनसरी येथील लॉयड्स मेटल्सचा लोह प्रकल्प तसेच लवकरच सुरू होणारा जेएसडब्ल्यू प्रकल्प जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगार निर्मितीचा मोठा आधार ठरतील. या उद्योगांच्या माध्यमातून व्यवसाय, वाहतूक, सेवा क्षेत्रातही रोजगाराच्या संधी तयार होतील.

गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात उद्योग उभे राहत असताना स्थानिकांना विश्वासात घेणे, त्यांचे प्रशिक्षण, त्यांना सामावून घेणे हे शासनाचे कर्तव्य राहील. अन्यथा रोजगारासाठी बाहेरच्या मजुरांवरच अवलंबून राहण्याचा धोका निर्माण होईल. मुख्यमंत्र्यांना याची जाणीव ठेवूनच पुढील नियोजन करावे लागेल. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांचा गडचिरोलीसाठी वेगळा विचार करणे अपरिहार्य आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये आजही प्राथमिक शाळांचे वर्ग अपूर्ण आहेत, शिक्षकी पदे रिक्त आहेत, तर ग्रामीण रुग्णालयांमध्ये डॉक्टर, औषधे यांचा तुटवडा आहे. यामुळे मुलांचे शिक्षण अपूर्ण राहते आणि आरोग्याच्या समस्यांमुळे लोक सतत असुरक्षित राहतात. या प्रश्नांवर एकाच वेळी आणि दीर्घकालीन उपाययोजनांनी काम केले तरच खरा विकास साधता येईल. गडचिरोलीत आजपर्यंत शासन योजनांच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे आलेत. नक्षल चळवळ, सुरक्षेची समस्या, अधिकारी-कर्मचाऱ्यांची भीती आणि लोकांमधील अविश्वास या सर्वांनी जिल्ह्याला मागे खेचले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याच पृष्ठभूमीवर गडचिरोलीच्या समस्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला.

महास्ट्राईड परिषदेच्या निमित्ताने गडचिरोली हा संपूर्ण नागपूर विभागातून निवडलेला एकमेव जिल्हा ठरला. त्यामुळे राज्य शासनाची आणि जागतिक बँकेची विशेष नजर या जिल्ह्यावर केंद्रित झाली आहे. यातून आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळू शकते. जिल्हाधिकारी पंडा यांनी मांडलेले उद्दिष्ट आकडेवारीवरच नाही, तर प्रत्यक्ष अंमलबजावणीवर आधारित आहेत आणि त्यासाठी शासनाचा पाठिंबा, निधी आणि धोरणात्मक निर्णय यांची नितांत आवश्यकता आहे. आता गडचिरोली जिल्ह्यासाठी हा अत्यंत निर्णायक काळ आहे. राज्य शासनाचा, खासकरून मुख्यमंत्र्यांचा स्पष्ट राजकीय पाठिंबा, जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आखलेला अभ्यासपूर्ण विकास आराखडा या तिन्हीचा योग्य मेळ घालता आला तर गडचिरोलीचे चित्र पूर्णपणे बदलू शकेल. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात गडचिरोलीचा वाटा वाढवणे हीच या पुढाकारामागील खरी प्रेरणा आहे. मुख्यमंत्र्यांनी दाखवलेली सकारात्मकता, जिल्हाधिकाऱ्यांचे परिश्रम आणि जागतिक संस्थांचे सहकार्य याचे सुसंवाद, समन्वय आणि पारदर्शक व्यवस्थापन हेच गडचिरोलीच्या विकासाला खरे बळ देईल, यात शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# कर्नाटकातील सत्तासंघर्ष

कर्नाटकमध्ये नेतृत्वबदल करण्याचा कोणताही विचार नाही, तशी प्रक्रियाही पक्षात सुरू नसल्याचा खुलासा काँग्रेस महासचिव आणि कर्नाटकचे प्रभारी रणदीप सुर्जेवाला यांनी केला असल्यामुळे कर्नाटकमधील काँग्रेसच्या सरकारमध्ये सर्व काही सुरळीत सुरू नाही, हे स्पष्ट झाले. काँग्रेस पक्षात काँग्रेस महासचिव मोठा की काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मोठे असा नवा प्रश्नही यामुळे उपस्थित झाला आहे. कारण दोन दिवस आधीच कर्नाटकमध्ये नेतृत्व बदल करायचा की नाही, याचा निर्णय काँग्रेसच्या नेतृत्वाला घ्यायचा आहे, त्यामुळे अन्य कोणी त्याबाबत बोलू नये, असे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी स्पष्ट केले होते. त्या बातमीची शाई वाळत नाही, तोच सुर्जेवाला यांनी राज्यात नेतृत्वबदल केला जाणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे काँग्रेस पक्षातील अनागोंदीचा परिचय झाला. खडगे म्हणतात ते खरे की सुर्जेवाला म्हणतात त्यावर विश्वास ठेवायचा हे काँग्रेसच्या नेत्यांना कळेनासे झाले. कर्नाटकातील नेतृत्वबदलाबाबतचा निर्णय काँग्रेसचे नेतृत्व घेणार आहे, असे खडगे यांनी म्हटले. राज्यात नेतृत्वबदल होणार नाही, असे त्यांनी म्हटले नाही. याचा अर्थ काँग्रेस पक्षात खडगे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी त्यांच्या वरही एक नेतृत्व आहे आणि पक्षातील सर्व निर्णय हे नेतृत्वच घेत असते, हे दिसून येते. आपल्या विधानातून कोणताही निर्णय घेण्याचा मला अधिकार नाही, असे खडगे यांनी अप्रत्यक्षपणे कबूलही केले, असे म्हणायला हरकत नाही.

राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये होता, तसाच पक्षांतर्गत सत्तासंघर्ष कर्नाटक काँग्रेसमध्येही आहे. देशातील ज्या दोन-तीन मोजक्या राज्यांत काँग्रेसची सत्ता उरली त्यात कर्नाटक हे राज्य आहे. कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या सध्या मुख्यमंत्री असले तरी ते कितीकाळ मुख्यमंत्री राहतील हे त्यांनाही माहिती नाही. कारण सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात सध्या उपमुख्यमंत्री असलेले डी. के. शिवकुमार मुख्यमंत्रिपदाचे दावेदार आहेत. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेत शिवकुमार आघाडीवर होते. राज्यातील काँग्रेसच्या विजयात त्यावेळी प्रदेश अध्यक्ष असलेल्या शिवकुमार यांचे मोठे योगदानही होते. पण अचानक शिवकुमार यांना मागे टाकत काँग्रेसच्या नेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री केले. त्यामुळे शिवकुमार नाराज झाले होते. ते बंड करतील, असे वाटत होते, पण बंड न करता उपमुख्यमंत्रिपदावर त्यांनी समाधान मानले. राजस्थानमध्येही काँग्रेसला बहुमत मिळवून देण्यात तेव्हा प्रदेश काँग्रेस अध्यक्ष असलेले सचिन पायलट यांची मोठी भूमिका होती. पण त्या राज्यातही काँग्रेसने अशोक गहलोत यांना संधी देत पायलट यांना उपमुख्यमंत्री बनवले होते, त्यामुळे तेव्हा पायलटही नाराज झाले होते.

कर्नाटकमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने अडीच-अडीच वर्षाचे सूत्र ठरवल्याची चर्चा त्यावेळी जोरात होती. म्हणजे पहिले अडीच वर्ष सिद्धरामय्या मुख्यमंत्री राहतील आणि नंतरचे अडीच वर्ष शिवकुमार मुख्यमंत्री होतील, असे काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल आणि राज्याचे प्रभारी रणदीप सुर्जेवाला यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत ठरले होते, असे म्हणतात. मात्र आता त्याबद्दल कोणी बोलत नाही. सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्रिपदाला यावर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात अडीच वर्ष पूर्ण होत आहे. त्यामुळे राज्यात नेतृत्वबदलाची चर्चा सुरू झाली वा शिवकुमार यांच्या समर्थकांनी ती जाणीवपूर्वक सुरू केली, असे म्हणायला जागा आहे. काँग्रेस आमदार इकबाल हुसेन यांनी शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनवण्याची मागणी करून खळबळ उडवली, एवढेच नाही तर राज्यातील काँग्रेसचे १०० आमदार शिवकुमार यांच्या पाठीशी असल्याचा दावा केला. त्यामुळे राज्यात नेतृत्वबदलाची चर्चा सुरू झाली.

राजस्थान आणि छत्तीसगडप्रमाणे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही मुख्यमंत्रिपद सोडण्यास नकार दिला. राजस्थानमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री अशोक गहलोत यांच्या नेतृत्वाला तेव्हा उपमुख्यमंत्री असलेले सचिन पायलट यांनी आव्हान दिले होते. पण पायलट यांच्या बंडानंतरही गहलोत यांनी मुख्यमंत्रिपद सोडण्यास नकार दिला होता. एवढेच नाही तर पक्षांतर्गत पेचप्रसंगाच्या या स्थितीत काँग्रेसच्या नेतृत्वाने गहलोत यांची पाठराखण केली होती. अशीच स्थिती छत्तीसगडमध्ये उद्‌भवली होती. काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदावर सिंहदेव यांनी दावा केला होता. मात्र काँग्रेसच्या नेतृत्वाने भूपेश बघेल यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घातली. अडीच वर्षांनंतर बघेल यांच्या जागेवर मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन आपल्याला देण्यात आले होते, असे सिंहदेव म्हणत राहिले पण त्यांना कोणी दाद दिली नाही. अशोक गहलोत यांच्याप्रमाणे भूपेश बघेल यांनीही मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. सचिन पायलट यांच्याप्रमाणे सिंहदेव यांना हात चोळत बसावे लागले, कारण या दोन्ही राज्यांत काँग्रेसच्या नेतृत्वाने पायलट आणि सिंहदेव यांना डावलत गहलोत आणि बघेल यांची पाठराखण केली होती.

शिवकुमार यांनी सध्या माघार घेतलेली दिसते. आपण सिद्धरामय्या यांच्यासोबत असून त्यांच्याशी आपले कोणतेही मतभेद नाहीत, असे शिवकुमार यांनी म्हटले. एवढेच नाही तर आपल्या समर्थक आमदारांना पक्षशिस्तीचे पालन करण्याची सूचनाही केली आहे. शिवकुमार यांची ही माघार स्थायी स्वरूपाची आहे की व्यूहरचनात्मक आहे, हे समजले नाही. मात्र शिवकुमार यांचा एकूणच आक्रमक पिंड पाहता ते माघार घेतील, असे वाटत नाही. मुख्यमंत्रिपद न मिळाल्यामुळे नाराज झालेल्या शिवकुमार यांची समजूत काढण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने तेव्हा प्रदेश अध्यक्षपद त्यांच्याकडे कायम ठेवले होते.

कर्नाटकातील या सत्तासंघर्षात गृहमंत्री परमेश्वर यांनीही उडी घेतली होती. दलित नेता म्हणून मुख्यमंत्रिपदावर दावा केला होता. पण मध्यंतरी एका प्रकरणात अडकल्याने त्यांना फार काळ आपला दावा रेटता आला नाही. सिद्धरामय्या ओबीसी आहेत, बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्यात नेतृत्वबदल केला तर ओबीसी मतदारांमध्ये चुकीचा संदेश जाईल, अशी सूचना पक्षातील काही नेत्यांनी केल्यामुळे सिद्धरामय्या यांना काही महिन्यांसाठी जीवदान मिळाल्याचे मानले जात आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले खडगे कर्नाटकचे आहेत, त्यामुळे त्या राज्यातील पक्षांतर्गत राजकारणात त्यांचे सिद्धरामय्या यांच्याशी फारसे पटत नाही. याउलट शिवकुमार खडगे यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. राज्यातील नेतृत्वबदलाबाबत खडगे यांच्या विधानामागे ही पृष्ठभूमी आहे. त्यामुळे राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये तेव्हा जे झाले, काँग्रेसच्या नेतृत्वाने जी भूमिका घेतली, त्याच इतिहासाची पुनरावृत्ती यावेळी कर्नाटकातही होणार का, काँग्रेसचे नेतृत्व सिद्धरामय्या यांच्या पाठीशी उभे राहणार की मुख्यमंत्री होण्याच्या शिवकुमार यांच्या स्वप्नाची पूर्तता करणार याकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

९८८१७१७८१७

### उबाठा, मनसे बुड नसलेले कमंडलू

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात उबाठाद्वारे भाजपशी जे विश्वासघातकी राजकारण खेळले गेले होते. त्याला कोठेतरी छेद देण्यासाठी भाजपद्वारा मागील काही वर्षांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला चुचकरणे चालू आहे. शिवसेनेचा इतिहास बघा. गेले ३० वर्ष भाजपबरोबर युतीमध्ये होती तरी त्यांनी काही वेळा युती पण तोडली आहे. विधानसभा निवडणूक २०१९ निकालानंतर उद्धव ठाकरे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेले आणि मुख्यमंत्री झाले.

उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सुद्धा वीस-पंचवीस वर्षांच्या राज्याच्या राजकारणात सातत्याने कोलांटउड्या मारल्या आहेत. लोकसभा २०१९ निवडणूक प्रचार दरम्यान मनसे प्रमुख राज ठाकरेंनी नरेंद्र मोदींविरुद्ध सातत्याने आग ओकली होती. आज उद्धव आणि मनसे या पक्षाचा अस्तित्वाचा प्रश्न आहे. बृहन्मुंबई महापालिका यांच्या हातून निसटली की यांच्या राजकारणाला घरघर लागणार आहे. आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरेंना राजकारणात मर्यादा आहेत. आजच्या मराठी कुटुंबातील नवीन पिढीला मराठी भाषेशी तसेच मराठी विरुद्ध अभाषिक वाद याच्याशी काही देणे घेणे नाही. मराठी मुलांना प्रामुख्याने विकास पाहिजे आहे.

मराठी माणूस उबाठा आणि मनसे यांच्या राजकारणाला पूर्ण ओळखून आहे. गेली तीस वर्ष बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे आहे. मुंबईतील मराठी माणसासाठी यांनी काय केले हे सर्वांना दिसत आहे. भाजपने सुद्धा उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोघांमध्ये एक अंतर ठेवून राजकारण केले पाहिजे. कारण हे दोन्ही पक्ष केव्हा पलटी मारतील सांगता येत नाही.

आज उबाठा आणि मनसेला बृहन्मुंबई महानगरपालिकेची सत्ता पाहिजे. विधानसभा निवडणूक २०१९ च्या निकालानंतर उबाठाचा भाजपला आलेला अनुभव लक्षात घेता आता तरी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरेंबाबत जपून पाहून पावले टाकली पाहिजेत.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### पर्यावरण पूरक कागदी कप?

चहा, कॉफीसारख्या गरम पदार्थांसाठी कागद हो केवळ कागद, कोणतेही मायक्रो प्लॅस्टिक कोटिंग नसलेला, नरम पडून आकार बिघडणार नाही का? कितीही चांगल्या प्रतीचा, कोणतेही कोटिंग नसलेला कागद गरम पदार्थाने नरम पडणारच किंबहुना जर नरम पडणारच नसेल तर तो कागद निश्चितच पूर्णपणे विघटन होणारा नाही. अर्थात पर्यावरणपूरक कागदी कप अस्तित्वातच नाही. म्हणजेच तथाकथित कागदी कप पर्यावरणपूरक नाहीत. आणि कागदी कप विघटित होणारा मानले तरी तो सिंगल युजच. मग त्याचे विघटन होईपर्यंत आपल्या भोवती तो कचराच आहे ना. कचऱ्यात राहणाऱ्यांनो हीच का तुमची श्रीमंती, हाच का तुमचा हायजेनिक असल्याचा आव?

**धनंजय विश्वनाथ व्यास**/९४२२९५९४४०

### गुरुपौर्णिमेचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी गुरुपौर्णिमा १० जुलैला आहे. ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरू. आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर. गुरू याचा अर्थ, 'गु' म्हणजे अंधकार आणि 'रु' म्हणजे अंधकाराला दूर करणारा, प्रकाशाकडे घेऊन जाणारा. गुरू नेहमी देवतुल्य मानले जातात. गुरू म्हणजे शिष्याला किंवा भक्ताला मायेच्या मोहजालातून अलगदपणे बाहेर काढून त्याच्याकडून, त्याच्या प्रकृतीनुसार साधना करून घेणारे. गुरू म्हणजे निरपेक्ष प्रेम, भरभरून दोन्ही हातांनी शिष्यांना विद्या देणारे. आषाढ पौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी व्यास यांना सर्वश्रेष्ठ गुरू मानले जाते. आषाढ पौर्णिमेला व्यासांच्या शिष्यांनी पहिल्यांदा गुरुपूजन केले म्हणून त्याला व्यासपौर्णिमा म्हणतात. अध्यात्मात असो किंवा कुठल्याही शैक्षणिक क्षेत्रात असो गुरूंशिवाय तरुणोपाय नाही. आपल्या आयुष्यात योग्य वेळी, योग्य गुरू आले तरच आपले जीवन योग्य मार्गाने जाऊन ध्येय प्राप्ती निश्चित होते. मात्र त्यासाठी आपली पात्रताही तेवढीच असावी लागते. जन्मदाते आई-वडील पंख देतात. पण त्या पंखांना भरारी मारण्याचे बळ मात्र गुरूच देतात. शिष्याची गुरूंवरील श्रद्धा, निष्ठा, भक्ती, शरणागत भाव, आज्ञापालन हे जेवढे जास्त असेल तेवढी त्याची प्रगती जलद होते. आपल्याला असणारी सांसारिक आसक्ती ही केवळ साधनेनेच कमी होते. आपले षडरिपु हे फक्त गुरूंच्या मार्गदर्शनातच आपण कमी करू शकतो. अशा गुरूंविषयी कृतज्ञता म्हणून या दिवशी शिष्य हे गुरूंची पाद्य पूजा करतात आणि त्यांना मनोभावे गुरुदक्षिणा अर्पण करतात.



**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.


# ९८२ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव एमजेपीकडे

## शहराला दररोज पाणीपुरवठ्याचे नियोजन प्रस्तावित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

शासनाच्या अमृत २ योजनेअंतर्गत ९८२ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव महापालिकेकडून अखेर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) कडे सादर करण्यात आला आहे. एम जेपीकडून हा प्रस्ताव साधारणतः दोन आठवड्यात शासनाकडे पाठविण्यात येईल. अत्याधुनिक पाणीपुरवठा यंत्रणेसह दररोज पाणीपुरवठ्याचे नियोजन यामध्ये प्रस्तावित आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सोलापूर शहरातील अंतर्गत जलवाहिनी तसेच नव्या पाण्याच्या टाक्या या संदर्भात सोलापूर महापालिकेने शासनाच्या अमृत २ योजनेअंतर्गत ९८२ कोटीच्या पाणीपुरवठा योजनेचा प्रस्ताव यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविला होता. त्यामध्ये एमजेपीने त्रुटी काढल्या होत्या. यामध्ये अनेक बदल करत हा प्रस्ताव पुन्हा महापालिकेने



महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविला आहे. साधारणता दोन आठवड्यात हा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत. त्यानंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

या प्रस्तावात बरेच बदल करण्यात आले आहेत. शहरातील ज्या भागात जलवाहिनी जुन्या झाल्या आहेत. तसेच जलवाहिनीही नाही तेथे जलवाहिनी टाकणे, नव्या २० पाण्याच्या टाक्या, अत्याधुनिक व्हॉल्व यंत्रणा यासह दररोज पाणीपुरवठ्याचे नियोजन प्रस्तावित करण्यात आले आहे. साधारणता: दोन वर्षात टेंडरसह ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यानंतर या कामास प्रारंभ होणार आहे. या योजनेसाठी संभाजीनगरला शासनाने सॉफ्ट लोन दिले आहे. त्यांना अनुदान मिळाले नाही. कदाचित त्या अनुषंगानेही सोलापूर महापालिकेला नियोजन करावे लागेल. सोलापूर महापालिकेची आर्थिक स्थिती म्हणावी तेवढी सक्षम नाही. एकूण ४५ टक्के खर्च वेतनावर होतो, असेही म हापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

### पाकणी जलशुद्धीकरण केंद्राच्या जागेसंदर्भात उद्या बैठक

पाकणी जलशुद्धीकरण केंद्रासाठी वन विभागाची जागा घेण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय प्रक्रिया सुरू आहे. यापूर्वी नागपूर येथे पहिल्या टप्प्यातील बैठक पार पडली होती. नंतर आता येत्या शुक्रवार दि. ४ जुलै रोजी नागपूर येथेच दुसऱ्या टप्प्याची महत्त्वाची बैठक पार पडणार आहे. त्यानंतर अंतिम बैठक होणार आहे.

# अल्पवयीन मुलाला फूस लावून पळविले

**मंगळवेढा दि.२ जुन-**

हुलजंती येथील अल्पवयीन १४ वर्षीय मुलगा मेंढ्या राखण्यास गेला असता त्याचे अपहरण अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन केल्या प्रकरणी मंगळवेढा पोलीसात अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील अपहृत मुलगा हा दि. २३ जून रोजी ३ वाजता हुलजंती शिवारात मेंढ्या चारण्यासाठी गेला असता तो अल्पवयीन असल्याचा फायदा घेवून अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन त्यास फुस लावून पळवून नेला असल्याची फिर्याद बिराप्पा मासाळ यांनी पोलीसात दिल्यावर अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान त्याचे वर्णन पुढील प्रमाणे रंग गोरा, उंची चार फुट दोन इंच, शरीरबांधा सडपातळ,शिक्षण ९ वी, अंगात नेसणेस निळा चेक्स शर्ट, काळी पँट, भाषा कन्नड व मराठी अशा वर्णनाचा मुलगा कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी तपासिक अंमलदार प्रमोद मोरे (९८३४८१७८१०) नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


## Change in Name

I have hereby declared that my old name Dattatraya Hanumant Kadam has been changed to Dattatray Hanamant Kadam in my PAN card and Aadhar Card name is Dattatray Hanamant Kadam residing at Santosh Nagar, Bale, Solapur Maharashtra kindly note the same 9370411418


## जाहीर प्रसिध्दीकरण

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक नियम) २०१४ मधील तरतुदीनुसार सोलापूर जिल्ह्यातील क वर्गातील सहकारी संस्थेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रमाचे जाहीर प्रसिध्दीकरण करण्यात येत आहे.

**निवडणूक कार्यक्रम प्रसिध्दी**

| अ. क्र. | सहकारी संस्थांची नावे |
|---|---|
| १ | धनश्री महिला सहकारी ग्राहक भांडार मर्या., केतूर, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| २ | विठ्ठल सहकारी ग्राहक वस्तू भांडार संस्था मर्या., करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर |
| ३ | श्रीमती रत्नप्रभा नामदेवरावजी जगताप ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंथा मर्या., करमाळा, ता. करमाहा, जि. सोलापूर |
| ४ | आदिनाथ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर |

**वरील संस्थांची निवडणूक कार्यक्रम**

| अ. क्र. | नामनिर्देशन पत्र विक्री व दाखल करण्याचा शेवटचा दिनांक | नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक | नामनिर्देशन पत्र माघार दिनांक | मतदान दिनांक | मतमोजणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | दि.०३/०७/२०२५ ते ०९/०७/२०२५ | दि. १०/०७/२०२५ | दि. २५/०७/२०२५ | दि. ०३/०८/२०२५ | दि. ०३/०८/२०२५ |

**टीप** :- उपरोक्त निवडणूक कार्यक्रम तालुका निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर यांचे कार्यालय व संस्थेचे कार्यालय यांचे नोटीस बोडावर रितसर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. याची नोंद घेण्यात यावी.

**सही/-**
**(एम.एल. शिंदे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,**
**तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था.**
**करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर**

## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

FOUNDATION DAY

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीकार यांनी, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचले जाणारे, 29/04/2025 रोजी डिमांड नोटिस जारी केल्या आहेत ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की खाली स्वाक्षरी करणाऱ्याने 30/06/2025 रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे

विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारावर वर उल्लेख केलेल्या रकमेचा आकार बँक ऑफ महाराष्ट्रकडून आकारला जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आमंत्रित केले आहे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- स्टेशन रोड**<br>**कर्जदार -**<br>**1. M/S. के राज डिजिटल प्रेस (प्रोप.- श्री. राजेश शंकरराव कटकधोंड)** कमला शंकर निवास पी. क्र.37 गीता नगर, जुले सोलापूर, सोलापूर-413004.<br>**हमीदार -**<br>**2. श्री. गणेश शंकरराव कटकधोंड** कमला शंकर निवास पी. क्र. 37 गीता नगर, जुळे सोलापूर सोलापूर- 413004<br>**3. श्री. राजेश शंकरराव कटकधोंड** कमला शंकर निवास पी. क्रमांक 37 गीता नगर, जुळे सोलापूर, सोलापूर-413004<br>**४. श्रीमान दिनेश शंकरराव कटकधोंड** कमला शंकर निवास पी. क्रमांक 37 गीता नगर, जुळे सोलापूर, सोलापूर - 413004 | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>श्री. राजेश शंकरराव कटकधोंड, श्री. गणेश शंकरराव कटकधोंड आणि श्री. दिनेश शंकरराव कटकधोंड यांच्या नावे मालमत्तेचे गहाणखत.<br>सर्व जमिनीचे तुकडे टीपी क्रमांक III, सीएस क्रमांक 2649, दक्षिण सदर बाजार, क्रजच्या मागे ज्वेलर्स, सात रस्त्याजवळ, सोलापूर 413003 येथे आहेत.<br>**सीमा खालीलप्रमाणे आहेत : -**<br>उत्तर :- रस्ता, पूर्व :- लेन, पश्चिम :- लेन, दक्षिण :- सीएस क्रमांक 2648<br>CERSAI ASSET ID:- 200068969179 | **मागणी सूचना :**<br>दि. 29/04/2025<br>रु. 3,88,93,103.51/-<br>(तीन कोटी अठ्ठयाऐंशी लाख त्र्याण्णव हजार एकशे तीन रुपये एकावन्न फक्त) अधिक लागू न केलेले व्याज 29/04/2025 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत.<br>**सांकेतिक ताबा तारीख:**<br>30/06/2025 |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ३०/०६/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## जाहीर नोटीस

**ॲड.दीपक भास्कर केसकर**
बी.ए., एलएल.एम., ॲडव्होकेट
प्लॉट नं. ९, प्राची अपार्टमेंट, गांधीनगर,
२२४/९ सिव्हील लाईन्स, सोलापूर-४१३००३

**सोलापूर येथील मे.लवाद अधिकारी श्री. संजय आर. करवा साहेब यांचे न्यायलयात**

श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर ... अर्जदार/वादी
विरुद्ध
श्री. सातपुते पंडित शिवयोगी - वगैरे ३ ... जाबदार/प्रतिवादी

| अ. क्र. | लवाद अर्ज नंबर | प्रतिवादीचे नंबर नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | ०२/ २०२४ | **नं. : २ बाळगी विजयकुमर बसण्णा** मु.पो. शिंगडगाव तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा सोलापूर ४१३२२८ | ६,८९,८७१/- | ०८/०७/२०२५ |

अर्जदार यांनी दाखल केलेल्या लवाद अर्जातील वरील प्रतिवादी नं. २ यांना मे. कोर्टातून पाठविलेले नोटीस प्रतिवादी नं. २ यांची नोटीस बजावणीचा रिपोर्ट अर्जदारास आलेला नाही. या कारणाने प्रतिवादी नं. २ यांची सदर जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

उपनिर्दिष्ट लवाद अर्जाचे कामी आपण आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वर नमूद केलेल्या तारखेदिवशी वार - शुक्रवार, दिनांक ०८/०७/२०२५ सकाळी ११.३० वाजता सदर अर्जाचे कागदपत्रासह या न्यायालयात हजर रहावे. सदर नोटीसीद्वारे असेही कळविण्यात येते की, जाबदार प्रतिवादी वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक : ११/०६/२०२५ रोजीचे मा.लवाद अधिकारी साहेब यांच्या हुकूमान्वये ही जाहीर नोटीस दिली आहे.

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप.**
**क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर**

ठिकाण : श्री अरुणोदय मल्टी-स्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर
पत्ता : प्लॉट नं. ७७, भाग्यलक्ष्मी पार्क, जुळे सोलापूर, सोलापूर-४१३००४

## जाहीर प्रसिध्दीकरण

**दि.कि.अर्ज नं. ३९/२०२५**

**अक्कलकोट येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**भिमाशंकर बसवंत ऊर्फ बसण्णा बनसोडे**
**वय : ५१ वर्षे, धंदा : शेती**
**रा.सदलापूर, ता. अक्कलकोट जि.सोलापूर-४१३२१६**
**मोबा.नं.८४४६४४२२०१** — **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** --- **सामनेवाला**

ज्याअर्थी के. बसण्णा मारुती बनसोडे रा. सदलापूर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर हे दिनांक १५/१२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. बँक ऑफ इंडिया शाखा शिरवळ येथील कै. बसण्णा मारुती बनसोडे यांचे बचत खाते क्र.०७३४१०१००००२२९६ मध्ये रक्कम रु.२६,१५६/- इतकी जमा असून, वर नमुद रक्कम यातील अर्जदारांना मयत बसण्णा मारुती बनसोडे यांचे वारस म्हणून मिळणेचा कायदेशीर हक्क आहे. भिमाशंकर बसवंत ऊर्फ बसण्णा बनसोडे, शांताबाई बसण्णा बनसोडे, मारुती बसण्णा बनसोडे, रत्नाबाई बसण्णा अड्डद हे वारसदार असल्याचा वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केले आहे.

त्या अर्थी या नोटीसीने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत, के बसण्णा मारुती बनसोडे यांचा मृत्यू अथवा अर्जदार हे वारस नाहीत असे कोणाची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठार्थ अथवा विरुध्द कोणाचे कांही म्हणणे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. ०१/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे बसण्णा मारुती बनसोडे यांचे वारस सर्टिफिकेट देण्यात येईल.ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता. २७/०६/२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट**

## जाहीर समन्स

**पुढील नेमलेली तारीख १६/०७/२०२५**
**पुर्नविलोकन अर्ज नं. २२७/२०२२**

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. यांचे न्यायालयात**

**श्री. अशोक शिवाजी बारबोले** --- **अपेलंट**
**विरुध्द**
**दत्ताबाळ पोपटराव अरनाळे वगैरे** --- **रिस्पॉडंट**

ज्याअर्थी अपेलंट यांनी मा. तहसिलदार साहेब बार्शी यांनी दि.२६/०४/२०२२ रोजी रस्ता वहिवाट अर्ज क्र. जमा ०२/ रस्ता/१४३/ एस आर ४९/२०२१ (संगणकीय सांकेतांक २०/२०२२) मधील दिलेला आदेश रद्द करण्याबाबत या मे. न्यायालयात पुर्नविलोकन अर्ज दाखल केलेला आहे. प्रकरणी प्रस्तुत अर्जाकामी श्री. मधुसुदन नरसिंहराव गोलकोंडा हे जरुरीचे पक्षकार म्हणुन सामील केलेले होते. परंतु श्री. मधुसुदन नरसिंहराव गोलकोंडा हे मयत असल्याची माहिती अपेलंट यांना मिळालेली आहे. परंतु श्री. मधुसुदन नरसिंहराव गोलकोंडा यांचे मृत्युनंतर त्यांचे वारसांची माहिती अपेलंट यांनी घेण्याचा प्रयत्न केला परंतु वारसांची माहिती मिळुन आलेली नाही, अथवा इतर सा.वाला यांनी दिलेली नाही. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने न्यायाचे दृष्टीने श्री मधुसुदन नरसिंहराव गोलकोंडा यांचे वारस नमुद अर्जाकामी दाखल करणे आवश्यक आहे.

तरी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपेलंटचे अर्जातील श्री मधुसुदन नरसिंहराव गोलकोंडा यांचे कोणी वारस असतील त्यांनी अर्जाकामी हजर राहुन त्यांचे काही म्हणणे, हक्क अधिकार असल्यास हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत अगर पुढील नेमलेली तारीख १६/०७/२०२५ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकिलामार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. ता. २/७/२०२५

(कोर्टाचा शिक्का) **सही/-** **मा. उपविभागीय अधिकारी क्र.१** **सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

**दि.कि. अर्ज नं.३३/२०२५**

**अक्कलकोट येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात**

**गंगाबाई रेवणसिध्द कुंभार वगैरे** --- **अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही** --- **सामनेवाला**

ज्याअर्थी कै. गजराबाई आणप्पा कुंभार रा. बागेहळ्ळी., ता. अक्कलकोट, जि. सोलापूर ही मौजे बागेहळ्ळी येथे दि.०८/०२/२०२५ रोजी मयत झाली आहे तर त्यांचे पती आणप्पा नरसप्पा कुंभार हे दिनांक १८/०५/२०२१ रोजी मयत झाले आहेत. कै. गजराबाई आणप्पा कुंभार यांच्या नांवे मौजे बागेहळ्ळी येथे घरकुल बांधकाम करण्याकरीता महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायत राज विभाग प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ मंजूरी क्रमांक MH123973421 या आदेशाने रक्कम रु.१,५८,७३०/- इतके अनुदान मंजूर झाले आहे. कै. गजराबाई आणप्पा कुंभार यांच्या नांवे जमा असलेली अनुदान रक्कम गंगाबाई रेवणसिध्द कुंभार व गौराबाई ब्रम्हानंद कुंभार यांना मिळणेकरीता कै. गजराबाई आणप्पा कुंभार यांचे गंगाबाई रेवणसिध्द कुंभार व गौराबाई ब्रम्हानंद कुंभार हे कायदेशीर वारसदार असल्याचा वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता मे. न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केले आहे.

त्या अर्थी या नोटीसीने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत, कै. गजराबाई आणप्पा कुंभार यांचा मृत्यू अथवा अर्जदार हे वारस नाहीत असे कोणाची कांही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्ठार्थ अथवा विरुध्द कोणाचे कांही म्हणणे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि.०२/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे कै. गजराबाई आणप्पा कुंभार यांचे वारस सर्टिफिकेट देण्यात येईल. ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता. २७/०६/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सह. अधिक्षक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय अक्कलकोट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

**नि.नं. १५**
**पुढील नेमलेली तारीखः ०५/४/२०२५**
**दि. कि. अर्ज नं. २२/२०२४**

**बार्शी येथील मे. सि. ज. सि. डि. साहेब, यांचे कोर्टात**

**१) विजया सुनिल काळे,**
वय ४६ वर्षे, धंदा- नोकरी,
रा. ३२०७, कापड गल्ली, किराणा रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) प्रथमेश सुनिल काळे,**
वय २१ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. ३२०७, कापड गल्ली, किराणा रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**३) संजित सुनिल काळे,**
वय- १९ वर्षे, धंदा- शिक्षण,
रा. ३२०७, कापड गल्ली, किराणा रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**
**विरुध्द**
**सौ. सुदामती त्रिंबक काळे,**
वय- ७३ वर्षे, धंदा- घरकाम,
रा. दडशिंगे, ता. बार्शी, जि. सोलापूर — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ या अर्जदार नं. १ व २ यांच्या जन्मदात्या आई आहेत, तसेच सामनेवाली ही मयत सुनिल त्रिंबक काळे यांची जन्मदाती आई आहे. सुनिल त्रिंबक काळे हे दि. २२/०१/२०२४ रोजी भगवंत सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, बार्शी येथे हृदय रोगाने मयत झालेले आहेत. सामनेवाली या मयत सुनिल त्रिंबक काळे यांच्या आई आहेत. तर, अर्जदार नं. १ ते ३ पत्नी व मुले आहेत. अर्जदार व सामनेवाला हेच मयत सुनिल त्रिंबक काळे यांचे हिंदु कायद्यानुसार सर्वात जवळचे कायदेशीर वारस आहेत. मयत सुनिल त्रिंबक काळे हे विद्यामंदिर कन्या प्रशाला, वैराग, ता. बार्शी येथे सहशिक्षक म्हणुन नोकरीस होते, ते नोकरीस असताना त्यांचे प्रोव्हिडंट फंडाची रक्कम रु. ६,०१,७२५/- (अक्षरी सहा लाख एक हजार सातशे पंचवीस रुपये) व ग्रॅच्युएटीची रक्कम रु. १७,८०,०००/- (अक्षरी सतरा लाख ऐंशी हजार रुपये) या शासनाकडे जमा आहेत. अर्जदार नं. २ व ३ यांचे शिक्षणाकरीता रक्कमेची नितांत गरज आहे. त्याकरीता अर्जदार यांनी दि. १०/१०/२०२४ रोजी मयत सुनिल त्रिंबक काळे यांचे प्रोव्हिडंट फंड व पेन्शन रक्कमेची व दि. २७/०३/२०२४ रोजी ग्रॅच्युएटीच्या रक्कमेची शाळेकडे मागणी केली असता शाळेने प्रोव्हिडंट फंड, ग्रॅच्युएटी व पेन्शनचे प्रस्तावाकरीता सक्षम दिवाणी न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र आणुन देण्याची मागणी केलेली आहे. मयत सुनिल त्रिंबक काळे यांचे पश्चात मिळणाऱ्या प्रोव्हिडंट फंड, ग्रॅच्युएटी व पेन्शनचे रक्कमेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांचे पश्चात अर्जदार नं. १ ते ३ व सामनेवाले हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बार्शी येथे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मयत कै. सुनिल त्रिंबक काळे यांना अर्जदार व सामनेवाला यांच्याशिवाय इतर कोणी वारस असेल अथवा त्यांच्याविषयी काही म्हणणे असल्यास या जाहीर प्रसिध्दीकरणापासुन ३० दिवसांच्या आत अथवा पुढील नेमलेली तारीख ४/८/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे, हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावे. मुदतीत कोणाचीही हरकत व म्हणणे न आल्यास अर्जदार यांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. मे. कोर्टाचे सदर प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. दि.०२/०७/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सही/-** **सहाय्यक अधिक्षक** **सि. ज. सि. डि. यांचे न्यायालय, बार्शी,** **ता. बार्शी, जि. सोलापूर**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे**

### जाहीर फेरलिलाव व विक्री नोटीस

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ही संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक ०४/०३/२०२३ रोजी मागणी नोटीस कर्जदार केदार महादेव हदरे प्रोप्रा केदार महादेव हदरे रा.१) मु.पो. संगदरी ता. दक्षिण सोलापूर २) आय १५४, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर व जामीनदार १) श्रीशैल शरणप्पा माळी रा. फ्लॅट न.२, गौरी अपार्टमेंट, बलदवा नगर, शेळगी, सोलापूर २) विजय दौलप्पा बिराजदार रा. ११, मित्र नगर, शेळगी, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये २५,३६,३३२/- या वर दिनांक ०१/०८/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव 'जेथे आहेत व जैसे आहेत' अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थितीमध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढीलप्रमाणे असे**

| अं. क्र. | कर्जदार / जामीनदार यांचे नाव व पत्ता | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | ३१/०३/२०२५ अखेर येणेबाकी |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार :**<br>**केदार महादेव हदरे**<br>**प्रोप्रा केदार महादेव हदरे**<br>रा.१) मु.पो. संगदरी ता. दक्षिण सोलापूर २) आय.१५४, श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड, सोलापूर<br>**जामीनदार**<br>**१. श्रीशैल शरणप्पा माळी**<br>रा. फ्लॅट नं. २, गौरी अपार्टमेंट, शेळगी, सोलापूर<br>**२. विजय दौलप्पा बिराजदार**<br>रा.११, मित्र नगर, शेळगी, सोलापूर | केदार महादेव हदरे यांचे मालकी व वहिवाटीची मौजे बोरामणी ता. दक्षिण सोलापूर येथील गट क्र. ४४२ क्षेत्र ००.७९ हे. आर व पो.ख. ०.०१ हे.आर. | रु. ३०,८४,७६२/- | रु. ३८,११,७३८/- दि. ०१/०४/२०२५ अखेर होणारे पुढील व्याज, दंडव्याज व इतर खर्च |
| | **लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ** | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक : ०६/०८/२०२५ वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत निविदा उघडण्याची दिनांक ०८/०८/२०२५ वेळ सायंकाळी ४:०० वाजता | | |

**टिप** - १. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि.०४/०८/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी. बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्यासूचना पत्रका मध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक : ०२/०७/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**परिशिष्ट- ४ (ए), ८(६) ची तरतूद**

### जाहिर फेरलिलाव

ज्याअर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्युरिटायझेशन ऑफ रिकन्सट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अॅन्ड इंफोर्समेंट ऑफ सिक्युरीटरी इंटरेस्ट अॅक्ट २००२ (SARFASI) व्या कलम १३(४) अंतर्गत वसुलीसाठी कर्जदार व जामीनदार यांच्या खालील तपशीलातील तारण मालमतेचा पुढील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्रीसाठी बंद पाकिटात (बयाणा रक्कमेसह) निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती : १)** निविदा ही बयाणा रकमेसाहित बंद पाकिटात प्राधिकृत अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि. सोलापूर यांचे नावाने जमा करावी. **२)** राखीव किंमतीपेक्षा कमी रक्कम आणि किंवा कमी बयाणा रकमेची कोणताही निविदा विचारांत घेतली जाणार नाही **३)** शेड्यूलमध्ये नमूद केल्यानुसार बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर / RTGS / NEFT लिलावांत सहभागी होण्यासाठी Authorized Officer, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur यांच्या नावे काढलेली असावी. **४)** यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किंमतीच्या २५% रक्कम (पंचवीस टक्के) त्यातून बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम वजा करून डीडी/पे ऑर्डर /RTGS / NEFT द्वारे लगेच भरावी लागेल व उर्वरित रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत किंवा बँकेने दिलेल्या मुदतवाढीच्या तारखेच्या आंत भरावी लागेल **५)** विक्री 'जसे आहे, जेथे आहे व आधार विरहीत' तत्वावर केली जात आहे. **६)** इतर अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील,

**शेड्युलमधीत मालमत्तेची विक्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे खालील निर्धारित तपशिलानुसार जाहिर लिलावाद्वारे केली जाईल.**

| अं. क्र. | मालमत्ता पाहणी तारीख व वेळा | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा सादर करण्याचे व उघडण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | दि. ०६/०८/२०२५ स. ११.०० ते दु. ३.०० पर्यंत | दि. ०७/०८/२०२५ स. ११.०० ते ५.०० पर्यंत | दि. ११/०८/२०२५ ५.०० वाजता. | श्री. महावीर अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर ६०/६१ पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर |

| क्र. | कर्जदार व जामीनदार नाव नोटीस दिनांक व रक्कम | तारण स्थावर मालमत्तेचा तपशिल | राखीव किंमत / बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू (एचयूएफ)<br>कलम १३(२) नोटीस दि. ०१/०२/२०२२<br>१३(४) नोटिस दि. ०१/०६/२०२२<br>दि. ३१/०१/२०२२ अखेर येणेबाकी रु.३,८७,१६,२१०/- (दि. ३०/०४/२०२५ अखेर येणेबाकी रु. ६,७२,२२,५१५/-)<br>मा. जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या मा. मंडल अधिकारी मंद्रूप, ता. दक्षिण सोलापूर यांचे मार्फत प्रत्यक्ष ताबा दि. ०४/०४/२०२४<br>**जामीनदार -**<br>१. दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू<br>२. शिवरुद्रप्पा सिध्दाराम कल्याणी<br>३. श्रीमंत निगप्पा पाच्चापुरे<br>४. संजय अण्णाप्या संगोळगी<br>५. विश्वजित अप्पासाहेब बिराजदार<br>६. सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू | दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू यांचे नांवावरील जिल्हा सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर, मौजे टाकळी हद्दीतील गट नं. ५७/१/ब पांसी क्षेत्र ०.६५.३७ आर.चौ.मी. यावरील सध्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे-<br>**पूर्व** - सोलापूर विजयपूर रस्ता,<br>**पश्चिम** - गट नं. ५७/अ/१ ५७/अ/३<br>**दक्षिण** - गट नं. ५७अ/३<br>**उत्तरेस** - ५७/अ/१ | २,३६,३४,५००/-<br>२४,००,०००/- |

बँकेस ज्ञात असलेल्या बोजाचा तपशील नाही. मालमत्तेबाबत कोणताही दावा कोणी केला असल्यास किंवा त्या स्वरूपाचा व मूल्याचा कोणताही अन्य ज्ञात तपशील नाही.

**दिनांक : ०२/०७/२०२५**
**स्थळ : सोलापूर**
**(टिप :- स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य.)**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर**


## Classifieds

### विकणे आहे

**कृष्णा आर्केड, जुने विठ्ठल मंदिर शेजारी उत्तर कसबा सोलापूर येथील वन बीएचके सेमी फर्निश्ड फ्लॅट विकणे आहे. कारपेट ४८० स्क्वे. फूट बिल्टअप ६०० स्क्वे. फूट वकील, चार्टर्ड अकौंटंट यांना प्राधान्य.**
**संपर्क : 9890606763**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## संक्षिप्त वृत्त



### करमाळयाच्या दोन आदर्श शेतकऱ्यांचा सन्मान

**करमाळा, दि.२ जुलै-**

कृषी दिनानिमित्त कृषी विभागाच्या वतीने सोलापूर येथे चिखलठाण येथील अविनाश सरडे व संतोष चव्हाण चिखलठाण विभागातील दोन प्रगतशील शेतकऱ्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन विभाग सोलापूर व जिल्हा परिषद कृषी विभाग यांच्या वतीने कृषी दिनानिमित्त कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा सन्मान जिल्हा परिषदेच्या सभागृहात करण्यात आला. यामध्ये चिखलठाण नंबर दोन येथील अविनाश मारुती सरडे यांनी निर्यातक्षम केळी पिकामध्ये घेतलेल्या भरघोस उत्पादनाबद्दल व संतोष चव्हाण यांना सेंद्रिय शेतीमधील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रशस्तीपत्र पुरस्कार देऊन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले आत्माचे प्रकल्प संचालक कांतीलाल खोत जिल्हा कृषी विकास अधिकारी यांच्या हस्ते गौरवण्यात आले. त्याना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल परिसरातील लोकांमधून त्यांचे अभिनंदन केले जात आहे



### अथर्व उद्योग समूहाचे चेअरमन मानसिंग खोराटे यांचा सत्कार

**सोलापूर, दि. २ जुलै-**

जीएसटी दिनाच्या ८व्या वर्धापन दिनानिमित्त राज्य वस्तू आणि सेवा कर विभागातर्फे अथर्व उद्योग समूहाचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक मानसिंग खोराटे यांचा सत्कार आणि विशेष सन्मान कोल्हापूर मंडळ अतिरिक्त आयुक्त किरण नांदेडकर यांच्या हस्ते झाला. अथर्व उद्योग समूहाने आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत सर्वाधिक जीएसटी भरणा केला असून राज्य व केंद्रीय महसूलमध्ये उल्लेखनीय योगदान दिले. तसेच केंद्रीय व राज्य जीएसटी कायदाअंतर्गत उत्कृष्ट कर अनुपालन केल्यामुळे जीएसटी कोल्हापूर परीमंडळ कार्यालयामार्फत कौतुक करण्यात आले. जीएसटी कायद्यानुसार काटेकोरपणे नियमांचे पालन करणाऱ्या करदात्यांचा सन्मान करून इतर व्यवसायांना कर सुसंगतीचे महत्त्व पटवून देण्याचा राज्य जीएसटी विभागाचा हा उपक्रम आहे. यावेळी अथर्वचे सी.ए निशांत पाटील, अतुल पाटील, जीएसटी विभागातील सुनीता थोरात, श्री समरजित थोरात संयुक्त आयुक्त, कोल्हापूर मंडळ व सर्व कोल्हापूर परिमंडळ कर्मचारी उपस्थित होते.

# सीना-माढा उपसा सिंचनसाठी आवर्तन सुरु

### आ. अभिजीत पाटील यांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ जुलै -**

माढा तालुक्यातील सर्व पाझर तलाव भरून घेण्यासाठी सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या प्रयत्नातून आज सकाळी पाण्याचे पूजन करून सोडण्यात आले. आमदार पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झाले असून या निर्णयामुळे माढा तालुक्यातील शेतीला मोठा दिलासा मिळणार असून आगामी हंगामात कृषी उत्पादनात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे.



माढा तालुक्यातील सर्व पाझर तलाव भरण्यासाठी सतत अधिकाऱ्यांसोबत बैठक व चर्चा करून आज पाणी सोडण्यात आले असून शेतकऱ्यांसाठी आनंदाची गोष्ट आहे. टेल टू हेड पाणीपुरवठा पुर्ण होईल. असे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य भारतआबा शिंदे, जेष्ठ नेते, भारतनाना पाटील, युवक जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, युवती जिल्हाध्यक्ष विनंती कुलकर्णी, डिव्हीपी बँकेचे चेअरमन औदुंबर महाडिक, रामकृष्ण काळे, सुरेश पाटील, बाळासाहेब ढेकणे, हरिभाऊ माने, आकाश पाटील, दिपक खोचरे, धाराशिव साखर कारखान्याचे संचालक संदीप खारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

> गेले कित्येक वर्ष या योजनेसाठी शेतकऱ्यांच्या ऊस बिलातून रणजीत शिंदे यांनी पैसे घेतले ८१ टक्के हे शासनाने व १९ टक्के हे शेतकऱ्यांनी भरायचे असताना देखील शेतकऱ्यांकडून पूर्णपणे पैसे वसुली करण्यात आली त्या पैशाचा हिशोब रणजित शिंदे यांनी द्यावा तसेच काल परवा ज्यांनी आमदारांवर टीका केली त्यांची कुवत त्यांनी स्वतः तपासून घ्यावी या शब्दात जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे यांनी खोचक टीका केली. - जि.प.सदस्य, भारत शिंदे.

# सोलापूर-अजमेर विशेष गाड्यांच्या अतिरिक्त २६ फेऱ्या सुरू राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै -**

प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वे प्रशासनाकडून सोलापूर-अजमेर विशेष गाड्यांच्या अतिरिक्त २६ फेऱ्या सुरू राहणार आहेत. प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वे सोलापूर आणि अजमेर दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या अतिरिक्त २६ फेऱ्या सुरू ठेवणार आहे : सोलापूर - अजमेर साप्ताहिक विशेष (२६ फेऱ्या) २५/०६/२०२५ पर्यंत धावण्यासाठी अधिसूचित केलेली ट्रेन क्रमांक ०९६२७ अजमेर-सोलापूर साप्ताहिक विशेष आता



दर बुधवारी ०२/०७/२०२५ ते २४/०९/२०२५ पर्यंत धावणार आहे. (१३ फेऱ्या) २६/०६/२०२५ पर्यंत धावण्यासाठी अधिसूचित केलेली ट्रेन क्रमांक ०९६२८ सोलापूर-अजमेर साप्ताहिक स्पेशल आता ०३/०७/२०२५ ते २५/०९/२०२५ पर्यंत दर गुरुवारी धावणार आहे. (१३ फेऱ्या).

# 'त्या' गुरुजीला अटक करण्यास होतेय टाळाटाळ

### पोलीस महानिरीक्षक फुलारी यांच्याकडे मनसेने केली तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २ जुलै-**

एका १७ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीस तु माझ्या घरी ये मी दहावीच्या पेपरला तुला मदत करतो अशी थाप मारुन घरी बोलावून तिचा विनयभंग केल्याची घटना घडली होती. दरम्यान या घटनेतील आरोपी माध्यमिक शिक्षक रमेश नागन्नाथ पाटील (रा. बोराळे) याला पकडण्यात दोन महिन्यानंतरही तपास आधिकारी टाळाटाळ करीत असल्याची लेखी तक्रार मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्याकडे केली आहे.

या घटनेची हकीकत अशी, आरोपी रमेश पाटील हा बोराळे येथील माध्यमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहे. याच परिसरातील एक १७ वर्षीय मुलगी त्या प्रशालेत शिकत होती. या विद्यार्थिनीस तु माझ्या घरी ये, मी तुला दहावीच्या पेपरला मदत करतो असे अमिष दाखवून घरी बोलावून तिच्या अंगाशी झोंबाझोंबी करुन तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले होते. सुरुवातीला पोलीसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली होती. तदनंतर मनसेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन समोर आंदोलन केल्यानंतर पोलीसांनी नमते घेवून दि.२८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला. या घटनेला तब्बल दोन महिने होऊनही तपासाधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी आरोपी पकडण्यास टाळाटाळ केली असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आलेला आहे. आरोपीचा पंढरपूर जिल्हा सत्र न्यायालयाने अटकपुर्व जामीन फेटाळला असून मुंबई उच्च न्यायालयात त्याने धाव घेतली असल्याचे सांगण्यात आले. तपासाधिकारी कायद्याच्या बाजूने काम करतात की, आरोपीच्या बाजूने काम करतात? याबाबत नागरिकामधून शंका व्यक्त केली जात आहे. साधे शिक्षक तपासाधिकाऱ्याला सापडत नसल्यामुळे दरोडेखोर व गंभीर गुन्ह्यातील आरोपी कसे काय सापडणार? याबाबत संतापजनक सवाल केला जात आहे. या घटनेत चिरीमिरीचाही संशय व्यक्त केला जात असून त्यामुळेच आरोपीला अटक केले जात नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. एक जबाबदार शिक्षकाने विद्यार्थिनीवर असे कृत्य केल्यामुळे पोलीस त्या शिक्षकाला पाठीशी घालत असल्याने पालकांनी मुलींना शाळेत कसे पाठवायचे? असा सवाल पालक करीत असून पोलीसांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. यासाठी पोलीसांनी आपल्या चारित्र्यावरचा डाग काढण्यासाठी आरोपीला तात्काळ अटक करुन पिडीतेला न्याय द्यावा अशी मागणी आहे. आरोपीला तात्काळ अटक न केल्यास पोलीस स्टेशनसमोर आंदोलन छेडण्याचा इशारा गोवे यांनी दिला आहे.

# धमकीने लावले लग्न; अल्पवयीन पत्नीचा छळ

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जुलै-**

शिक्षण घेत असलेल्या अल्पवयीन मुलीच्या आईला धमकी देत तुझ्या मुलीसोबत लग्न करायचे आहे, नाही केल्यास तिला पळवून नेईन असे म्हणत लग्न लावून घेतल्यानंतर संबंधित मुलीचा पती व सासरच्या मंडळींनी हुंडा, मानपान आणि घरकामाच्या कारणावरुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप पीडित अल्पवयीन विवाहितेने केला आहे. या प्रकरणी संबंधितांविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पिडीतेने फिर्यादीत म्हटले पिडीतेचे सध्याचे वय १७ वर्ष ५ महिने असुन पिडीता दोन वर्षापूर्वी शाळा शिक्षण घेत असताना ती अल्पवयीन आहे हे माहीत असूनही पवन राजकुमार गायकवाड याने पिडीत पत्नीच्या आईस तुझ्या मुलीसोबत लग्न करायचे आहे, नाही केल्यास तिला पळवून नेईन अशी धमकी दिली. त्यांनंतर घाबरलेल्या आईने नातेवाईकांना सोबत घेऊन लग्न जमविण्यासाठी बोलले असता संबंधित मुलाच्या आई व वडिलांनी आम्हाला फक्त नारळ दया बाकी काही नको, लग्न आम्ही करतो अशी मागणी केली. त्यानंतर दोन वर्षापूर्वी २९ मे २०२३ रोजी मोजक्या पाहुण्यात लग्न झाले. दरम्यान एक महिन्यानंतर सासु सासरे तसेच पतीने लग्नात मानपान केला नाही. तुला फुकट घरात घेतलय, तुला काम येत नाही म्हणून मारहाण व छळ सुरु केला. तसेच सणावाराला आल्यानंतर नणंद कोमल हेही घालून पाडून पिडीतास बोलत असे. तसेच पतीस पिडीत पत्नी अल्पवयीन असल्याचे माहीत असताना व ती पतीस शरीर संबंधास नकार देत असताना त्याने बळजबरीने संबंध ठेवल्याच्या आरोपही पिडीतेने केला. त्यानंतर दोन महिन्याची गरोदर राहिलेल्या पिडीत सुनेला मानपानावरुन आमच्या घरी नांदवयाचे नाही, तुझ्या पोटातील मुल आम्हाला नको असे म्हणून लाथाने पोटावर, हाताने मारहाण करुन पिडीतेला माहेरी हाकलून दिले. पोटावर लाथाने मारहाण केल्याने दुसऱ्या दिवशी पोटात दुखून पोटातील गर्भाचा घरीच गर्भपात झाला आहे. तेव्हापासून पिडीता माहेरी आईकडे राहण्यास असल्याचे फिर्यादी म्हटले आहे. या गर्भपातास पती, सासु व सासरा हे जबाबदार आसल्याचे म्हटले आहे. यावरुन पती पवन राजकुमार गायकवाड, सासू अलका राजकुमार गायकवाड व सासरा राजकुमार कुंडलिक गायकवाड, तिघे रा. आगळगाव, ता.बार्शी, नणंद कोमल राहुल पौळ, रा. निरवांगी, ता. इंदापूर, जि. पूणे व पिडीतेचे आई यांचे विरुध्द तक्रार आहे. याबाबत अधिक तपास तालुका पोलीस करीत आहेत.

## क्रीडा

# यशस्वी जयस्वालचे अर्धशतक

**एजबॅस्टन, २ जुलै**

येथे बुधवारपासून सुरू झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी सलामीवीर यशस्वी जयस्वालच्या (८७) दमदार फलंदाजीच्या बळावर भारताने चहापानापर्यंत ५३ षटकांत ३ बाद १८२ धावांपर्यंत मजल मारली. चहापानासाठी खेळ थांबला तेव्हा कर्णधार शुभमन गिल नाबाद ४२, तर ऋषभ पंत नाबाद १४ धावांवर खेळत होते.

बेन स्टोक्सने पुन्हा एकदा प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यावर, यशस्वी जयस्वालच्या नाबाद ६२ धावांमुळे भारताने उपहारापर्यंत २ बाद ९८ धावांची मजबूत स्थिती निर्माण केली.

निळ्या आकाशात आणि तेजस्वी सूर्यप्रकाशात जयस्वालचा डाव अनुक्रमे सत्राच्या पहिल्या व दुसऱ्या तासात संयम व आक्रमकतेमध्ये विभागला गेला. सुरुवातीला संयमाने खेळल्यानंतर यशस्वीने ३४ चेंडूत आपले नाबाद १६ वे अर्धशतक साजरे केले.


यशस्वी जयस्वाल


शुभमन गिल


लीड्समध्ये शतकाने मालिकेची सुरुवात केल्यानंतर, त्याचे बर्मिंगममध्ये पहिल्या डावातील कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचे मनसुबे दिसत होते.

भारताच्या जेमतेम १५ धावा झाल्या असताना ख्रिस वोक्सने केएल राहुलचा (२) त्रिफळा उडविला. त्यानंतर यशस्वीने करुण नायरसोबत दुसऱ्या गड्यासाठी ८० धावांची भागीदारी केली. करुण नायरने ५० चेंडूंचा सामना करत ५ चौकारांच्या मदतीने ३१ धावांचे योगदान दिले. पुढे यशस्वी जयस्वाल व कर्णधार शुभमन गिल यांची जोडी चांगली जमली. गिलच्या साथीने यशस्वी आपल्या वैयक्तिक शतकाकडे आगेकूच करत होता, मात्र अशातच बेन स्टोक्सच्या गोलंदाजीत जयस्वालचा उडालेला झेल जेमी स्मिथने पकडला. यशस्वी जयस्वालने १०७ चेंडूंत १३ चौकारांसह ८७ धावांची खेळी केली. त्याने गिलसोबत तिसऱ्या गड्यासाठी ६६ धावांची भागीदारी केली व संघाला ४५.१ षटचरकांत ३ बाद १६१ धावांचा टप्पा गाठून दिला. पुढे गिल व ऋषभ पंतने भारतीय संघाला चहापानापर्यंत ५३ षटकांत ३ बाद १८२ धावा रचून दिल्या. त्यावेळी गिल नाबाद ४२ धावांवर, तर पंत नाबाद १४ धावांवर खेळत होते. तोपर्यंत इंग्लंडकडून ख्रिस वोक्स, ब्रायडन कार्से व बेन स्टोक्सने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# बुमराहला विश्रांती दिल्यामुळे शास्त्री संतापले

**बर्मिंगम, २ जुलै-**

सात दिवसांच्या विश्रांतीनंतर तू जगातील सर्वोत्तम गोलंदाज बाहेर बसला असे म्हणत भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी आश्चर्य व्यक्त केले व इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यातून पूर्णपणे तंदुरुस्त जसप्रीत बुमराहला विश्रांती देण्याच्या भारतीय संघ व्यवस्थानाच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. वेगवान गोलंदाजाला महत्त्वाच्या सामन्यातून बाहेर बसण्याचा पर्याय दिला जाऊ नये, असेही ते म्हणाले. गत वर्षी ऑक्टोबरपासून कसोटी क्रिकेटमध्ये कठीण परिस्थितीतून जात असलेल्या भारताने गत नऊ सामन्यांमध्ये केवळ एकच विजय मिळवला आहे. हा गत दशकातील त्यांचा सर्वात वाईट खेळ आहे. शुभमन गिल आणि त्याच्या संघाने इंग्लंडविरुद्ध लीड्समध्ये पहिली कसोटी पाच गड्यांनी गमावली. 'जर तुम्ही भारताने मिळवलेल्या धावसंख्येकडे पाहिले तर हा एक अतिशय महत्त्वाचा कसोटी सामना बनतो. तुम्ही न्यूझीलंडविरुद्ध तीन सामने गमावले आहेत, तर तुम्ही ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन गमावले आहेत,'' शास्त्री यांनी सांगितले. तुम्ही येथे पहिला कसोटी सामना गमावला आहे आणि तुम्हाला पुन्हा विजयाच्या मार्गावर जायचे आहे. तुमच्याकडे जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज आहे आणि तुम्ही त्याला सात दिवसांच्या विश्रांतीनंतर बाहेर बसवता, हे विश्वास ठेवणे खूप कठीण आहे, असेही ते म्हणाले. बुमराहने लीड्समधील पहिल्या डावात १४ व्यांदा पाच बळी घेतले होते. (वृत्तसंस्था)


रोहित जाधव


सत्यजित जाधव


स्नेहल जाधव

# सोलापूरचे तिघे महाराष्ट्र क्रिकेट संघ निवड समितीवर

### रोहित, सत्यजित व स्नेहल जाधव यांचा समावेश, रोहितची सलग तिसऱ्यांदा निवड

**सोलापूर, दि. २ जुलै-**

येथील रोहित प्रकाश जाधव, सत्यजित दत्तात्रय जाधव व स्नेहल जाधव यांची महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे संघ निवडीसाठी निवड समितीवर निवड झाली आहे. रोहित यांची सलग तिसऱ्यांदा निवड झाली आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या २०२५-२६ ह्या स्थानिक/डोमेस्टिक वर्षाच्या विविध स्पर्धा साठी पुणे येथे एमसीएचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच चेअरमन सचिन मुळे, सचिव कमलेश पिसाळ, सीईओ अजिंक्य जोशी यांच्या बैठकीत महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिलांचे विविध वयोगटाच्या संघाचे निवड समित्या तसेच प्रशिक्षक आणि सहाय्यक स्टाफ यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या.

माजी रणजीपटू तथा फिरकीपटू रोहित जाधव यांची पुरुषांच्या वरिष्ठ गटाच्या संघ (रणजी चषक, विजय हजारे चषक, सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धा) या निवड समितीत निवड झाली आहे. स्नेहल जाधव यांची सलग दुसऱ्या वर्षी निवड समितीच्या चेअरमनपदी निवड झाली. सीनियर महिला गट व अंडर २३ महिला हे दोन संघ ते निवडतील. सत्यजीत जाधव यांची महाराष्ट्र २३ वर्षांखालील मुलींचे क्षेत्ररक्षक प्रशिक्षक म्हणून निवड झाली. त्यांचे सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, व्हाईस चेअरमन श्रीकांत मोरे, सेक्रेटरी खासदार धैर्यशील मोहिते पाटील, अध्यक्ष दिलीप माने व संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबर्सू यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

### भारताचा इराकवर सरळ ५-0 ने विजय

**चियांग माई :** भारतीय महिला फुटबॉल संघाने एएफसी महिला आशियाई चषक २०२६ पात्रता फेरीत आणखी एक दमदार कामगिरी केली. चियांग माई स्टेडियमच्या ७०० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित स्पर्धेत बुधवारी भारतीय महिला फुटबॉल संघाने इराकवर सरळ ५-0 गोलने विजय नोंदविला. संगीता बासफोर आणि मनीषाने पूर्वार्धात, तर कार्तिका अंगमुथु, फणजौबाम निर्मला देवी आणि नोंगमैथेम रतनबाला देवीने उत्तरार्धात प्रत्येकी एक गोल नोंदवून भारताला सरळ पाच गोलने विजय मिळवून दिला. या कामगिरीबरोबरच भारताची गोलसंख्या तीन सामन्यांत २२ वर पोहोचली व भारताने एकही गोल स्वीकारला नाही.

### जिल्हा अजिंक्यपद बॅडमिंटन ११ जुलैपासून

**सोलापूर, दि. २ जुलै-**

महाराष्ट्र राज्याच्या आंतरजिल्हा स्पर्धांसाठी सोलापूर जिल्ह्याचा संघ निवडण्यासाठी घेतली जाणारी सोलापूर जिल्हा बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा यंदाचे वर्षी ११ ते १३ जुलै दरम्यान सुयश गुरुकूल येथील आत्मन क्रीडासंकुलात आयोजित केली आहे.

ही स्पर्धा १०, १३, १५, १७, १९ मुले व मुली आणि पुरुष व महिला आणि ४५ वर्षावरील गटात होईल. या स्पर्धेच्या नाव नोंदणी करिता https://mbasso.in या लिंकवर ६ जुलैपर्यंत या नावनोंदणी करावी. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या सहकार्याने राज्यस्तरीय स्पर्धांचा अनुभव असलेले ७ पंच येणार असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेतील सामने खेळविले जातील. अशी माहिती संघटनेचे कार्याध्यक्ष ओंकार दाते यांनी दिली. सोलापूर जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडूंनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन संघटनेचे अध्यक्ष जीतेंद्र राठी यांनी केले आहे.

# बार्शीच्या हाय परफॉर्मन्स संघाची मॉडेलवर मात

- जे. टी. कुलकर्णी स्मृती शांभवी करंडक क्रिकेट स्पर्धा
- गौरव गाडेकर सामन्याचा मानकरी



**सोलापूर, दि. २ जुलै-**

जे. टी. कुलकर्णी स्मृती शांभवी करंडक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेतसल गौरव गाडेकरच्या अष्टपैलू खेळामुळे बार्शीच्या हाय परफॉर्मन्स संघाने मॉडेल क्रिकेट अकादमीचा २८ धावांनी पराभव केला. गौरव सामन्याचा मानकरी ठरला.

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन आयोजित शांभवी कन्स्ट्रक्शन पुरस्कृत या स्पर्धेत जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर बुधवारी झालेल्या सामन्यात नाणेफेक जिंकून मॉडेल क्रिकेट अकॅडमीने प्रथम क्षेत्रक्षण करण्याचा निर्णय घेतला. बार्शीने २९ षटकांत सर्व बाद १३६ धावा केल्या. त्यामध्ये गौरव गाडेकर याने ३० व पृथ्वी खोडवे याने २५ धावा केल्या. मॉडेलकडून निहार पॉल याने २१ धावात तीन बळी टिपले. श्लोक आनंद याने सहा धावांत एक गडी बाद केला. विजयी १३७ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या मॉडेल क्रिकेट अकॅडमीचा डाव २२ षटकात १०८ धावांत आटोपला. यात कार्तिक पाटोळे याने ३८ धावा केल्या . बार्शीकडून गौरव गाडेकर याने २१ धावात व अर्णव जगदाळे ने २१ धावांत प्रत्येकी तीन बळी टिपले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आषाढीत संतसाहित्याच्या विक्रीतून होते लाखोंची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ जुलै -**

वारकरी सांप्रदायामधील महामेळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आषाढी यात्रेच्या काळात धार्मिक ग्रंथांना खूपच मागणी असते. त्यामुळे संत साहित्यांची विक्री करणारी अनेक दुकाने सध्या पंढरपूरात थाटलेली दिसत असतात. या संत साहित्याच्या विक्रीतून यात्राकाळात मोठी आर्थिक उलाढाल होत असते.

वारकऱ्यांचे माहेरघर म्हणून पंढरीचा उल्लेख केला जातो. या ठिकाणी भरणाऱ्या प्रमुख यात्रांशिवाय चार्तुमास तसेच वर्षभर विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते. त्यामुळे शहरातील धार्मिक पुस्तुकांची कायमस्वरुपी विक्री करणाऱ्या विक्रेत्यांच्या शिवाय यात्रा काळात बाहेरगावांहून देखील मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारच्या पुस्तकांची विक्री करण्यासाठी विक्रेते येथे दाखल होत असतात. त्यामुळे मंदिर परिसरात परिसर, प्रदक्षिणा रस्त्यावर अशा प्रकारच्या धार्मिक पुस्तकांची, ग्रंथांची विक्री करणाऱ्या दुकानाची संख्या मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

या वर्षी देखील अशा दुकानांमधून भाविकांची सध्या गर्दी होवू लागलेली आहे. धार्मिक पुस्तकांची विक्री करणारे येथील विक्रेते कांगे बंधु म्हणाले, सार्थ ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत, हरीविजय, राम विजय, नवनाथ आदी पारायण ग्रंथाबरोबरच भजनी मालिका, गवळणी, आरतीसंग्रह, पाळणे, हरिपाठ, विद्यार्थ्यांसाठी कीर्तने व प्रवचन मालिकांच्या पुस्तकांना भाविकांकडून चांगली मागणी असते.

यात्रेच्या काळात शहरातील विविध धार्मिक पुस्तकांच्या दुकानांमधून लाखोंच्या संख्येने विविध ग्रंथ व पुस्तकांची विक्री होत असते.




## वाचनसंस्कृती कमी झाल्याची ओरड

टिव्हीच्या वाढत्या वाहिन्यां तसेच मोबाईलच्या वाढत्या वापरांमुळे अलिकडच्या काळात वाचनसंस्कृती कमी झाल्याची ओरड केली जाते आहे. काही अंशी ही बाब जरी खर असली तरी धार्मिक ग्रंथ,पुस्तके, संतांचे अभंग, हरिपाठ, भारुडे व गौळणी अशा संतसाहित्य वाचनाकडे सर्वच स्तरातील वाचकांचा कल वाढतो आहे. वारकरी सांप्रदायामधुन तर अशा संत साहित्याला कायमच मागणी असते.

## वारकरी सांप्रदायात ग्रंथपूजेला महत्व

वारकरी सांप्रदायामध्ये आजही ग्रंथपूजेला खूपच महत्व आहे. त्यामुळे वारकरी आजही मनोभावे ज्ञानेश्वरी, व तुकाराम गाथा आपल्या घरी नेत असतात. वारकरी सांप्रदायामधील वारकरी आजही नित्य हरिपाठाचे तसेच विठ्ठलरखुमाईच्या आरतीचे पठण केल्या शिवाय अन्नघेत नाहीत. अनेक भाविक नित्यपणे ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथ्याचे पारायण करीत असतात. त्यामुळे देखील त्यांच्याकडून विविध धार्मिक ग्रंथांना नेहमीच चांगली मागणी असते.

## भाविकांकडून संतसाहित्याला मागणी

शासनाच्या सर्व शिक्षा अभियानामुळे अगदी वाड्यावस्त्यांवर सुध्दा शाळा दिसू लागलेल्या आहेत. संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून जग जवळ आलेले आहे. एकीकडे अशी परिस्थिती असली तरी आजही धार्मिक ग्रंथ, पोथ्या, पुराणांना भाविकांम धून मोठी मागणी आहे. त्यामुळे दरवर्षी आषाढी यात्रे मध्ये येथील प्रदक्षिणा रस्त्यावर तसेच विठ्ठळ मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर धार्मिक ग्रंथ विक्रीची दुकाने थाटलेली दिसतात.

## महत्वाचे...




### घरफोडी करणाऱ्या चोरट्याला अटक; दीड लाखांचे सोने हस्तगत

**करमाळा, दि.२ जुलै-**

कंदर तालुका करमाळा येथे अभिजीत सरडे यांच्या घरी सहा डिसेंबर २०२४ रोजी दुपारच्या वेळी अज्ञात चोरट्याने चोरी करून दीड लाख रुपयाचे सोन्याचे दागिने चोरले होते याचा तपास करमाळा पोलीस ठाण्यामध्ये सुरू होता करमाळा पोलिसांनी योग्य दिशेने तपास करत आरोपी रामेश्वर जंगल्या भोसले यास अटक करून न्यायालया समोर उभे केले होते न्यायालयाकडून पोलीस स्टडी मंजूर झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील या आरोपीची चौकशी केली असता त्याच्याकडे दीड लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने सापडले आहेत त्यात कर्णफुले सोन्याची ठुशी इत्यादींचा समावेश आहे सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याने कर्जत,बीड,आष्टी,पाटोदा इत्यादी ठिकाणी घरफोड्या केल्या आहेत. पोलिसांची ही कामगीरी पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी.अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अजित पाटील करमाळा उपविभाग, करमाळा यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक रणजीत माने,सहा.पोलीस निरीक्षक गीरीजा म्हस्के,पो.उप.निरीक्षक प्रशांत मदने,पो.हवा.अजीत उबाळे, पो.ना. वैभव ठेंगल, पो.ना.मनिष पवार, पो.शि.सोमनाथ गावडे, योगेश येवले,पोकॉ मिलिंद दहिहांडे, अर्जुन गोसावी,अमोल रंदिल,रविराज गटकुळ, सह सायबर शाखेचे पो.नि गळवे व पो. शि.व्यंकटेश मोरे यांनी केली आहे.



### खा. लंके यांची प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या निवासस्थानी भेट

**पंढरपूर, दि. २ जुलै-**

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे खासदार निलेश लंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या गादेगाव येथील निवासस्थानी भेट दिली. या भेटीत त्यांनी फाटे यांचे वडिलांसह घरातील सर्व सदस्यांची विचारपूस केली. यानंतर गादेगाव ग्रामस्थांशी त्यांनी थेट संवाद साधत गावाच्या गरजा, अपेक्षा समजून घेतल्या. यावेळी खा. निलेश लंके यांचा करण्यात आला. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष नागेश पाटील, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष समाधान काळे, डॉ. रमेश फाटे उपस्थित होते.



### शिवाजी महाविद्यालयात सांख्यिकी दिन साजरा

**बार्शी, दि. २ जुलै-**

श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील संख्याशास्त्र विभागामध्ये राष्ट्रीय संख्याशास्त्र दिवस साजरा करण्यात आला. दरवर्षी प्रो. पी. सी. महालनोबिस थोर संख्या शास्त्रज्ञ यांचा जन्मदिन राष्ट्रीय संख्याशास्त्र दिवस म्हणून साजरा केला जातो. त्यांचे संख्याशास्त्रामध्ये असलेले योगदान बघून त्यांना पद्मविभषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. त्यांनी इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. या कार्यक्रमासाठी माजी संख्याशास्त्र विभाग प्रमुख डी. बी. बेंद्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. शेख उपस्थित होते. कार्यक्रमासाठी डॉ. आर. एस. चाटी, संख्याशास्त्र विभागाचे एम. आर.मस्के, गणित विभागाचे विभागप्रमुख एम. वाय. शिंदे, श्रीमती. ए. ए. मोटकुळे उपस्थित होते. यावेळी शेख सानिया, चैताली साबळे व समृध्दी करडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अपेक्षा खवले व आकांक्षा वायकर यांनी सूत्रसंचालन केले आणि ए. ए. मोटकुळे यांनी आभार मानले.

### अक्कलकोट गटशिक्षणाधिकारी यांच्या गैरवर्तणुकीबाबत चौकशी समिती

**सोलापूर, दि. २ जुलै-**

अक्कलकोटचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांच्याविरूध्द गैरशिस्त वर्तनाबाबत जिल्हा परिषद शाळेच्या विज्ञान शिक्षिकेने तक्रार केली आहे. त्या तक्रारीची दखल घेऊन शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी उपशिक्षणधिकारी रूपाली भावसार, विस्तार अधिकारी गोदावरी राठोड व विस्तार अधिकारी दौलतबेगम शेख यांची चौकशी समिती नियुक्त केली आहे. तक्रार दिलेली शिक्षिका ही विज्ञान शाळेत कार्यरत आहे. त्या शिक्षिकेकडून कोऱ्या धनादेशावर स्वाक्षरी करून घेणे, शाळा भेटीमध्येही मैदर्गी येथील कन्नड शाळेच्या वर्गावर वारंवार येणे, मोबाईलमधून शुटिंग करणे, वैयक्तिक जीवनात हस्तक्षेप करणे, अक्कलकोट शिक्षण विभागाअंतर्गत बीआरसी कार्यालयात बोलाविणे अशा तक्रारी महिला शिक्षिकेने जिल्हाधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे केली होती. त्या तक्रारीची दखल घेवून प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती केली आहे. चौकशी करून अहवाल सादर करण्याचा आदेश देण्यात आला आहे. यापूर्वीही अक्कलकोट गटशिक्षण अधिकारी विरोधात शिक्षकांसह शिक्षक संघटनांनी तक्रार केली आहे.

# दहा हजार वारकऱ्यांनी घेतला फूट मसाजरचा लाभ

## दमलेल्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २ जुलै -**

श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाल्यानंतर पहिल्याच दिवशीच्या मुक्कामी नऊ हजार ४८५ वारकऱ्यांची फूट मसाजरद्वारे जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांनी सेवा केली आहे.

यंदाच्या पालखी सोहळ्यात पायी चालत येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी फूट मसाजरची मोठ्या प्रमाणात सोय केली आहे. जिल्हा परिषदेचे १४० कर्मचाऱ्यांसमवेत ४०० फूट मसाजर पालखी मार्गावर ठेवण्यात आले आहेत. माळशिरस तालुक्यात उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल तोडकरी, अश्वजीत सरवदे, के. पी. शिंदे, विजय रणदिवे, दिलीप पोतलकर, स्वप्निल ढोबळे, आनंद कुलकर्णी, पांडुरंग सुरवसे, आनंद टेके, एन. एम. ननवरे, संग्राम पारसेवार, एस. एम. बारवे, एसपी गव्हाणे, जी.आर. भिडे, डी.डी. निंबाळकर, नितीन सुरवसे या टीम प्रमुखांनी कामकाज पाहिले. या सर्वांसह नियंत्रण म्हणून अविनाश गोडसे व झहीर शेख यांनी कामकाज केले.

पालखी सोहळा विसावल्यावर फूट मसाजर साठी वारकऱ्यांची केंद्रावर गर्दी पडली. पालखी सोहळ्या बरोबर चालून अनेक वारकऱ्यांचे पाय, गुडघे, पिंढऱ्या दुखत होत्या. या दुखऱ्या पायावर फूट मसाजरचा चांगला परिणाम दिसला. फ ूट मसाजरवर व्यायाम केल्यामुळे वारकऱ्यांना चांगलाच आराम मिळाला. दुखणे कमी होत असल्यामुळे अनेक वारकऱ्यांनी फूट मसाजरसाठी केंद्रावर रांगा लावल्या. त्रास होणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना कुटमसाजरचे सेवा मिळावी म्हणून अनेक भाविक पुढे येताना दिसून आले. माऊली, माऊली या आजोबांना सेवा द्या, असा पुढाकार घेत अनेकजण ज्येष्ठ नागरिकांचे दुखणे हलके करताना दिसून आले. दमलेल्या वारकऱ्यांची सेवा करताना जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान तरंगले.

### अधिकाऱ्यांनी केली पाहणी

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी फूट मसाजर सेवा केंद्राच्या कामाची पाहणी केली. पायी चालून थकलेल्या वारकऱ्यांना फूटमसाजरचा चांगलाच उपयोग होत असल्याबद्दल अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

### अशी झाली सेवा...

माऊलीच्या सोलापूर जिल्ह्यातील पहिलाच मुक्कामी वारकऱ्यांनी फूट मसाजर मशीनचा मोठ्या प्रमाणावर वापर केला. धर्मपुरी - २१४८, कारूडे - ४८७८, शिंगणापूर फाटा - ८४०, नातेपुते - १६१७

# स्वस्त धान्य दुकान दक्षता समितीच्या अध्यक्षपदी सरपंच जगताप

## महिला विरोधी पक्ष नेतेपदी विद्या कसबे

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २ जुलै-**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या जीवनावश्यक वस्तूवर देखरेख ठेवण्यासाठी मोहोळ तालुक्यातील मलिकपेठ येथील स्वस्त धान्य दुकान दक्षता समितीच्या अध्यक्षपदी सरपंच गणेश जगताप तसेच ग्रामपंचायत सदस्य विद्या कसबे यांची महिला विरोधी पक्ष नेतेपदी आणि ग्राम पंचायत सदस्य नागेश हजारे यांचे ही विरोधी पक्षनेतापदी निवड झाली आहे.




सचिवपदी ग्राममहसूल अधिकारी शुभांगी बनसोडे यांची निवड झाली. या समितीमध्ये सदस्य म्हणून ग्रामपंचायत अधिकारी पार्वती माळी, पोलीस पाटील विराज पाटील, वि.वि. का.से.सो. चेअरमन विजय कुमार पाटील, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग साठे, मनीषा चवरे, सुवर्ण हजारे, अनु. जातीचे अण्णासाहेब कसबे, अनु. जमातीचे विठ्ठल कोळी, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी बनसोडे, बचत गटाच्या अंबाबाई जगताप यांची निवड ग्रामसभेमध्ये करण्यात आली आहे.

# बासलेगावात अवैध सावकारी व्यावसायिकावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ जुलै-**

बासलेगाव (ता. अक्कलकोट) येथील अवैध सावकारी व्यवसायिकांवर अक्कलकोटचे सहाय्यक निबंधक यांच्या पथकाने अचानक धाड टाकून मुद्देमाल जप्त करून अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे अवैध सावकारी व्यावसायिकांमध्ये घबराट पसरली आहे.

या घटनेबाबत सूत्राकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, तक्रारदार परशु शाहू राठोड (रा. बासलेगाव हल्ली वृंदावन सोसायटी आरटीओ ऑफिस जवळ विजापूर रोड सोलापूर) यांनी काही घरगुती अडचणीमुळे आपल्या मालकीची गट नंबर २९०/२ ही शेत जमीन संशायित आरोपी संजीव बाळू राठोड (रा. बासलेगाव लक्ष्मण तांडा बसलेगाव) यांना काही कालावधीसाठी लिहून दिली होती. मात्र त्यांनी तक्रारदाराच्या संमतीवाचून अक्कलकोट-बॅगेहळ्ळी रस्त्यावरील श्रीशैल मुळजे (रा. गीता नगर बॅगेहाळे रोड अक्कलकोट) यांना परस्पर विक्री केल्याची तक्रार तक्रारदार परशु शाहू राठोड (रा. बासलेगाव) यांनी जिल्हा उपनिबंधक यांच्याकडे केली. त्यामुळे निबंधक किरण गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, सावकारांचा सहाय्यक निबंधक अक्कलकोट राहुल ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली, सहाय्यक संस्था अधिकारी श्रेणी (२) सिद्धेश्वर कुंभार, श्रीमती छाया नाटकर सहाय्यक सहकार अधिकारी, अनिल मदने सहाय्यक सहकारी अधिकारी, संजय पाटील, रवी कामनूरकर, अश्विनी कदम, पोहेकॉ सचिन मंगरुळे, पो. कॉ. श्रीमती वांजरे या पथकाने आरोपी संजीव बाळू राठोड (रा. बासलेगाव लक्ष्मण तांडा) यांच्या घरावर अचानकपणे धाड टाकून त्यांच्या घरातील खरेदी दस्त, कोरा धनादेश, स्टॅम्प पेपर, उसनवार पावती, सावकारी व्यवसायाची नोंदी असलेली वही, वाहन खरेदी व्यवसायाची नोटरी दस्त इत्यादी व श्रीशैल मुळजे रा. गीता नगर बॅगेहळ्ळी रोड अक्कलकोट यांच्या घरी दोन खरेदी दस्त हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी हे बेकायदेशीर सावकारी व्यवसाय करीत असल्याचे खात्री झाल्याने ताब्यात घेतलेले सर्व मुद्देमालांचे पंचनामा करून नमूद कागदपत्रे सिल बंद करून अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात संबंधित आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यात होत असलेल्या अवैध सावकारी व्यवसायाबाबत कोणाला तक्रार करावयाची असल्यास सावकारांचा निबंध तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर किरण गायकवाड व सावकारांचा सहाय्यक निबंध अक्कलकोट राहुल ठोंबरे यांच्याकडे करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री गजानन महाराज पालखीचे माचणूर येथे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२ जुलै-**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या श्री गजानन महाराज पालखीचे आगमन माचणूर येथील भीमा नदीच्या तिरावर आज सायंकाळी होताच 'श्री' च्या मुर्तीला प्रांताधिकारी भैराप्पा माळी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन स्वागत करण्यात आले. दरम्यान पंचक्रोशीतील शेकडो भाविक या स्वागतासाठी उपस्थित होते.



श्री गजानन महाराज पालखी पंढरपूरकडे प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही जात आहे. सुमारे ७०० वारकऱ्यांचा समुदाय या दिंडीत सामील असून अंगात पांढरे कपडे परिधान केलेले, डोक्यावर टोपी, गळ्यात पंचा व टाळ, मुखी विठ्ठल विठ्ठल नामाचा गजर करीत शेकडो किलोमिटर धावा करत हा पालखी सोहळा माचणूर येथे श्री सिध्देश्वर मंदिरात सायंकाळी विसावला आहे. स्वागतासाठी नायब तहसिलदार शुभांगी जाधव, गटविकास अधिकारी जास्मिन शेख, मनिषा हजारे, मंडलाधिकारी धनंजय इंगोले, तलाठी संतोष भजबळकर, ग्रामसेविका संगिता माने, मनोज डोरले, अलिफ सुतार, शिवाजी भोसले, नागेश महामुनी, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे, सहाय्यक पोलीस निरीक्षक वाघमोडे, पोलीस हवालदार दिगंबर गेजगे, वाहतूक शाखेचे संभाजी यादव, मनोज खंडागळे, योगेश नवले, माचणूर गावचे सरपंच दिपाली कलुबर्मे, माजी सरपंच बबन सरवळे, बळीराम डोके, सदस्य उमेश डोके, तसेच जनार्धन शिवशरण, राजू बाबर,संजय कुरवडे, जेष्ठ नागरिक व महिला वर्ग ग्रामसेविका संगिता माने, जाधव, अभिजीत सरवळे, संतोष निकम, सलिम शेख, बोराळे प्राथमिक केंद्राचे डॉ. स्नेहल माळी, जयसिंग हेंबाडे, चंद्रकांत साळुंखे, आरोग्य निरीक्षक रावसाहेब गाडे, जगदेवी राऊत, रिजवाना मुजावर, द्रौपदी राठोड आदी आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान माचणूर ग्रामपंचायतीने पालखी मार्गावर सर्वत्र बीएचसी पावडर टाकली होती. महामार्गालगत भव्य अशी कमान उभारली होती. जि.प.शाळेच्या शिक्षिका सरोजा पोतदार यांनी रांगोळी काढली होती. स्वागतासाठी माचणूर, ब्रम्हपुरी,रहाटेवाडी, तामदर्डी यासह परिसरातील भाविक उपस्थित होता. श्री सिध्देश्वर मंदिरात श्री गजानन महाराजांची पालखी विसावली असून प्रसादाची व्यवस्था यंदाही सुनिल नांदे यांनी केली होती. सकाळी १०.३० च्या दरम्यान मंगळवेढ्यात बोराळे नाक्यावर नगरपालिका प्रशासनाच्यावतीने स्वागत करण्यात येणार आहे. यासाठी मंगळवेढा नगरी सज्ज झाली आहे. आरोग्य विभागाने धूर फवारणी, कंटनेर सर्व्हे, पाणी शुध्दीकरण, प्रथमोचार केंद्र, हिरकणी कक्ष, रुग्णवाहिका, पाणी शुध्दीकरण आदी व्यवस्था केली होती.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली दर्शन रांग अन् पत्राशेडची पाहणी

▶▶ दर्शन रांगेतील भाविकांशी साधला संवाद

▶▶ भाविकांकडून जिल्हाधिकाऱ्यांचे आभार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ जुलै-**

आषाढी शुद्ध एकादशी ६ जुलै २०२५ रोजी असून, श्री विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांनी पंढरपुरात मोठी गर्दी केली आहे. आज सकाळ पासूनच दर्शन रांग जवळपास गोपाळपूर जवळ पोहोचली आहे. भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे यासाठी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रूक्मिणीचे व्हिआयपी दर्शनाबाबत आपत्ती व्यवस्थापन कायद्यातंर्गत तसेच राज्य शासनाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आदेश दिले आहेत. सदर आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते का नाही याची पाहणी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दर्शन रांग व पत्राशेड येथे केली. तसेच दर्शन रांगेतील भाविकांशी यावेळी संवाद साधला.



श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी किमान १६ ते १६ तास यापूर्वी लागत होते तर यावर्षी फक्त पाच ते सहा तासात आपले दर्शन झालेले आहे. याबद्दल त्या भाविकांने जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे आभार व्यक्त केले. यावेळी त्यांच्यासमवेत मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते.

प्रशासनाच्या माध्यमातून वारकरी भाविकांसाठी पालखी मार्ग व पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणावर सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या सर्व सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पंढरपूर शहरात विविध ठिकाणी भेटी देऊन घेत असताना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या परिसरात इंडियन एअर फोर्स मध्ये पंधरा वर्षे सेवा बजावलेले व पंढरपूर येथे अनेक वर्षापासून वारी कालावधीत दर्शनासाठी येत असणाऱ्या एका भाविकांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेतली. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी श्री विठ्ठलाचे व्हीआयपी दर्शन बंद करून त्याची कार्यक्षमपणे अंमलबजावणी केलेली आहे. त्यामुळे दर्शन रांगेत श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी कमी वेळ लागत असल्याचे अनेक दर्शन घेऊन आलेल्या भाविकांकडून सांगितले जात आहेत. भाविक वारकरी यांची कोणत्याही प्रकारची गैर सोय होऊ नये यासाठीच शासन, प्रशासन सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देत आहे. व भाविकांच्या चेहऱ्यावर येथील सर्व सोयीसुविधा पाहून तसेच दर्शन वेळेत होऊन समाधानाचे भाव उमटावेत यासाठीच प्रशासन कटिबद्ध आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी,
हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ‘रागा अनुरागा’ कन्नड कार्यक्रमाने भारावले अक्कलकोट

## कर्नाटकची गायिका अनुराधा भट यांचे सादरीकरण

### गुरूपौर्णिमा उत्सवातील तृतीय पुष्प

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३८ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सव न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेंजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत असून, बुधवारी ‘रागा अनुरागा’ ह्या कन्नड कार्यक्रमाने तिसरे पुष्प संपन्न झाले. गणेश वंदना..!, महादेव...!, मल्ला..!, सत्यम शिवम सुंदरम..! या कन्नड भावगीते, भक्तीगीत व चित्रपट गीतांनी कर्नाटकच्या ख्यातनाम गायिका अनुराधा भट, निखील, रश्मी, पार्थ, धनु यांच्यासह निवेदिका अनुश्री च्या मुक्त कंठास कन्नड श्रोत्यांनी भरभरून साद दिली व मनमुराद आनंद लुटला. कन्नड रसिक श्रोत्यांसह कलाकारही भारावून गेले होते. तोळणूर येथील अंध कलाकार रेवणसिद्ध फुलारी यांनीही सहभाग नोंदविला. दीपप्रज्वलन प.पू.म.नि.प्र.डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजी, जगदगुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान, तुप्पीन मठ, नागणसूर, म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी विरक्त मठ अक्कलकोट, मिलन कल्याणशेट्टी, डॉ. व्यंकटेश मेतन, सिद्धाराम पाटील, व्यंकटेश पटवारी, कन्नड साहित्य परिषदचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी, राजेंद हत्ते, बसवराज माशाळे, राजशेखर उंबराणीकर, प्रा.डॉ. जी.एस. धबाले, राजशेखर हिप्परगी, दिनेश पटेल, विठ्ठल तेली, दत्तात्रय पाटील, ओंकार कोरे, सुनंदा तेली लक्ष्मी अचलेर यांच्या हस्ते करण्यात आले. कलाकारांचा न्यासाच्या वतीने सत्कार करण्यात आला. न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी व सोमकांत कुलकर्णी यांच्या हस्ते मंत्र पठणाने पूजन झाले. सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले. लाईट व्यवस्था शंभूराजे इलेक्ट्रिकल यांनी केले.



यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई जनमेजयराजे भोसले, अर्पिताराजे अमोलराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, स्वाती निकम, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले, स्मिता कदम, पल्लवी कदम, उज्वला भोसले, संगीता भोसले, रूपा पवार, स्वप्ना माने, कविता वाकडे, सुवर्णा घाडगे, राजश्री माने, सुनंदा अष्टगी, क्रांती वाकडे, अनिता गडदे, रोहिणी देशपांडे, धनश्री पाटील, दिव्या मोरे, कल्पना मोरे, अक्षता मोरे, कोमल क्षीरसागर, शितल क्षीरसागर, अक्षता खोबरे, रुपाली भोसले, व न्यासाचे उपाध्यक्ष- अभय खोबरे, सचिव- शामराव मोरे, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, विश्वस्त- भाऊ कापसे, लक्ष्मण पाटील, संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, मनोज निकम, बाळासाहेब कुलकर्णी बबलादकर, मैनुद्दीन कोरबू, शिवराज स्वामी, मल्लिनाथ करपे, ओंकारेश्वर उटगे, मल्लिनाथ स्वामी, अँड.संतोष खोबरे, रोहित खोबरे, अरविंद शिंदे, अप्पा हंचाटे, सौरभ मोरे, राजु नवले, शितल जाधव, अनिकेत सोनटक्के, बालाजी पाटील, निखील पाटील, रोहन शिर्के, प्रा. सायबण्णा जाधव, दिलीपराव महिंद्रकर, कांत झिपरे, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, कुमार सलबत्ते, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, आकाश शिंदेयांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते.

दि. ३ जुलै रोजी गुरुवार सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत बेला शेंडे यांचे ‘संगीत रजनी’ (भावगीते, चित्रपट गीते व भक्ती गीते) हा कार्यक्रम सादर होणार आहे.

**गुणीजन गौरव :-** शुभम पंजाबराव माहुरे, (सहाय्यक अभियंता), सुप्रभात ग्रुप,अक्कलकोट, अदिती अमोल कुलकर्णी, (मुख्याध्यापिका (IMS) सोलापूर), अभिजित महादेव सुरवसे, (अभियंता, कुरनूर) यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**गुणवंत विद्यार्थी गौरव :-** तालुक्यातील इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत उत्तम गुण मिळवलेल्या ७ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव न्यासाच्या वतीने करण्यात आला.

## महत्वाचे...



### रवींद्र चव्हाण यांच्या नियुक्तीबद्दल शहर भाजपातर्फे जल्लोष

**सोलापूर, दि. २ जुलै-**

भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदी रवींद्र चव्हाण यांची नियुक्ती झाल्याबद्दल सोलापूर शहर भारतीय जनता पक्षातर्फे शहर कार्यालयाजवळ भाजपचे माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नू यांच्या नेतृत्वाखाली जल्लोष करण्यात आला. याप्रसंगी लाडू वाटप करून तसेच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यावेळी सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, उपाध्यक्ष जय साळुंखे, चिटणीस बजरंग कुलकर्णी, रामचंद्र तडवळकर, महिला मोर्चा अध्यक्ष विजया वड्डेपल्ली, सरचिटणीस संगीता खंदारे, जैन प्रकोष्टचे संयोजक ॲड. साधना संगवे, उद्योग आघाडीचे संयोजक अंबादास बिंगी, भटके विमुक्त जमाती विभागाचे संयोजक लक्ष्मणराव गायकवाड, अल्पसंख्यांक आघाडीचे जाकीर सगरी, नगरसेविका मेनका राठोड, नगरसेवक देवेंद्र भंडारे जेम्स जंगम, मंडल अध्यक्ष नागेश सरगम, अर्जुन जाधव सोशल मीडियाचे अंबादास सकीनाल, कार्यालय प्रमुख श्रीहरी म्याकल, आयटी सेल संयोजक प्रकाश गाजुल, पांडुरंग कुलकर्णी, सागर अतनूरे, जुबेर रामपुरे, शाहरुख मणियार, इमरान हवालदार, शकील शेख उपस्थित होते.



### रोटरी क्लबच्या वतीने मार्कंडेय प्रशालेस संगणक भेट

**सोलापूर, दि. २ जुलै-**

श्री मार्कंडेय प्रशाला विडी घरकुल, कुंभारी या शाळेस रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसीच्या वतीने मोफत संगणक संच भेट देण्यात आली. प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते संगणक चालू करून उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा स्वागत व सत्कार प्रशालेचे मुख्याध्यापक अमोगसिद्ध कुंभार यांच्या हस्ते करण्यात आला.

# कृषीदिनी थकीत ऊसबिलासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

ऊस गाळप हंगाम संपून सहा महिन्याचा कालावधी पूर्ण झाला. जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यानी अद्यापही ऊसबिले जमा केली नाहीत. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने कृषिदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन केले.

साखर कारखानदार उसबिले देत नसल्याने शेतकऱ्यांना कारखान्याकडे वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याने हे आंदोलन सुरू करण्यात आले. साखर आयुक्तांनी जिल्ह्यातील गोकूळ शुगर, जयहिंद शुगर, मातोश्री शुगर, सिद्धेश्वर सहकारी, भीमा सहकारी, सहकार शिरोमणी, इंद्रेश्वर शुगर या सात साखर कारखान्यावर आरसीसीनुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

सध्या पेरणीचा हंगाम सुरू असताना शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मशागत, बी बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी साखर आयुक्तांच्या आरसीसी आदेशाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना तत्काळ उसबिले जमा करावे, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, विशालसिंह पाटील, मोहिसन पटेल, इकबाल मुजावर, शहाजी पवार, शहाजी सोमवंशी, मकबुल मुल्ला, नागनाथ सुरवसे, नशिर पटेल, नानासाहेब मोरे उपस्थित होते.



### आरसीसी कारवाईकडे जिल्हाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

जिल्हाधिकाऱ्यांनी आरसीसीच्या आदेशाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांची उसबिले जमा करायला हवी होती. मात्र, गेल्या तीन महिन्यापासून जिल्हाधिकारी हे आरसीसीच्या कारवाईकडे दुर्लक्ष करत असल्याचा दावा शेतकरी संघटनेने केला आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

### राजकीय वरदस्तामुळे बिले थकली

जिल्ह्यातील अनेक साखर कारखाने हे राजकीय लोकांची आहेत. तसेच काही कारखान्यांना राजकीय वरदहस्त असल्याने शेतकऱ्यांची ऊस बिले वेळेवर मिळत नाही. अशा कारखान्यावर शासनाकडून कारवाई झाल्यास शेतकऱ्यांना वेळेवर ऊस बिले मिळतील.

# टेलीग्राम व व्हाट्स ॲपवर जुळताहेत रेशीमगाठी

## पद्मशाली समाजाचा सोशल मीडियावर उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

अखिल भारतीय पद्मशाली वधु-वर मिलन टेलीग्राम ग्रुपच्या माध्यमातून पद्मशाली समाजातील विवाह इच्छुकांच्या रेशीमगाठी बांधण्याचा या आकाश गुंटूक यांनी बनविलेल्या ग्रुपला यश आले आहे. देश-विदेशातील समाज बांधवाचे मोबाईल नंबर या ग्रुपला जोडलेले आहेत. या ग्रुप मध्ये वर-वधुचे १५ ते २० हजार परिचय पत्र आहेत. यामुळे अनेकांना घरबसल्या स्थळ पाहता येत आहे.

ही सेवा अगदी मोफत आहे. या ग्रुपची स्थापना २०१५ मध्ये करण्यात आली. त्यानंतर या ग्रुपच्या माध्यमातून हजारो वधू-वरांचे लग्न जमले आहे अजून पण समाज बांधवांना घरबसल्या फायदा होत आहे असे, नं १ अखिल भारतीय पद्मशाली वधु-वर मिलन टेलीग्राम ग्रुपचे संस्थापक गुंटूक यांनी सांगितले. आ. कैलास गोंरटयाल, जालना पद्मशाली प्रौढ संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण गोंरटयाल, जालना पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष सन्नी गुंटूक, मराठवाडा पद्मशाली युवक संघटनेचे उपाध्यक्ष रामेश्वर आडेप, नगरसेवक नंदकिशोर गरदास, सोलापूरातील गौरीशंकर कोंडा, अहमदनगर पद्मशाली युवाशक्तीचे अजय म्याना यांचे या ग्रुपसाठी सहकार्य लाभत आहे. या ग्रुपमध्ये १२ हजार ५०० पेक्षा जास्त सदस्य आहेत. अधिक माहितीसीठी ८८५६८९४८९४ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

# व्हि. आर. पवार सारीज मध्ये नवनवीन साड्यांचा महासेल सुरू

## संचालक राजेश पवार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

महाराष्ट्रातील साड्यांचा सर्वात मोठा सेल सर्वात मोठ्या साडी शोरूम मध्ये सुरू असून दर्जेदार अशा नवनवीन साड्यांचा महासेल सुरू झाले असल्याचे व्हि. आर. पवार सारीजचे संचालक राजेश पवार यांनी सांगितले.

अत्यंत नावाजलेल्या चाटी गल्ली येथील व्हि. आर. पवार शोरूम मध्ये सेल सुरू झाला असून यामध्ये पाच ते ७० टक्क्यापर्यंतची महिला ग्राहकांची महाबचत होत आहे. यामुळे पारंपारिक व अत्याधुनिक महिला ग्राहकांनी खरेदीसाठी मोठी गर्दी केली आहे. या महा सेलमध्ये सुटिंग - शर्टींग, ड्रेस मटेरियल, गाऊन, वन पीस, क्रॉप टॉप, कुर्ती, लेडीज होजिअरी तसेच प्रीमियम साडी, ब्रायडल शालू, पैठणी, काठपदर साडी सारख्या २४०० ते ३०००च्या साड्या अगदी पाचशे ते आठशे रुपये मिळत आहेत.

त्यामुळे सोलापूर शहर व परिसरातील ग्राहक तसेच लातूर, धाराशिव, पुणे, मुंबई येथून आलेल्या महिला ग्राहकांनी खास सेल च्या दरात असलेल्या मनपसंद साड्या खरेदी करण्यासाठी व्हि. आर. पवार शो रोम ला आवर्जून भेट देत आहेत. या महासेल मुळे तरुणींचा मोठया प्रमाणात खरेदीसाठी झुंबड उडाले असल्याचे दिसून येत आहे. तसेच महिला वर्ग आपल्या आवडीच्या साड्या अगदी कमीत कमी दरात मिळत असल्याने खरेदी करिता गर्दी करीत आहेत. या महाबचत सेलचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.





# विविध मागण्यांसाठी भटक्या विमुक्तांचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

भटक्यांसाठी स्वतंत्र मंत्रालय, नागरिकत्वाचे पुरावे, गायरान, गावठाण जमिनीचे अतिक्रमण अधिकृत करणे अशा विविध प्रलंबित मागणीसाठी भटके विमुक्त आदिवासी समिती महाराष्ट्र राज्य संघटनेच्या वतीने पूनम गेट येथे आंदोलन करण्यात आले.

भटक्या विमुक्त समाजाच्या दीर्घकालीन प्रलंबित मागण्यांकडे राज्य शासनाने लक्ष वेधण्यासाठी मुंबई येथे संयोजन समितीच्या वतीने आंदोलन सुरू आहे. त्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात आले. भटक्या विमुक्त समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करावे. त्याचे कामकाज पाहण्यासाठी याच समाजातील एका व्यक्तीची मंत्री म्हणून नेमणूक करावी, जातीचा दाखला, मतदान कार्ड, रेशन कार्ड, जन्म नोंदणी प्रमाणपत्र आदी स्थानिक पुरावे गोळा करून भटक्या जातीला नागरिकत्व द्यावे, भटक्या विमुक्त जातींना ३१ ऑगस्ट १९५२ ला तारेच्या कंपाऊंड मधून मुक्त केले आहे. तो दिवस विमुक्त दिन म्हणून घोषित करावे, अशा विविध प्रलंबित मागण्यांसाठी भटक्या विमुक्त समाजाने आंदोलन केले आहे. यावेळी भारत जाधव, यशवंत फडतरे, मल्लेश सूर्यवंशी, पवन गायकवाड, रोहिणी गायकवाड, धनलक्ष्मी देशमाने, विक्रम जाधव आदी उपस्थित होते.

# सातलिंग शटगार म्हणजे चिंतनशील व्यक्तिमत्व

## माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

सातलिंग शटगार यांनी शिक्षकी पेशाबरोबर अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याच्या माध्यमातून विद्यार्थी पालक व समाजामध्ये जनजागृतीचे व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने केले आहे. त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय असून शटगार म्हणजे एक चिंतनशील व्यक्तिमत्व आहे, असे प्रतिपादन देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी

फडकुले सभागृहात श्री. शटगार यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संगमेश्वर कॉलेजचे माजी प्राचार्य नरेश बदनोरे होते. श्री दत्त प्रशाला येथून ३५ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते २५ किलोचा पुष्पहार घालून शटगार यांचा सहपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शटगार यांना शिकवलेल्या गुरुजनांचा सन्मान श्री शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक माजी गटशिक्षणाधिकारी अशोक भांजे यांनी केले. सूत्रसंचालन नर्मदा कनकी व श्रीदेवी येळमेली यांनी केले. राजश्री तडकासे यांनी आभार मानले.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार विश्वनाथ चाकोते, शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील, माजी महापौर अलकाताई राठोड, सुशीलाताई आबुटे, संजय हेमगड्डी, पुरुषोत्तम बलदवा, प्रा. भीमाशंकर बिराजदार, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अशपाक बळोरगी, अक्कलकोटच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णाताई मलगोंडा, रवीकिरण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्रीपाद सुरवसे,जिल्हा उपाध्यक्ष अरुण जाधव, सतीश दरेकर आदी उपस्थित होते.



### शिक्षकी पेशाबरोबर समाज जागृतीचे काम

शटगार यांनी शिक्षकी पेशा बरोबर समाज जागृतीचे काम केले आहे. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन बरोबर समाजातील वाईट चालीरीती, रूढी, परंपरा,यावर जनजागृतीचे काम केले आहे. तो एक प्रामाणिक निष्ठावंत व सच्चा कार्यकर्ता आहे.आयुष्याच्या शेवटपर्यंत तो समाजसेवेचे काम करेल याची मला खात्री आहे.

**-नरेश बदनोरे, माजी प्राचार्य**

### काँग्रेस पक्षाच्या कार्याला वाहून घेणार

जीवन प्रवासाच्या सुख-दुःखामध्ये मदत केलेल्या सर्व मान्यवरांचे आभार. जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व परिश्रम या गोष्टीवर विश्वास ठेवून वाटचाल करणार आणि पुढील आयुष्य नेते सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाच्या कार्याला वाहून घेणार.

**- सातलिंग शटगार, सत्कारमूर्ती**

# बीगसी तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल विभागांना विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

येथील भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनियरींग व पॉलिटेक्निकमध्ये (बीगसी) चालू शैक्षणिक वर्षासाठी मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे.

राज्यातील केवळ सोलापूरच नव्हे, तर लातूर, बीड, सांगली, धाराशिव सातारा आदी जिल्ह्यांमधूनही विद्यार्थ्यांचा ओघ वाढलेला आहे. महत्त्वाचं म्हणजे या दोन्ही विभागांना मिळणाऱ्या प्रतिसादामागे अनेक ठोस व विश्वासार्ह कारणे आहेत.

हे गेल्या अनेक वर्षांपासून शंभर टक्के प्रशिक्षण व प्लेसमेंटची हमी देणारी संस्था म्हणून ओळखली जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमासोबतच उद्योगजगतातील प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी इंडस्ट्री ओरिएंटेड प्रोजेक्ट्स, ऑन-जॉब ट्रेनिंग, आणि एमओयू आधारित कोर्सेस यांचं प्रभावी आयोजन केलं जातं.



कॉलेजमध्ये अनुभवी, तज्ज्ञ आणि विषयाशी निगडित शिक्षकवर्ग कार्यरत आहे. फक्त प्राध्यापक नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक पातळीवर समजून घेऊन आणि दिलं जातं. या गोष्टी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर घालतात आणि त्यांना भविष्यासाठी अधिक सज्ज करतात.

मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल हे दोन्ही विभागात आधुनिक लॅब्स, कार्यशाळा, तसेच कार्यक्षम व प्रयोगशील शिक्षणपद्धती यामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांना व्यावहारिक अनुभवही दिला जातो. यांमुळे आता सोलापूर जिल्ह्यातील आणि साठीचं प्रभावी म्हणून उदयास येत आहे.

### करिअरकडे पाहण्याची व्यापक दृष्टी

‘‘विद्यार्थ्यांना केवळ डिग्री नव्हे, तर उद्योगक्षम, आत्मनिर्भर आणि सक्षम व्यावसायिक बनवणं हेच आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे. केवळ मार्कांची शर्यत न बघता, करिअरकडे पाहण्याची व्यापक दृष्टी आम्ही विद्यार्थ्यांना देतो

**-डॉ. अनिल देशमाने, प्राचार्य**

### गुणवत्तेवर विद्यार्थ्यांचा विश्वास

‘‘ मध्ये आम्ही विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान देत नाही, तर त्यांना इंडस्ट्रीला उपयोगी पडतील अशा कौशल्यांनी सज्ज करतो. आज मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल विभागांना मिळणारा प्रतिसाद ही आमच्या गुणवत्तेवर विद्यार्थ्यांचा विश्वास आहे,’’ **- रविंद्र गायकवाड, चेअरमन**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आषाढीनिमित्त शनिवारी संस्कृती घुले हिची अभंगवाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

विश्वकर्मा सोशल फाउंडेशन कारंबा व वारकरी आचारसंहिता परिषद यांच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त संस्कृती संभाजी घुले हिचा अवघा रंग एक झाला हा अभंगवाणी कार्यक्रम आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला वार शनिवार दि. ५ जुलै रोजी सुतार गल्ली कारंबा येथे सायंकाळी ६ वाजता भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, हभप निलेश महाराज झरेगावकर, माजी आमदार यशवंत माने यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमांमध्ये अभंग व गवळणी भक्ती गीते सादर होणार आहे.

कार्यक्रमासाठी तबला संभाजी घुले, हार्मो नियम राम मदने, पखवाज सचिन गायकवाड, टाळ महेश धारेवर गणेश घुले हे साथ करणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता विनायक सुतार, अमोल सुतार, महेश पेंडपाले, संजय आदाटे, जगदीश पाटील, मशाक शेख, सत्तर भाई, शेख, शरीफ सय्यद, बाळासाहेब माने, अतुल रोकडे, निलेश कांबळे, गणेश बेद्रे, जितेंद्र पेंडपाले आदी परिश्रम घेत आहेत.



**महत्वाचे...**

### सुस्नेह सांस्कृतिक मंडळातर्फे शनिवारी अभंगवाणी

**सोलापूर, दि. २ जुलै-**

सुस्नेह सांस्कृतिक मंडळाच्या वतीने शनिवार दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता सोलापुरातील लोकमान्य टिळक सभागृह (ॲम्पी थिएटर) येथे अभंगवाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष डॉ. राजीव मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. ज्येष्ठ रंगकर्मी अपर्णा रामतीर्थकर आणि राजू मोडक यांच्या स्मृती प्रित्यर्थ तसेच आषाढी एकादशीचे औचित्य साधून हा कार्यक्रम विनाम ूल्य घेण्यात येणार आहे. डॉ. राजीव मोहोळकर हे हा कार्यक्रम सादर करणार आहेत. स्वाती म ोहोळकर यांनी निर्मिती केली असून गायक डॉ. राजीव मोहोळकर, प्रा. गोविंद दाते हे आहेत. या कार्यक्रमाचे निवेदन श्रुती मोहोळकर या करणार आहेत. ध्वनी रविकांत सरवदे, साथसंगत पुरुषोत्तम जोशी, राजशेखर पाटील, चंद्रकांत जोशी, वेदांगी मोडक, गीता दाते, भानुदास इरशेट्टी तर बालकलाकार म्हणून तोष्वी कोठाडिया यांचा सहभाग राहणार आहे. यावेळी जान्हवी गांधी, आशुतोष नाटकर, प्रा. गोविंद दाते, श्रुती मोहोळकर उपस्थित होते.



### पंढरपूर विकास आराखड्यासाठी १५ कोटींचा निधी मंजूर

**पंढरपूर, दि. २ जुलै-**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ३० जूनच्या शासन निर्णया नुसार पंढरपूर मंदिर विकास आराखड्यासाठी २०२५-२६ या वर्षांमध्ये १५ कोटी एवढा निधी वितरित केला आहे या निधीम धून पंढरपूर मंदिर विकास आराखडा अंतर्गत मंजूर कामावर वर होणारा खर्च करण्यासाठी मोठी संधी मिळालेली आहे. आषाढी वारीच्या काळाम ध्ये राज्य शासनाने हा निधी वितरित केलेला असल्यामुळे मंदिराच्या विकास कामासाठी मोठीच मदत होणार आहे. हा निधी वितरित केल्याबद्दल विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत आणि या निधीच्या प्रभावी वापरातून सर्व वारकऱ्यांची यात्रा कालावधीमध्ये अधिकची सोय राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे, याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. तसेच सर्व यंत्रणांचे आभार मानले आहेत आणि सर्व वारकऱ्यांना यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### आषाढी एकादशीनिमित्त रविवारी अभंगवाणी

**सोलापूर, दि. २ जुलै-**

आषाढी एकादशीनिमित्त आनंदश्री प्रतिष्ठानच्यावतीने रविवार, दि.६ जुलै रोजी सकाळी १० वाजता गोविंदश्री मंगल कार्यालयात डॉ. संध्या जोशी, विलास कुलकर्णी, शिरीष बोकील, वैशाली देशपांडे, कनिष्का शिवपुजे यांची अभंगवाणी होणार आहे. कार्यक्रमासाठी तबला नितीन दिवाकर, पखावज संभाजी घुले, हार्मोनियम ओंकार पाठक, तालवाद्य अनंतराव जोशी, निरुपण विभावरी रणदिवे यांची साथ लाभणार आहे. या अभंगवाणी कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्षा माधवी रायते यांनी केले.

# भक्तिमय वातावरणात पार पडले पहिले उभे रिंगण

## ● वैष्णवांसह नागरिकांची गर्दी; माळीनगरात पुष्पवृष्टीने तुकाराम महाराज पालखीचे स्वागत



माळीनगर : पालखी सोहळा चार रथ माळीनगरमध्ये दाखल होतास पंचक्रोशीतील नागरिकांनी केलेली गर्दी.



माळीनगर : श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील माळीनगर येथे झालेल्या उभ्या रिंगणात दौड करताना अश्व.

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. २ जुलै-**

जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे माळीनगर येथे भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. अकलूज मुक्कामानंतर बोरगाव मुक्कामासाठी निघालेला सोहळा माळीनगरला सकाळी साडेआठच्या सुमारास वेशीवर पोहोचला. यावेळी पुष्पवृष्टीने तुकाराम महाराज पालखीचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर पालखी महामार्गावरच पहिले उभे रिंगण पार पडले.

उभ्या रिंगणाचा सोहळा पाहण्यासाठी वैष्णवांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. माळीनगर ग्रामपंचायतचे सरपंच अनुपमा एकतपुरे, उपसरपंच अतुल कांबळे, सदस्य विराज निंबाळकर, आदी सदस्य, तलाठी निहाल जाधव, ग्रामसेवक, दि. सासवड माळी शुगर फॅक्टरी चेअरमन राजेंद्र गिरमे, होल टाइम डायरेक्टर परेश राऊत व गणेश इनामके, शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे, मॅनेजर अनिल गिरमे, माळीनगर मल्टीस्टेटचे चेअरमन अमोल गिरमे तसेच परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले.

पंढरपूर जवळ येत चालल्याने विठ्ठलाच्या भेटीस आतुर झालेल्या वैष्णव जणांच्या ज्ञानबा तुकारामच्या गजरात पालखी सोहळा सकाळच्या प्रसन्न वातावरणात माळीनगर येथे विसावला. संस्थांनच्या बाबुळकरांचा अश्व आणि धवलसिंह मोहिते-पाटील यांचा बलराज अश्वाने नगारा बैलगाडीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर पश्चिमेला उभे केलेल्या पालखी रथाकडे दौंड मारून रथाला प्रदक्षिणा घातली आणि पुन्हा नगारा असलेल्या गाडीकडे दौड मारली. अश्वाच्या पायाच्या पडलेल्या टापा खालील जागेला हात लावून वैष्णव दर्शन घेत होते. उभे रिंगण होतच पालखी सोहळा मॉडेल हायस्कूलच्या प्रांगणात आल्यानंतर पालखीतील पादुका खुलेनाट्यगृहात आणण्यात आल्या. तेथे प्रथेप्रमाणे कारखान्याच्या वतीने कारखान्याचे पूर्णवेळ संचालक गणेश इनामके व भारती इनामके या उभयतांच्या हस्ते पादुकांचा अभिषेक घालून पूजा करून आरती म्हणण्यात आली. पादुका दर्शनासाठी खुल्या करण्यात आल्या. दरम्यान दिंडीधारकांनी पादुकांना दुपारच्या जेवणाचा नैवेद्य दाखवण्यासाठी गर्दी केली होती. प्रसाद दाखवले नंतर दिंड्यांमधील वैष्णवांच्या जेवणाच्या पंगती बसवण्यात आल्या. बारा वाजता पालखी सोहळा माळीनगरचा विसावा संपून बोरगाव मुक्कामासाठी मार्गस्थ झाला.

**मोफत तपासणी करीता डॉक्टरांचे पथक**

कारखान्याच्या वतीने सुमारे ६ हजार वारकऱ्यांना जेवण देण्यात आले तर महात्मा फुले पतसंस्थेच्या वतीने यंदा ५ हजार वारकऱ्यांना पाण्याच्या बाटल्याचे वाटप करण्यात आले. माळीनगर येथे शुगरकेन सोसायटीच्या संस्थेसमोरील पटांगणात शुगरकेन सोसायटी आणि मुंबईच्या वैष्णव चॅरिटेबल व मेडिकल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने वारकऱ्यांची औषधोपचार व तपासणी करण्याकरता डॉक्टरांचे पथक ठेवण्यात आले होते.



पालखी सोहळ्यातील पादुकांचे अभिषेक व पूजा कारखान्याच्या वतीने कारखान्याचे पूर्णवेळ संचालक गणेश इनामके व भारती इनामके या उभयतांच्या हस्ते करण्यात आली.

# दर्शन रांगेतील भाविकांचा प्रवास होतोय सुखकर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ जुलै-**

आषाढी यात्रेचा मुख्य सोहळा दि.६ जुलै रोजी संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने श्रींच्या दर्शनरांगेत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. यंदा मंदिर समितीच्या वतीने दर्शनरांगेचे सूक्ष्म नियोजन करून अत्याधुनिक पध्दतीची दर्शनरांग तयार केली असल्याने दर्शनरांगेतील भाविकांचा प्रवास सुखकर होऊन जलद व सुलभ दर्शन होत असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

संपूर्ण दर्शनरांगेत सीसीटीव्ही कॅमेरे, दिशादर्शक व माहितीचे फलक, भक्तीसंगीतासाठी अत्याधुनिक साऊंड सिस्टीम, लाईव्ह दर्शनासाठी एलईडी व्हॅन व एलईडी टिव्ही, हरवले सापडले केंद्र, फॅब्रिकेटड शौचालये व साफसफाईसाठी जेटींग - सक्षण मशिन, उपजिल्हा रूग्णालय व तालुका वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत आयसीयू, प्रथमोपचार केंद्र, स्वच्छता व्यवस्थेकामी पुरेसा कर्मचारी, अन्नदानेश्वर महाराज व जळगांव सेवा समिती मार्फत २४ तास अन्नदान, मंदिर समितीमार्फत मिनरल वॉटर, चहा, तांदळाची व शाबुदाणा खिचडी, सार्वजनिक सुचना प्रसारण प्रणाली, विश्रांती कक्ष, बसण्याची सुविधा, आपत्कालिन व्यवस्थेसाठी आपत्कालिन मार्ग, अग्निशमन व्यवस्था, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र, अत्याधुनिक पध्दतीची विद्युत व्यवस्था,

**मंदिर समितीकडून सूक्ष्म नियोजन**



फॅन-कुलर व्यवस्था, मार्गावरील अडथळा दुर करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपाची उड्डाणपुले उभारण्यात आली आहेत.

यंदा कायमस्वरूपी ४ पत्राशेडच्या शेजारी शंभर बाय साडेचारशे फुटाचे अत्याधुनिक एक सलग तात्पुरते पत्राशेड उभारण्यात आले आहे. त्याची उंची १६ फूट असून, स्ट्रक्चर ३३ पिलरचे उभे आहे व त्यावर ६० फूट लांबीची लोखंडी कैची उभी केली आहे. यामध्ये १००४५०१६ फुटात एकच शेड तयार झाले असून एकूण पूर्वीचे ८ पत्राशेड कव्हर झाले आहेत. त्याची उंची १६ फुट व सलग शेड असल्याने आतमध्ये हवा खेळती राहत असून, दर्शनरांग देखील जलद व द्रुतगतीने चालत आहे. याशिवाय, सलग शेड असल्याने भाविकांचे पावसापासून संरक्षण होत आहे तसेच आपत्कालिन दृष्टीने शेडच्या मागील व पुढील बाजूस पुरेसा जागा देखील उपलब्ध ठेवण्यात आली आहे. तसेच या भागातील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी अंडरग्राऊंड स्ट्रॉम वॉटर पाईपलाईन केली असल्यामुळे पावसाचे पाणी इतरत्र वाहत नाही. संपूर्ण बॅरीकेटींग व पत्राशेडचे तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर यांच्याकडून प्रमाणपत्र घेण्यात आले आहे.

याशिवाय २४ तास दर्शनाची वेळ, भाविकांच्या हस्ते होणा-या पुजा बंद ठेवणे, घुसखोरी रोखणे, व्हिआयपी व्यक्तींच्या दर्शनावर निर्बंध, मॅन काऊटींग मशिन, अनुभवी कमांडोज नियुक्ती व इतर अनुषंगीक उपाययोजना करण्यात आल्याने व दर्शनरांगेचे सुक्ष्म नियोजन करून दर्शनरांग जलद व द्रुतगतीने चालून भाविकांचा दर्शनरांगेतील प्रवास सुखकर होऊन कमीत कमी वेळेत भाविकांना श्रींचे दर्शन घडत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले.

# मुख्यमंत्री सहाय्यता केंद्रातून लाखो भाविकांना निवारा

## ● जि.प. सीईओंकडून वारकऱ्यांची चौकशी; सर्व सुविधा एकाच छताखाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

आषाढी यात्रे निमित्त संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे आज अकलूज सराटी फाटा येथे फुलांचा वर्षाव व जेसीबी मधून फुलांच्या पाकळ्यांची उधळण करीत जिल्हा प्रशासनाचे वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी लाखो भाविकांनी मुख्यमंत्री सहाय्यता निवारा केंद्राचा आधार घेतला.

सोलापूर जिल्ह्यात संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी मार्गावर जिल्हा परिषदेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निवारा कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी लक्ष घालून जिल्हा परिषदेची यंत्रणा ताकदीने या कामासाठी लावली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी नेटके नियोजन करून वारकरी बांधवांसाठी निवारा केंद्र उपलब्ध करून दिली आहेत. एकाच छताखाली निवारा केंद्र , भाविकांसाठी चरण सेवा (फुट मसाज), आतील बाजूस वैद्यकीय उपचार केंद्र व बाजूस शौचालय व स्नानगृह व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी निवारा केंद्रातील भाविकांची संवाद साधून सुविधांची माहिती दिली.



**लाखो भाविकांना आधार**

पालखी मार्गावर मुक्काम व विश्रातींच्या ठिकाणी जर्मन हँगर व वॉटर प्रमुख मंडप टाकून सुविधा केंद्र उभारणेत आली आहेत. सिईओ कुलदीप जंगम यांनी भाविकांना सुविधा बाबत आस्थेने विचारणा केलनंतर भाविकांनी प्रेमाचा वर्षाव केला. वृद्ध भाविक , महिला, लहान मुले यांना मुख्यमंत्री निवारा केंद्र आधार बनला आहे. एलईडी स्क्रीनवर भक्तीगिते, सुविधांची माहिती स्पिकरवरून देण्यात येत आहे. शौचालयाची सुविधा बाजूस आहे. स्नानगृहाच्या सुविधेमुळे चेंजीग रूम महिला वारकरी यांना आधार बनला आहे १७ दिवसांचा कालावधी घरा बाहेर राहिलेले भाविकांना मोबाईल बोलता यावे म्हणून चार्जिंग ची सोय देखील निवारा केंद्रात करण्यात आली आहे. १ लाख स्क्वेअर फुटाचा वॉटरप्रुफ मंडप पाचही प्रमुख पालखी मार्गावर उभारण्यात आले आहेत.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी आठ हजार पोलिस तैनात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ जूलै-**

आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत सुरक्षेसाठी आठ हजार ११७ पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, चार अप्पर पोलीस अधिक्षक, २४ पोलीस उपअधिक्षक, ७६ पोलीस निरिक्षिक, ३१२ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ४ हजार ८५० पोलीस अंमलदार व २ हजार ८५० होमगार्ड तसेच ५ एसआरपीएफ कंपनी, ७ बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके, क्युआरटी चार पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित १४ कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने १० ठिकाणी पथके स्थापन करण्यात आल्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी सांगितले. वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच



कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, ६५ एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड आदी ठिकाणी १२ वॉचटॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉड स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच सुमारे ३०० सीसीटीव्ही कॅमेरेच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये, भाविकांना वाहतुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे. तसेच वाहतुक नियमनासाठी १४ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १७ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी केले आहे.

| ठळक मुद्दे |
| --- |
| ● आठ हजार ११७ पोलीस अधिकारी व कर्मचारी |
| ● नऊ ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्र |
| ● आपतकालिन परिस्थिती हातळण्यासाठी चौदा प्रशिक्षित कार्ट पथके |
| ● पंढरीत दहा ठिकाणी होडी नियंत्रक पथकाची स्थापना. |



# टेंभुर्णीत बहुजन प्रतिष्ठानतर्फे वारकऱ्यांना मोफत चहा, अल्पोपहार

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २ जुलै-**

येथील बहुजन प्रतिष्ठान व टेंभुर्णी फेस्टिव्हल कमीटीचे वतीने सालाबादप्रमाणे पंढरपूरला पायी चालत जाण-या जवळपास १० हजार वारकऱ्यांना कुर्डुवाडी चौकामध्ये मोफत चहा व अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

चहा व अल्पोपहार वाटपाचे हे सलग एकवीसावे वर्ष असून बुधवार दि.२ रोजी टेंभुर्णीचे पोलिस निरीक्षक नारायण पवार व संस्थापक प्रा. रघुनाथ वाघमारे यांचे हस्ते वाटप करून सुरुवात करण्यात आली.

याचा लाभ दहा हजारांहून अधिक वारकऱ्यांना भेटला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. हर्षवर्धन वाघमारे, सौरव वाघमारे, योगेश दाखले, रणजित मोरे, दशरथ कसबे, अप्पा कसबे, रोहन जगताप, संघव वाघमारे, भावेश जैन, अण्णा जगताप, बाळासाहेब मोरे, सुरेश शहा, विलास आरडे आदींनी परिश्रम घेतले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११६५

**होईल तैसें बळ ।**
**फजीत करावे ते खळ ।।**

प्रत्येक व्यक्ती सर्व गुण संपन्न असतोच असे नाही. अर्थात प्रत्येकाकडे कांही उणीवा, दोष, त्रुटी ह्या असतातच. आपल्यातील उणीवा कमी होऊन आपण सर्वगुण संपन्न व्हावे असे वाटणाऱ्याला प्रसंगानुरुप का होईना कोणाचे तरी मार्गदर्शन घ्यावे लागते. एवढेच काय दु:खातून बाहेर पडून प्रचंड सुखाची प्राप्ती व्हावी म्हणूनही अनेकांना मार्गदर्शन, आशीर्वाद घ्यावा लागतो. मनाभावातून मार्गदर्शन किंवा आशीर्वाद घ्यावा वाटत असला तरीही देणारा मनाभावातूनच देईल का? याबद्दल सांगता येणे अशक्य असते. कारण देणाऱ्याच्या मनात कसले भाव, व्यवहार चालू आहेत हे आपण ओळखू शकत नाही. यांचे भाव ओळखण्याची ताकद आपल्याकडे असती तर कदाचित आपण यांच्याकडे गेलोच नसतो. इतरांना मार्गदर्शन करण्यासाठी किंवा आशिर्वाद देण्यासाठी आपल्याकडे तेवढे असावे लागते. पण आपल्याकडे आहे की नाही याचा विचार न करता सर्व कांही असल्याचा आव आणून समाजाला लुटण्याचे काम अनेकांकडून उघडपणे चालू असते. समाजाला लुटणाऱ्या अशा भोंदूंची भोंदूगिरी आपल्या शक्तीप्रमाणे उघडी पाडून त्यांना फजित करायला हवे. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, होईल तैसें बळ। फजीत करावे ते खळ।।



पिवळी जर्द दिसणारी लिंबोळी आकर्षक दिसत असली तरीही ती आतून कडूच असते. त्याप्रमाणे कांही लोक पेहरावावरून साधु दिसत असले व मनात केवळ स्वार्थ, व्यवहार, व्देष जोपासत असले तर ते दुष्टच असतात, हे लक्षात ठेवावे. वाईट पांघरुणाखाली वाईट चालले तर त्याच्या तेवढा खेद वाटत नाही, जेवढा खेद चांगल्या पांघरुनाखाली वाईट चालते त्याचा वाटतो. अशा खळांना, दुष्टांना फजित करण्याची, त्यांचे भांडे उघडे पाडण्याची आपली जबाबदारी आहे. अशा दुष्टांबद्दलचे माझे लेखन वाचून एकदा एक वयोवृध्द महिला माझ्याकडे आली. ती रडून सांगत होती, साहेब माझे कुटूंब.... गुरुचे शिष्य आहोत. गुरुंच्या सांगण्यावरून त्यांच्या एका शिष्याशी माझ्या मुलीचे लग्न झाले. वर्षातच संसार मोडला. हे गुरु संसार जोडण्याऐवजी चुकीचे असतांनाही जावयाची बाजू घेतात आणि आम्हाला जावयाबरोबर तेही धमक्या देतात. जावई भागवतकार आहेत, ते गुरुचेच ऐकतात. हा गुरु आपल्या शिष्याचा संसार जोडू शकत नाही. हा भागवतकार स्वत:चा संसार मोडतो, तेव्हा त्यांच्याकडून इतरांचे संसार जोडले जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अशा लोकांच्या पाया पडून आशीर्वाद घेण्यापेक्षा त्यांची कृत्ये समाजासमोर आणली पाहिजेत. संत, महात्म्यांना बदनाम करणाऱ्या व समाजाला फसविणाऱ्या अशा चुकीच्या लोकांना फजित केले पाहिजे. आपल्या समाजाचा खरा आधारस्तंभ म्हणजे साधुसंत, किर्तन, प्रवचन, भागवतकार असल्याने त्यांच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्यांना फजित करणे योग्यच होईल, असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष- चांगला दिवस |
| दि. ३ जुलै २०२५ | दुर्गाष्टमी |
| विक्रम संवत् २०८१ | अष्टानिक पर्वारंभ (जैन) |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. अष्टमी (१४.०६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - हस्त (१३.४९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - परिघ (१८.३४) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (२७.१७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# ‘आर्द्रा’ बरसू लागल्याने शेतकऱ्यांत चैतन्याचे वातावरण

### जुलै-ऑगस्टमध्ये चांगला पाऊस पडण्याचा अंदाज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

अवकाळी, रोहिण्याचा जोरदार पाऊस झाल्यानंतर गायब झालेल्या पावसाचा आता आर्दा नक्षत्रामध्ये जोर वाढू लागल्याने शेतकऱ्यांत समाधानाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, गतवर्षीही जून महिन्यात कमीच पाऊस होता; आता जुलै-ऑगस्टमध्ये चांगला पाऊस बरसेल, असा कयास जाणकार शेतकरी बांधव बांधत आहेत.

यावर्षी मे महिन्यातच २३० मिमी इतका पाऊस नोंदला गेला होता. चोहीकडे नदी-नाले, ओढे, विहिरी, तलाव भरून वाहिले होते. यामुळे जून महिन्यात अगदी वेळेवर शेतकऱ्यांनी पेरणीही उरकली. पिके जोमदार आली मात्र जून महिन्यात या पावसाने चांगलीच ओढ घेतली होती. यामुळे काही भागातील खरिपाच्या पिकांनी माना टाकल्या होत्या. सध्या या पिकांना पावसाची अत्यंत गरज होती. आता जुलैच्या पहिल्या दिवसांपासून आर्द्रा नक्षत्राच्या पाऊसधारा बरसू लागल्याने शेतकऱ्यांत चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवारी उत्तर आणि दक्षिण तालुक्यातील काही भागात व जिल्ह्यातही काही ठिकाणी पावसाच्या चांगल्या सरी पडल्याची माहिती मिळाली. यामुळे आता खरिपातील पिकांना आधारही होणार आहे आणि जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे.

### जून महिन्यात पडलेला पाऊस असा

जिल्ह्यात १ जून ते आजतागायत ६४.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये उत्तर सोलापूर ६६.१ मिमी, दक्षिण सोलापूर ९१.३, बार्शी ७८.२, अक्कलकोट ७४.९, मोहोळ ५६.०, माढा ५२.४, करमाळा ४३.८, पंढरपूर ३५.२, सांगोला ६६.९, माळशिरस ७४.८, मंगळवेढा ७९.८ असा जिल्ह्यात एकूण सरासरी ६४.९ इतका पडला होता. तर गतवर्षी याच महिन्यात ६२.९ इतका पाऊस झाला होता. तर विभागात २२१.१ इतका पाऊस झाला आहे. यंदा दक्षिण सोलापूर, बार्शी आणि माळशिरस तालुक्यात सर्वाधिक पाऊस नोंदला आहे तर पंढरपूर तालुक्यात सर्वात कमी पाऊस नोंदला गेला आहे.



## कृषी दिनानिमित्त वृक्षारोपण

**सोलापूर, दि. २ जुलै-**

दक्षिण तालुका कृषी कार्यालय आरटीओ परिसर सोलापूर परिसरात वृक्षारोपण आयोजन करण्यात आले इको नेचर क्लब व रोटरी क्लब सोलापूर ईस्ट माध्यमातून कृषी अधिकाऱ्यांस समवेत वृक्ष लागवड करताना दक्षिण तालुका कृषी अधिकारी मुळे, सहायक अधीक्षक व्ही. ए गव्हाणे, वरिष्ठ लिपिक आर. ए. पवार, कनिष्ठ लिपिक जे. एस. लिगाडे, डॉ. मनोज देवकर, रोटरी क्लबचे अध्यक्ष कार्तिक चव्हाण, मीनाक्षी तेली यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करण्यात आले.

## अभिनंदन विभूते यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

अभिनंदन विभूते हे विकास नगर येथील महावीर हायस्कूल येथे गेल्या ३३ वर्षापासून इंग्रजी विषयाचे अध्यापन करुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानिमित्त त्यांचा सत्कार जैन सिनिअर सिटिझनच्या अध्यक्षा डॉ.सरिता कोठाडिया यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर भारतीय जैन संघटनेचे राज्य अध्यक्ष केतन शहा, सुधीर पंडित, महावीर संगवे, उज्वला पाटील, देवेंद्रप्पा किवडे, रमेश कासार, श्याम पाटील, हुकुमचंद हेसे, डॉ.अजित माणिकशेटे, डॉ. विलास हरपळे, अरुणकुमार धुमाळ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पंकजा पंडित यांनी सादर केलेल्या णमोकार महामंत्राने झशली. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून भ. महावीर व अभिनंदन विभूते यांच्या माता-पित्यांच्या, छायाचित्रांचे पूजन करण्यात आले. या वेळी स्वरा पद्मराज पाटील यांनी भरतनाट्यातून गणेश स्तवन सादर केले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल कुमठे येथील अतिशय क्षेत्र १००८ श्री चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिराच्या वतीने त्यांना मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर महावीर हायस्कूल, ज्ञानोदय हायस्कूल, नूतन प्रशाला आणि समाजातील गण्यमान्य व्यक्ती तसेच मित्र परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी केतन शहा, रमेश कासार, शैला साळवे, उज्वला पाटील, ऋषभ विभूते, वृषाली विभूते, काशिनाथ भतगुणकी, शहाजी ठोंबरे, शिवानंद भांजे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रथमेश कासार यांनी केले. देशभूषण व्हसाळे यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करणार : प्राचार्य हत्तुरे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

संस्कारक्षम पिढी तयार करावे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे नामवंत खेळाडू तयार व्हावे व विविध स्कॉलरशिप परीक्षेमध्ये विद्यार्थी पात्र व्हावे, सर्वांनी उमेदीने व उत्साहाने जीवन जगावे. यासाठी मी शेवटच्या श्वासापर्यंत शाळेसाठी व विद्यार्थ्यांसाठी प्रगतीसाठी सहकार्य करणार, असे सत्कारमूर्ती प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे म्हणाले.

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हत्तुरे नियत वयोमानानुसार ३१ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी त्यांचा सपत्निक सत्कार मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, संस्थेचे सचिव नागप्पा सिंदगी, धरेप्पा हत्तुरे, नागुबाई हत्तूरे, राजश्री हत्तुरे, विजयालक्ष्मी हत्तुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. सत्कार मूर्तींचे स्वागत पुष्पवृष्टीने व ढोल ताशांच्या गजरात जल्लोषात करण्यात आले. रांगोळीच्या व गुलाब पुष्पांच्या पायघड्या काढण्यात आल्या होत्या.प्रथमतः स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी सत्कारमूर्तींना मानवंदना दिली. यावेळी सत्कारमूर्ती व प्रमुख अतिथी यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेचे, कै. सिद्रामप्पा हत्तुरे, कै.रखमाबाई हत्तुरे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी युसुफ शेख,बसवेश्वर बुरुकुल,सविता कुलकर्णी यांनी अनुभव सांगत सत्कारमूर्तींच्या आठवणींना उजाळा दिला. प्राचार्यांची स्वभाव वैशिष्ट्ये सांगताना श्री. वरनाळ म्हणाले, प्राचार्य हत्तुरे निर्मळ मनाचे, चारित्र्यवान, प्रेमळ स्वभावाचे व्यक्ती आहेत. पुण्यवान व परोपकारी वृत्ती जोपासणारी व्यक्ती आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बसवराज कोरे यांनी केले,सूत्रसंचालन मारुती माने व सुकेशनी गंगोडा यांनी केले. अनिलकुमार गावडे यांनी आभार मानले.



## समता विद्यालयात वसंतराव नाईक जयंती साजरी

**सोलापूर, दि. २ जुलै-**

माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांच्या ११२व्या जयंती निमित्त समता मराठी विद्यालयात त्यांच्या प्रतिमेला शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक जयवंत हक्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या कार्याबद्दल शिक्षिका ज्योती रणसिंग आणि मिनाक्षी राठोड यांनी स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या कार्याबद्दलचे मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक कल्पना वाघमारे यानी केले. सूत्रसंचालन चारुशीला म्हमाने यांनी केले. आभार अपर्णा कुलकर्णी यांनी मानले. यावेळी रामराव चव्हाण, अनिल चव्हाण उपस्थित होते.



## महाआरोग्य शिबीरात उत्फूर्त प्रतिसाद

### मार्कंडेय रुग्णालय व पवन कल्याण फॅन्स असोसिएशन यांचा संयुक्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालय व पवन कल्याण फॅन्स असोसिएशन संयुक्त विद्यमाने पूर्व विभाग दत्त मंदिर देवस्थान सभागृहात झालेल्या महाआरोग्य शिबीरास उत्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रीनिवास चित्रपटचे मालक श्रीनिवास गरदास हस्ते याचे उद्घाटन झाले.

श्री. दत्त महाराज प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. या मोफत महाआरोग्य शिबिराचा लाभ १९० रुग्णांनी घेतला. यासाठी आनंद अवधूत श्रीनिवास कणकी, गणेश पोतन, श्रीनिवास महेशन, अनिल कोंडा, श्रीनिवास मंथेन, विनायक जगताप, वेंकटेश अण्णा, अंबादास गड्डम, नरेंद्र भंडारी, महेश इंजामूरी, जनसैनिक म्हणून लाभले.

## व्यक्तिमत्व विकासासाठी नित्य नियमाने ध्यान करावे

### मास्टर प्रदीप विजय यांचे प्रतिपादन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

ध्यान ही वैज्ञानिक संकल्पना आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी नित्य नियमाने ध्यान करावे, असे प्रतिपादन मास्टर प्रदीप विजय यांनी प्रतिपादन केले.

दि पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मुव्हमेंटतर्फे आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक विज्ञान गुरु व ब्रेथ एनर्जी हेल्थ फाउंडेशनचे संस्थापक मास्टर प्रदीप विजय यांचे आध्यात्मिक ज्ञान व ध्यान सत्रांचे आयोजन वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, वैष्णवी पिरॅमिड मेडिटेशन पार्क तसेच हेरिटेज बँक्वेट हॉल इथे संपन्न झाले.

या तीन दिवसीय सत्रांमध्ये दि पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी सोलापूरचे अध्यक्ष पूर्णचंद्र राव, चंद्रशेखर रेड्डी, नीता राव, नेहा मिरजगावकर व कविता मिरजगावकर, उन्मनी जंगे, दीपा मेहता, वर्षा कत्ते, स्मिता दुधनकर, ज्योत्सना दुस्सल, प्रज्ञा कुलकर्णी, प्रीत सदारंगानी, सीए आनंद गांगजी, सीए ओंकार उटगे, सिद्राम पुराणिक, व्यंकटेश आडम, प्रकाश पागुल, श्रीनिवास पुला, गणेश म्याकम, राजश्री इराबत्ती, विवेकानंद वंगारी व इतर मान्यवर सभासदांचे उत्कृष्ट सहनियोजन व विशेष सहकार्य लाभले.

# सिंहगड स्कूलचा पदग्रहण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्यूनिअर कॉलेजचा शालेय विद्यार्थी परिषद सदस्य २०२५-२६ चा पदग्रहण सोहळा पडला.

फौजदार चावडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, प्राचार्य शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, संस्थेचे निबंधक डॉ. डी आय नवले यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. या पदग्रहण सोहळ्यात शपथविधी देताना राज्यपालाची भूमिका प्राचार्या शाहीन शेख यांनी पार पाडली. या सोहळ्यास कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

गेल्या महिन्यात शुक्रवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडली होती. यातून प्रत्येक वर्गातील मॉनिटर निवडण्यात आले. पोलिंग बुथद्वारे निवडणूक घेण्यात आली होती. मतपत्रिका, बोटाला शाई लावणे, मतदान पेटी, मतमोजणी अशा विविध प्रकारे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रिया कृतीद्वारे समजावून सांगितली होती. यातून स्पोर्ट्स व्हाइस कॅप्टन, हेड गर्ल, हेड बॉय, कल्चरल कॅप्टन, कल्चरल व्हाइस कॅप्टन निवडणुकीतून निवडण्यात आले.

या पदग्रहण समारंभात प्रमुख पाहुणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांनी या शालेय निवडणुकीतूनच पुढे देशातील नेते तयार होत असल्याचे सांगत आपले कार्य करताना निष्पक्षपातीपणे करण्याचा सल्ला दिला.



### यांनी केले पदग्रहण

शालेय विद्यार्थी परिषद सदस्य २०२५-२६ म्हणून हेड बॉय म्हणून आदित्य भोसले, हेड गर्ल तनया गवळी, क्रीडा कर्णधार म्हणून सुयश भोसले तर क्रीडा उपकर्णधार म्हणून माही पाटील यांनी पदग्रहण केले. सांस्कृतिक कर्णधार समर्थ जगताप तर सांस्कृतिक उपकर्णधार म्हणून स्वरा गुंड यांनी पदग्रहण केले.



## श्री बनशंकरी देवस्थानकडून वह्या वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**

श्री बनशंकरी देवी देवस्थानच्यावतीने समाजातील पहिली ते दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. नवीन पंचांची नियुक्ती झाल्यावर प्रथमच हा उपक्रम राबवण्यात आलेला आहे.

यावेळी नवीन पंच अध्यक्ष अनिल यरगल, सेक्रेटरी मल्लिकार्जुन कंबद, उपाध्यक्ष गुरुपाद होसमनी व खजिनदार व्यंकटेश दसुर उपस्थित होते. समाजातील ५० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले. सर्वप्रथम दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर देवीची आरती व त्यानंतर राष्ट्रगीत करण्यात आले व पहेलगाम येथे झालेल्या अतिरेक्यांच्या हल्ल्याचा निषेधार्थ व अहमदाबाद येथे विमान अपघातात मरण पावलेल्या प्रवाशांना सर्वांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर महेश पिनाबत्ती यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व दयानंद कॉलेजमधील प्रा. संजीवकुमार जिनगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्वाचे...




## शेतकऱ्यांना ठिबक सिंचन प्रणालीविषयी विद्यार्थिनींनी केले मार्गदर्शन

**पिलीव, दि. २ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा लाभ मिळावा या उद्देशाने ठिबक सिंचन प्रणालीविषयी माहिती व प्रशिक्षणाचे आयोजन श्रीराम कृषि महाविद्यालय, पानीव येथील कृषीकन्यांनी दिले. प्रशिक्षणात ठिबक सिंचन प्रणालीची संकल्पना, त्याची स्थापनेची पद्धत, पाण्याची बचत, पीक उत्पादनातील वाढ आणि मजुरीचा खर्च कसा कमी होतो याविषयी सविस्तर माहिती दिली गेली.याशिवाय, शेतकऱ्यांना ठिबक सिंचन यंत्रणा बसवण्यासाठी बँकेद्वारे मिळणारे कर्ज आणि शासनाकडून मिळणारे अनुदान याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. शेतकरी अमर पांढरे यांच्या शेतावर केलेल्या प्रात्यक्षिकामध्ये शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता आला. हा उपक्रम श्रीराम कृषि महाविद्यालय, पानीव येथील विद्यार्थिनी कृषीकन्या तृप्ती बनकर, श्रावणी भांबुरे, योगिता चोरमले, स्वरांजली एकतपुरे, संजना गोसावी, सलोनी कांबळे, भाग्यश्री सानप यांनी घेतला. यासाठी श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, मार्गदशिका श्रीलेखा पाटील, सचिव अभिषेक पाटील,विशेष कार्यकारी अधिकारी प्रमोद झगडे, प्राचार्य डॉ.एच.बी. हाके, उप.प्राचार्य डॉ. एस.डी.राऊत, कार्यक्रम अधिकारी डॉ. जे. आय. शेख आणि प्राध्यापक के.टी.मदने यांचे मार्गदर्शन लाभले.



## वटवृक्ष देवस्थानतर्फे अधिष्ठाता डॉ. किरणकर यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २ जुलै-**
डॉ. वैशंपायन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विद्या किरणकर यांचा वटवृक्ष देवस्थानच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान आहे, त्यामुळे स्वामीभक्त त्यंत भक्ती भावाने स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होत असतात. ही बाब लक्षात घेऊनच मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली भाविकांच्या भक्तीला दाद देत वटवृक्ष मंदिरात स्वामी दर्शनाचे उत्तम नियोजन असल्याचे व देवस्थानचे धार्मिक, सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात भरीव योगदान असल्याचे मनोगत डॉ. किरणकर यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, व्यंकटेश पुजारी, महिबूब शेख, श्रीशैल गवंडी, संजय पवार, प्रदीप पाटील उपस्थित होते.



## बासलेगावात सेवानिवृत्त पीएसआय सोडगी यांचा सत्कार

**अक्कलकोट दि.२ जुलै-**
बासलेगांवचे सुपुत्र तथा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस रेल्वे स्थानक मुंबई येथील पोलीस सब इन्स्पेक्टर श्रीमंत सोडगी यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम निमित्त इयत्ता १० व १२ वी गुणवंत विध्यार्थ्यांचा सत्कार सोहळा गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आला. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामीजी माजी खासदार यांच्या दिव्य सानिध्यात, शशिकांत बिराजदार माजी उपमहापौर, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली तसेच सरपंच बिरू बंदिछोडे, उपसरपंच श्रीनिवास गवंडी, अक्कलकोट बाजार समिती संचालक पार्वती स्वामी, लिंगायत जागतिक महासभा जिल्हा अध्यक्ष शिवानंद गोगाव,सिध्दाराम बिराजदार माजी सरपंच, शिवानंद पाटील विजापूर यांच्या प्रमुख उपस्थित लोखंडे मंगल कार्यालय बासलेगाव रोड अक्कलकोट येथे सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होते. यावेळी श्रीमंत सोडगी यांची कन्या भाग्यश्री या बासलेगावातील पहिले एमबीबीएस डॉक्टर झाल्याबद्दल व सुपुत्र आयटी इंजिनियर सिद्धार्थ यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गौरीशंकर कोळी, सागर पाटील, सिद्धाराम संकपाळ, पंडित सोडगे, लक्ष्मण निंबाळे, उमेश सोडगे आदींनी प्रयत्न केले.



## सांगोला विद्यामंदिरमध्ये गुणवंतांचा सत्कार

**सांगोला, दि.२ जुलै-**
सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेज येथे इ.१२ वी बोर्ड परीक्षेमधील शास्त्र, कला, वाणिज्य शाखेतील प्रथम तीन क्रमांकाचे व सीईटी, नीट परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा मेडल, गुलाब पुष्प व १००० रुपये रोख रक्कम बक्षीस देऊन पालकांसमवेत संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेली संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे उपस्थित होते. प्रकाश म्हमाणे यांच्या वतीने देण्यात आलेली भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रकाश म्हमाणे यांनी केले. प्रा.प्रसाद खडतरे व प्रा.राजेंद्र कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रा.निलेश नागणे यांनी मानले.

# वीज वितरण विरोधात केम ग्रामस्थांकडून गाव बंद

### आश्वसनानंतर उपोषण स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२ जुलै-**
केम (ता.करमाळा) येथे दोन वर्षापासून मंजूर असलेले ३३ केव्ही लाईनचे काम रेंगाळले आहे. त्यामुळे येथे वारंवार वीजपुरवठा खंडीत होत असल्याने वैतागलेल्या ग्रामस्थांनी वीजवितरणच्या विरोधात एक दिवस गाव बंद आंदोलन करत कार्यालयासमोर उपोषण केले. वीज वितरण विभागाचे अधिकारी भोईर यांनी दोन महिन्यांत काम पूर्ण करण्याचे लेखी पत्र




दिल्याने उपोषण स्थगीत करण्यात आले.

कूंकवासाठी प्रसिद्ध असलेल्या केम गावात मागील नऊ वर्षापासून कुंकू कारखानदारांनी पाठपुरावा करून जेऊर २२० के व्ही सबस्टेशन मधुन स्वतंत्र ३३ केव्ही साठी आठ किमी लाईन केमसाठी मंजूर करून घेतली आहे. सदरील लाईनचे टेंडर दोन वर्षापूर्वी झाले आहे. केम गावातून जेऊर उपविभागत सर्वाधिक वीज बील केम गावातून भरले जात आहे. तरी केम ला विजेची समस्या कायम आहे. वारंवार पाठपुरावा करून महावितरणकडून कोणतेही काम झाले नसल्याच्या निषेधार्थ केम ग्राम स्थांनी गाव बंद ठेवून जेऊर वीज वितरण कार्यालयासमोर उपोषण केले. यावेळी आम दार नारायण पाटील यांनी उपोषणस्थळी येऊन कुंकू कारखानदारांशी चर्चा करत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. उपोषणकर्त्यांना भोईर यांनी लिंबू पाणी दिले. यावेळी सरपंच सारिका कोरे, उपसरपंच सागर कुडें, माजी सरपंच अजितदादा तळेकर, राहुल कोरे, म ाजी सभापती शेखर गाडे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष सागर दौंड, उपाध्यक्ष सागर तळेकर, अच्युत पाटील, महेश तळेकर, संदिप तळेकर, नितीन खटके, गोरख पारखे, गोरख खानट, श्रीहरि तळेकर, विजयकुमार बलदोटा, धनंजय सोलापूरे, गोपी शिंदे, भालचंद्र गुटाळ, महाविर तळेकर, बापुराव तळेकर, पी.पी. वासकर, महेश घाडगे, अक्षय गोडसे, काका भिस्ते, किरण तळेकर, दत्ता तळेकर, सुभाष कळसाईत, अनिल भिस्ते, बाळासाहेब देवकर, दत्ता बिचितकर, भैरू शिंदे, आपा वैद्य, सुदर्शन भिस्ते, गणेश शिंदे, विजय ओहोळ, सचिन बिचितकर, बाळू बिचितकर, शुभम शिंदे, हरि शिंदे उपस्थित होते.

## काव्या देशमुखची सैनिक स्कूलसाठी निवड

**सोलापूर, दि. २ जुलै-**
काव्या निलेश देशमुख हिची सैनिक स्कूल प्रवेशाच्या पहिल्या फेरीत उत्तर प्रदेशच्या शासकीय सैनिक स्कूल, मैनपुरी येथे निवड झाली आहे.



सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत तिने ३०० पैकी २७२ गुण मिळवून हे यश संपादन केले. पहिल्या प्रवेश फ ेरीत शासकीय सैनिक स्कूल मध्ये निवड झालेली काव्या निलेश देशमुख ही माढा तालुक्यातील एकमेव विद्यार्थी आहे. ती कुर्डूवाडीतील आदर्श पब्लिक स्कूलची विद्यार्थीनी आहे. तिची यावर्षी नवोदय विद्यालय, पोखरापूरसाठी निवड झाली होती. तसेच तिला स्कॉलरशिप परीक्षेत २९८ पैकी २८६ गुण मिळाले आहेत. तिला तानाजी खरात, समाधान व्यवहारे, स्वाती खटके, आई सोनाली परबत-देशमुख, वडील मराठा सेवा संघाचे माढा तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल आमदार अभिजित पाटील, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, माजी विस्तार अधिकारी शोभा हंडे, केंद्रप्रमुख संजीवनी पौळ-उबाळे, आदर्श पब्लिक स्कुलचे संस्थापक-अध्यक्ष अमोल सुरवसे, प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, युवक नेते रावसाहेब देशमुख, उद्योजक सुरज देशमुख,उद्योजक गोरख खटके-पाटील, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, प्रदेश संघटक दिनेश जगदाळे,मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटिल, सरपंच राजाभाऊ खटके, अरूण जगताप, राम मिटकल, शिवाजीराव गवळी, सचिन महिंगडे, सरपंच विश्वनाथ परबत, डॉ. संग्राम परबत, डॉ. बालाजी परबत, सरपंच परिषदेचे संस्थापक-अध्यक्ष जयंत पाटील, बाळासाहेब देशमुख यांनी अभिनंदन केले.

# न्यायाधीश पदावर कार्यरत माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकाचा सत्कार



### जागवल्या कॉलेजच्या आठवणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ जुलै-**
शहरातील श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयात आगळावेगळा सेवानिवृत्ती कार्यक्रम संपन्न झाला. येथील हिंदी विषयाचे प्रा. अनिल गेळे यांच्या सेवानिवृत्ती समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून त्यांचेच २००४-०५ च्या बॅचचे विद्यार्थी आणि विद्यमान न्यायाधीश दिनेश गायकवाड यांची उपस्थिती लक्षणीय ठरली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव बापूसाहेब बेणे तर प्राचार्य मनोज गादेकर, माजी प्राचार्य धुत्तरगावकर, उपप्राचार्य करडे, पर्यवेक्षक रणदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना न्यायाधिश गायकवाड यांनी शिक्षक हा विद्यार्थी घडवणारा आणि समाज बदलणारा घटक असतो. याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गेळे सर, गादेकर सर असल्याचे नमूद केले. यावेळी इतरही मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाय. आर. घेवारे यांनी केले तर आभार मंगेश कांबळे यांनी मानले.

महाविद्यालयात आपल्या निरोप समारंभास आपला, संस्थेचा विद्यार्थी हाच प्रमुख पाहुणा असावा असा गेळे यांचा आग्रह होता. त्यानुसार वाशिम जिल्ह्यातील रिसोड येथील न्यायाधीश पदावर कार्यरत असलेले बार्शीतील पाथरीचे पुत्र दिनेश गायकवाड आवर्जून उपस्थित होते. तसेच बिहारच्या मोतीहार येथील राष्ट्रीय विद्यापीठात हिंदीचे प्राध्यापक असलेले सुनील घोडके, एबीपी माझा डिजीटलचे डेप्युटी प्रोड्युसर मयूर गलांडे, उद्योजक दिनेश फासे, विशाल बुडुख, विनोद हे माजी विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. तब्बल २० वर्षांपासून विद्यार्थ्यांशी नातं जोडलेल्या आपल्या गुरुंच्या निरोप समारंभास उपस्थिती दर्शवल्याने या सोहळ्याची चर्चा होत आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमानंतर अनिल गेळे यांच्यासह उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या चेअरमन प्रभाताई झाडबुके यांची भेट घेत आशीर्वाद घेतले.

#### निवृत्ती दिवशीच पेन्शन ऑर्डर

सेवानिवृत्तीबद्दल अनिल गेळे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, संस्थेचे सचिव आणि प्राचार्य गादेकर यांच्या हस्ते निवृत्तीच्या दिवशीच त्यांना पेन्शन ऑर्डरही सुपूर्द करण्यात आली. निवृत्त कर्मचाऱ्यास पेन्शन लगेच मिळाली पाहिजे ही काळजी आम्ही घेतो, ती संस्थेची जबाबदारी असल्याचे मनोज गादेकर यांनी म्हटले.

## शेतकऱ्यांनी पिक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**पिलीव, दि. २ जुलै-**
माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरातील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२५ यामध्ये सहभागी होणयाचे आवाहन पिलीव कृषी विभागाच्या मंडलाधिकारी जयश्री खरात यांनी केले आहे. या खरीप हंगामातील बाजरी, मका, तूर, उडीद व इतर तृणधान्ये यासाठी ही विमा योजना लागू आहे. यामध्ये खरीप हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांनी आपला दोन टक्के हप्ता भरावयचा आहे. तर रब्बी हंगामासाठी दीड टक्के रक्कम तर रब्बी हंगामातील नगदी पिकांसाठी पाच टक्के रक्कम शेतकऱ्यांनी भरायची आहे. सदरचा विमा भरणयासाठी शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी व शेतकरी ओळखपत्र क्रमांक ( फार्मर आयडी) आवश्यक आहे. जे शेतकरी बोगस विमा भरतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करणयात येणार आहे तसेच त्यांना पाच वर्षासाठी काळया यादीत टाकणयात येणार आहे. शेतकऱ्यांनी ३१ जुलैपर्यत सदरचा पिक विमा भरावा, असे आवाहन खरात यांनी केले आहे.

## अवैध दारु विक्री करणाऱ्यास अटक

**बार्शी, दि.२ जुलै-**
बार्शी शहर पोलिसांनी भोगेश्वरी चाळ, भाजी मार्केट येथे छापा टाकून अवैध दारु विक्री करणाऱ्या किरण दत्तात्रय साळुंखे (वय ४०) याला रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून पोलिसांनी १० लिटर देशी दारु जप्त करून गुन्हा दाखल केला. ही कारवाई सायंकाळी ७-४० वाजता पोलीस कॉन्स्टेबल सचिन नितनवरे, कुंजीर, घाडगे आणि दबडे यांनी पंचांसमक्ष केली. आरोपीकडे दारु बाळगण्याचा परवाना नसल्याचे आढळले. जप्त दारुपैकी १८० मिली सॅम्पलसाठी घेऊन बाटलीवर पंच आणि पोलिसांच्या स्वाक्षऱ्या लावल्या. दारुची किंमत अंदाजे एक हजार रुपये आहे. पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरु आहे. पोलिसांनी अवैध दारु विक्रीविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा दिला असून, नागरिकांना संशयास्पद बाबींची माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

# शिक्षण प्रसारक मंडळातर्फे उद्या गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ जुलै-**
येथील शिक्षण प्रसारक मंडळातील इयत्ता १०वी इयत्ता १२वी परीक्षेतील एकूण १४५ गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांचा सत्कार सोहळा शुक्रवार दिनांक ४ जुलै रोजी स्मृतीभवन शंकरनगर येथे सकाळी ११ वाजता आयोजित केला आहे. सदरचे सत्कार संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते व संस्थेचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, सदस्या स्वरूपाराणी मोहिते-पाटील, युवा नेते सयाजीराजे मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील, संचालक मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षण संस्था पुरस्काराने गौरवलेल्या शिक्षण प्रसारक मंडळातील ३३ शाखेतील मार्च २०२५ मधील इयत्ता १०वीचा निकाल ९५.११ टक्के लागला. १०वी मध्ये९० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या ९८ व शाखावर प्रथम आलेल्या १६ अशा एकूण ११४ गुणवंतांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार होत आहे. तर १२वीच्या परीक्षेत संस्थेच्या ७ शाखेतून ९५.७१ टक्के निकाल लागला. १२ वीच्या ८० टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त केलेल्या २१ विद्यार्थ्यांचा, १०० गुण प्राप्त केलेल्या ३, व्यवसाय विभागातील ४, शाखावर प्रथम आलेले ३ असे १२ वीचे एकूण ३१ गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार होत आहे. इयत्ता १०वी व १२वी मिळून १४५ विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या सत्कार समारंभ आयोजित केला आहे. इयत्ता १०वी परीक्षेत कु. पौर्णिमा भांगे तिने९८.२० टक्के गुण मिळवत संस्थेत प्रथम तर सिफा तांबोळी ९७ टक्के व ओंकार राऊत ९७ टक्के मिळवित विभागून द्वितीय क्रमांक पटकावला. आर्या कुलकर्णी, इंद्रनील चव्हाण, गौरांग जाम दार या तिघांनी ९६.८० टक्के मिळतील विभागून तृतीय क्रमांक पटकावला. तर १२ वीत वरद कोतमिरे याने ८९.८३ टक्के मिळवित संस्थेत प्रथम तर मनाली भुजबळ यांनी ८९.५० टक्के मिळवित द्वितीय व क्रांती पांढरे हिने ८९ टक्के मिळवित तृतीय क्रमांक पटकावला.

# उपळाईत १३० जणांना चष्म्यांचे वाटप

**अकलूज, दि.२ जुलै-**
उपळाई बुद्रुक (ता. माढा) येथे घेण्यात आलेल्या डोळे तपासणी शिबिरातील १३० जणांस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

येथे राष्ट्रवादी (शरद पवार गट) काँग्रेस, बुधराणी हॉस्पिटल पुणे, विश्वतेज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसनिमित्त मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया, चष्मे वाटप ठेवण्यात आले होते. युवती जिल्हाध्यक्ष विनंतीताई कुलकर्णी यांनी आयोजन केले होते. परिसरातील लोकांकडून शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिराचे उद्घाटन नूतन जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, कार्याध्यक्ष रविभाऊ पाटील यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक धनाजी थोरात यांनी केले. युवती तालुकाध्यक्ष वृषाली चौगुले यांनी सूत्रसंचलन केले. शिबिरात ५७१ जणांची तपासणी



करण्यात आली. तर १३० जणांस चष्मे वाटप करण्यात आले. मोतीबिंदू शस्त्रक्रियेस ४५ लोकांना पाठवण्यात आले. कार्याध्यक्ष रविभाऊ पाटील, म हिला जिल्हाध्यक्ष सुवर्णाताई शिवपुरे, वंदनाताई कदम, भारत आबा शिंदे, राम काका मस्के, तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, गोविंद भाऊ पवार, दिनेश जगदाळे, सत्यवान लटके, संतोष म ुटकुळे, पप्पू कदम, ऋषिकेश तांबिले, अभिजित उबाळे, अभिजित साळुंखे, पांडुरंग मुकणे, चैतन्य शेटे,नागनाथ कदम,औदुंबर कोल्हे,उपसरपंच सुनील माळी, अजित अनुभुले, सुरेश पाटील, सुभाष कुलकर्णी, राजकुमार मोहिते, समाधान इंगळे, हनुमंत जाधव, रामभाऊ कदम, रावसाहेब पालकर, लहू बोराडे, धनाजी थोरात उपस्थित होते.

# महर्षि प्रशालेची दिंडी पालखी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ जुलै-**
महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला प्राथमिक शाळा यशवंतनगर येथील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा दिंडी-पालखी सोहळा उत्साहात व आनंदात संपन्न झाला. ह.भ.प.बाळासाहेब झांबरे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन झाले.

यावेळी स्वर्गीय श्रीमती रत्नप्रभादेवी शंकरराव मोहिते-पाटील यांना अभिवादन करण्यात आले. झांबरे महाराजांनी दिंडीचा इतिहास सांगितला. सहशिक्षका रेखाताई गुंड यांनी आक्कासाहेबांना शब्दपुष्पांजली अर्पण केली. युवा नेते सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील यांनी अश्वाचे



पूजन केले. दिंडी-पालखी सोहळ्यात पुढे दोन रूबाबदार अश्व, त्यामागे पताकाधारी, टाळकरी, तुळशीवृदांवन घेतलेले चिमुकले, वारकऱ्यांच्या वेशातील बालवारकरी त्यांच्यापुढे पालखीतील विठ्ठल-रक्मीणीच्या अभिरूपातील विद्यार्थी, कोणी संत ज्ञानेश्वर तर कोणी संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास, संत नामदेवांच्या बरोबर मुक्ताई-जनाई रूपात बाल वारकरी होते. सभापती स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील यांनी शिवरत्न बंगल्यासमोर पालखीचे दर्शन घेत काही अंतर दिंडीबरोबर चालून बाल वारकऱ्यांना प्रोत्साहन दिले. स्वरूपनगर, सुमित्रानगर भागात अनेक नागरिकांसह पालकांनी बाल दिंडीचे स्वागत केले. माजी मुख्याध्यापक बाळासाहेब मगर यांच्याकडून सर्व बाल वारकऱ्यांना डिंकलाडू-पाण्याची सोय केली होती. प्रशालेच्या मैदानावर रिंगण सोहळा रंगला. अश्वाच्या रिंगणाने बाल वारकऱ्यांत आणखीन उत्साह वाढवला. शिक्षक-पालकांनीही फुगडीचा आनंद घेतला. पसायदानाने सोहळ्याची सांगता झाली. सातशेहून अधिक विद्यार्थी, पालक, शिक्षकांनी महाप्रसादाचा आनंद घेतला. सूत्रसंचालन रमेश गायकवाड यांनी केले. मुख्याध्यापक शिवाजी पारसे यांच्यासह सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# पिलीव परीसरात पावसाने ओढ दिल्यामुळे पिके धोक्यात

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २ जुलै-**
महाराष्ट्रात यंदा कधी नव्हे ते मे महीन्यातच समाधानकारक पाऊस झाला. माळशिरस तालुक्यासह पिलीव व आसपासच्या परीसरात सुद्धा समाधानकारक पाऊस झाला तसेच जुन महीन्याच्या सुरुवातीला सुद्धा पाऊस झाला यामुळे पिलीव, सुळेवाडी, बचेरी ,शिंगोर्णी या भागातील शेतकऱ्यांनी मका, बाजरी ,कडवळ व इतर पिकांची पेरणी केली .सध्या पिकेही जोमदार वाढत आहेत.पण जुन महीन्यात पहील्या आठवड्यात झालेल्या पावसानंतर या भागात पाऊस झाला नाही सध्या यामुळेच या भागातील पिके सध्या धोकयात आहेत.जवळपास महीनाभर पावसाने विश्रांती घेतल्यामुळे सध्या पिलीवच्या पश्चिम भागातील दुषकाळी पटटयातील पिके सध्या पाणयाअभावी धोकयात आहेत. सुरुवातीला सुद्धा या भागात इतर भागापेक्षा पाऊस तसा कमीच होता पण मे महीन्यातच समाधानकारक पाऊस झाला यामुळे पुढे सुदधा चांगला पाऊस होईल या भोळया आशेवर शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला. जोमदार वाढीच्या अवस्थेत असणारी पिके सध्या पावसा अभावी धोकयात आहेत. जर वेळेत पाऊस झाला नाही तर या भागातील शेतकऱ्यांनवर दुबार पेरणीचे संकट ओढावण्याची शक्यता आहे. या भागातील शेतकरी सध्या दमदार पावसाच्या प्रतिक्षेत आहेत.

# माऊली.. माऊली.. च्या गजरात रंगले खुडुसचे रिंगण





## सोहळ्यातील दुसरे गोल रिंगण उत्साहात; उडीच्या खेळात हरपले देहभान

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.२ जुलै-**

माऊली.. माऊली.. च्या जयघोषात आज दि.२ जुलै रोजी सकाळच्या सत्रात लाखोंच्या उपस्थितीत श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील दूसरे गोल रिंगण खुडूस फाटा येथे झाले.

अश्वांनी केलेल्या तीन नेत्रदिपक फेऱ्यांनी असंख्य वारकऱ्यांच्या डोळ्याचे पारणे फिटले. रिंगणानंतर टाळ मृदंगाच्या गजरात रमलेल्या उडीच्या खेळात वारकीर देहभान हरपून सहभागी झाले होते. माळशिरस येथील पहाटे सहा वाजता पालखी सोहळा प्रमुखांच्या हस्ते महापूजा उरकून सकाळी सहा वाजता सोहळ्याने दूसऱ्या गोल रिंगणाकडे खुडूसफाट्याकडे मार्गस्थ झाला. हा सोहळा खुडूसफाटा येथे सकाळी ८.१५ वा. दाखल झाला. त्याअगोदर जरीपटक्याचा निशाना असलेल्या स्वाराच्या अश्वाने रिंगणस्थळी प्रवेश केला. पालखी रिंगणाभोवतीने प्रदक्षिणा करत मध्यभागी दाखल झाली. त्यापाठोपाठ माऊलींचा लवाजमा डोईवर तृळशी वृंदावन घेतलेल्या महिला वारकरी, वीणेकरी आणि दिंडयांचे आगमन झाले. रिंगणात वैष्णवांचा सोहळा पोहचताच लाखोंच्या जनसमुदायाने टाळ्याच्या गजरात स्वागत केले. माऊलींच्या पालखीचे व स्वाराचे स्वागत व पूजा खुडूस ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली. सोहळ्यातील चोपदारांनी रिंगण लावून घेतले. चोपदारांनी मानाच्या दिडयांना आत सोडले. त्यानंतर भोपळे दिंडीतील मानाच्या जरीपटक्याने रिंगण मैदानाला तीन प्रदक्षिणा पूर्ण केल्या. सकाळी ८.४५ मिनिटांनी रिंगण चालू झाले. माऊलीच्या अश्वाने दौडण्यास सुरूवात करताच लाखो उपस्थितांनी टाळ्या वाजवत माऊली माऊली चा गजर सुरू केला व दोनच मिनीटात तीन फेऱ्या पूर्ण करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. रिंगण पूर्ण होताच उपस्थितांची अश्वाच्या टाचेखालील माती कपाळावर लावण्यासाठी झुंबड उडाली होती. रिंगणाचे अश्व विसावताच वारकरी मैदानात उतरले दिंड्या दिंड्यामध्ये विविध खेळ रंगले. हुतुतू, गड्यास गडी, हमामा, सुरपाट, कबड्डी, खो-खो, फुगडी अशा खेळांनी वारकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. चोपदारांच्या निमंत्रणानंतर उडीच्या कार्यक्रमासाठी सर्व दिंड्या पालखीच्या सभोवती गोलाकार बसल्या. टाळ, मृदुंगाच्या साथीने ज्ञानोबा माऊली तुकाराम अशा गजरात आसमंत व्यापून टाकणारा नादब्रह्म सुरू झाला. वृद्व, महीला, अवघी तरुणाई तल्लीन होऊन श्वास रोखून या नादब्रह्मात लीन होऊन गेले होते. एकात्म भक्तीभावाचा हा शाश्वत सुखाचा सोहळा भाविकांनी अनुभवला. यावेळी ॲड शहाजी ठवरे, ॲड.धनाजी ठवरे, डॉ. तुकाराम ठवरे, अभिजीत वाघ, महादेव ठवरे, बाळासाहेब वावरे, जयवंत सिद, मंडल अधिकारी सिद्धेश्वर भोसले, तलाठी सचिन पाटील, प्रशासक एस .व्ही. जाधव, ग्रामसेविका कोमल टेळे आदी उपस्थित होते. येथील रिंगणानंतर पालखी सोहळा निमगाव पाटी येथे दुपारी विसावा घेऊन वेळापूर नगरी मध्ये विसावला.

## जगद्गुरूंच्या पालखीचे श्रीपूर नगरीसह बोरगांवात तोफांच्या सलामीने स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २ जुलै-**

जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे श्रीपूर येथे सायंकाळी ६ वा. तर रात्रीच्या मुक्कामासाठी बोरगावात तोफांच्या सलामीसह ज्ञानोबा-तुकारामांच्या जयघोषात भाविकांनी उत्साहात स्वागत केले.

मंगळवार दि. १ जुलैचा अकलुज येथील मुक्काम संपवून पालखीने बोरगांव मुक्कामासाठी प्रस्थान ठेवले. दुपारचे माळीनगर येथील भोजन व विश्रांतीनंतर पालखीने महाळुंग हद्दीत प्रवेश केल्यावर महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीच्यावतीने नगराध्यक्षा लक्ष्मी चव्हाण, उपनगराध्यक्ष भीमराव रेडे-पाटील, नगरसेवक तानाजी भगत, सोमनाथ मुंडफणे यांनी पालखीचे स्वागत करून पादुकांचे पूजन केले. यानंतर कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्यावतीने



संचालक दिलिपराव चव्हाण, दाजी भुसनर, तानाजी वाघमोडे, वैशालीताई यशवंत कुलकर्णी व अधिकारी यांनी पालखीचे स्वागत करून पादुकांचे पूजन केले.

याबरोबर श्रीपूर नगरीचे जनक व सर्वत्र टेक्नॉलॉजी उद्योग समुहाचे अध्यक्ष मंदार ज्ञानेश्वर आगाशे, ब्रिमा सागर डिस्टलरीचे संचालक उदय कोठारी, व्यवस्थापकीय संचालक भरतकुमार सेठीया, जनरल मॅनेंजर दिनकर बेंबळकर यांच्या वतीने मेनगेटवर पालखीचे स्वागत करून पादुकांचे पुजन करण्यात आले. यानंतर भाविकांच्या दर्शनासाठी पालखी हनुमान मंदीर येथे थांबणेत आली. मुक्कामासाठी पालखीने बोरगांव हद्दीत प्रवेश केल्यानंतर ग्रामपंचायतीच्या वतीने बोरगांवचे सरपंच सारीका गोसावी, उपसरपंच मदनसिंह मोहीते पाटील, माळशिरसचे उपसभापती प्रतापराव पाटील, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष ॲड. प्रकाशराव पाटील, भाजपाचे प्रदेश अध्यक्ष राजकुमार पाटील, राष्ट्रवादी (शरद पवार ) पक्षाचे रविंद्र पाटील, उद्योजक हिम्मतराव पाटील व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत केले. यानंतर पालखी अद्ययावत असणाऱ्या पालखी तळावर शामीयानात विसावली. तुकाराम महाराज पालखी सोहळ्या बरोबर दिवसें दिवस वारकऱ्यांची संख्या वाढत आहे त्यामुळे पहाटे पासूनच रस्ता वारकऱ्यांनी व विठुलाच्या नामघोषाने दुमदुमला होता.

### वारकऱ्यांची निस्वार्थ सेवा

यावेळी मुंबई येथील अविनाश निचळ यांनी साडेपांच हजार वारकऱ्यांना शुध्द पाण्याच्या बाटल्या वाटल्या. तर मौला पठाण यांनी पांच हजार वारकऱ्यांना जेवण दिले. श्रीपाद जाधव यांनी वारकऱ्यांची मोफत दाढी–कटिंग केली. नितिन नाटकळे यांनी पांच हजार कप चहाचे वाटप केले . मोटार मालक–चालक संघटनेतर्फे लाडू वाटप करण्यात आले.

## आ. डॉ. बाबासाहेब देशमुख आजपासून करणार वारकऱ्यांची आरोग्यसेवा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २ जुलै-**

आषाढी वारीच्या निमित्ताने लाखो वारकरी पायी चालत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघाले आहेत. वाखरी, (ता. पंढरपूर) येथे पंढरीत जाण्यापूर्वी २५० किलोमीटर अंतर चालून थकलेल्या भाविकांची सेवा व वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सांगोल्याचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख व डॉ. निकिता देशमुख यांनी गुरुवार दि. ३ व शुक्रवार दि. ४ जुलै हे २ दिवस रात्रंदिवस वारकऱ्यांची सेवा



करण्याचा निर्णय घेतला आहे.

याप्रसंगी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्याकडून वारकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांची माहितीही दिली जाणार आहे. त्यांच्या या निर्णयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.



## सांगोल्यात वारकऱ्यांची आरोग्य तपासणी

### ● दिपकआबा साळुंखे-पाटील ट्रस्टतर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ जुलै-**

येथील दिपकआबा साळुंखे-पाटील चॅरिटेबल ट्रस्टतर्फे पाचेगाव खुर्द येथे मंगळवारी दि.१ जून रोजी वारकरी अरोग्य तपासणी शिबीराचे उदघाटन कोल्हापूर जिल्ह्यातील वृद्ध महिला वारकरी शांताबाई मगदूम यांच्या हस्ते करण्यात आले. १५ वर्षे आषाढी वारीनिमित्त हा उपक्रम सुरू आहे.

यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.अविनाश खांडेकर, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या पंढरपूर विभागाच्या प्रमुखपदी सतीश सावंत यांची निवड झाल्याबद्दल व हभप.कृष्णाजी कदम महाराज ढालगावकर यांचा ट्रस्ट, पाचेगाव खुर्द ग्रामपंचायत व सोसायटी यांच्या वतीने मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी डॉ.राज मिसाळ, हरिभाऊ भगत, डॉ.शिवाजीराव ढोबळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी हभप. पोपट घुले, दादासाहेब बाबर, सरपंच संगीता भोसले, मुरलीधर जवंजाळ, आबासाहेब भंडगे, निवृत्ती मिसाळ, माजी सैनिक अजितराव खराडे, हभप.शांताबाई मगदूम यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गोरखनाथ भोसले, पोपट मिसाळ, शिवाजी पाटील उपस्थित होते.

### साधु–संतांची सेवा करण्याचे भाग्य

दिंडीतील साधु–संतांची सेवा करण्याचे भाग्य लाभले. पाचेगाव खुर्द गावातील सर्व क्षेत्रातील लोक वारीच्या पूर्वी पांडुरंगाचा प्रपंच उभा करतात. स्व.शारदाकाकी साळुंखे पाटील या वारकरी संप्रदायातील असल्याने त्याचा वारसा आम्हालाही मिळाला आहे. पांडुरंगाचे दर्शन व सेवा हेच वारकऱ्यांचे वैभव आहे असे मनोगत माजी आ. दिपकआबा साळुंखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

## श्री संत गजानन महाराज पालखीचे शिंगोलीत स्वागत

### मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांच्या हस्ते पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२ जुलै-**

गजानन गोंदणे मस्तकावरी, सदा ठेवीन चरणी अशा अभंगाच्या ओव्या गात, टाळ - मृदुंगाच्या गजरात भक्तीभावाने न्हालेल्या वातावरणात शेगावीचा राणा श्रीसंत गजानन महाराज पालखी सोहळ्याचे मोहोळ तालुक्यात स्वागत करण्यात आले.

पांडुरंगाच्या भेटीची लागलेली आस, ग्यानबा- तुकारामचा जयघोष व टाळ मृदंगाच्या गजरात पंढरीस निघालेल्या संत गजानन महाराजांचा पालखी सोहळा मंगळवारी सीना नदीकाठच्या तिऱ्हे (ता. उ. सोलापूर ) येथे मुक्कामासाठी विसावला होता. अभिषेक व आरती नंतर पहाटे पाच वाजता या सोहळ्याने ग्रामस्थांचा निरोप घेत प्रस्थान केले. आणि सीना नदी पार करून या सोहळ्याने शिंगोली -तरटगाव येथे मोहोळ तालुक्यात प्रवेश केला. या ठिकाणी मोहोळ तालुक्याच्या वतीने तहसिलदार सचिन मुळीक यांनी स्वागत केले .

यावेळी गटविकास अधिकारी विवेक जमदाडे, सहायक गटविकास अधिकारी विजयकुमार देशमुख, सरपंच अविनाश मोटे, उपसरपंच पांडुरंग रासेराव, सोमनाथ दावणे ग्रामसेवक सुतार, मंडलाधिकारी सालीमठ, तलाठी कांबळे या सरकारी अधिकाऱ्यांसह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळच्या रम्य व आल्हाददायक वातावरणात




श्रीसंत गजानन महाराज पालखी सोहळ्याने शिंगोली - तरटगाव येथे बुधवारी मोहोळ तालुक्यात प्रवेश केला. यावेळी तहसिलदार सचिन मुळीक यांनी स्वागत केले.




वैष्णवजनांनी शिंगोलीकरांचा निरोप घेत कामतीकडे प्रस्थान केले. मार्गावर ठिकठिकाणी भाविकांकडून वारकऱ्यांना दूध, चहा, फराळ देण्यात येत होता. याचा आस्वाद घेत सर्व वारकरी शिस्तबद्ध पावले टाकत मार्गक्रमण करत होते. सकाळी ७ वाजता पालखी सोहळ्याचे भोजनासाठी कामती खुर्द येथे आगमन झाले. श्रीं च्या दर्शनासाठी मार्गावर भक्तजनांनी गर्दी केली होती. तर ठिकठिकाणी आकर्षक रांगोळीच्या पायघड्या घालण्यात आल्या होत्या. सरपंच सविता माळी उपसरपंच, दीपक काटकर,शिवानंद पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी श्री च्या मूर्तीस पुष्पहार घालत स्वागत केले येथील बसस्थानक परिसरात उभारलेल्या मंडपात श्रीं ची पालखी भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली होती.यावेळी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

कामतीसह आसपासच्या गावातील भक्तांची येथे लक्षणीय उपस्थिती होती. दरवर्षी ग्रामस्थांच्यावतीने या पालखीतील वैष्णवजनांना येथे भोजन देण्यात येते. यासाठी भल्या पहाटेपासून स्वयंस्फूर्तीने गावातील महिला यासाठी झटून सकाळी सहा वाजता स्वयंपाक तयार करतात. सकाळी ८ वाजता वैष्णवजनांनी या भोजनाचा आस्वाद घेतला. याकामी श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले. भोजनोत्तर अल्पशा विश्रांतीनंतर मुखाने हरिनामाचा जयघोष करीत पालखी कामती बुद्रुक मध्ये पोहोचली. येथेही ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत केले. यानंतर हा सोहळा वाघोलीकडे मार्गस्थ झाला दरम्यान पालखी मार्गावर कामती पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. या सोहळ्याच्या निमित्ताने मोहोळ तालुक्यात भक्तिभाव, सेवा, आणि सामाजिक ऐक्याचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.